
साप्ताहिक

# माणूस

८ डिसेंबर ८४ / २ रुपये



## कोयना धरणग्रस्त आता अतिरेकवादाकडे

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : अठ्ठाविसावा

¤

८ डिसेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस


१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर



## मुंबापुरी

### ☐ गुन्हाळ संपले एकदाचे !

लोकसभेच्या जागावाटपासंबंधीचा घोळ विरोधी पक्षांनी संपवला आहे. शरद पवारांनी आता आपली पाठ थोपटून घ्यावी. केवढी मोठी अचिव्हमेंट !

जागावाटपाबद्दलचा हा घोळ जवळजवळ तीन आठवडे चालला. रोज 'सारंग' वर बैठका. रोजची खलबतं. एकदा तर माजी कॉंग्रेस (स) खासदार आबासाहेब कुलकर्णी थट्टेने म्हणाले: 'या चर्चेची अवस्था एम्. जी. रामचंद्रनच्या तब्येतीसारखी झालीये.'

'एमजीआर माणसं ओळखू लागले', किंवा 'एमजीआर आज हसले' किंवा 'रामचंद्रन ॲंजॉइज कर्नाटक म्युझिक' अशा आशयाची बुलेटिन्स अमेरिकेहून येतात.

इथे, त्याच पार्श्वभूमीवर 'धुळ्याचा प्रश्न मिटला.', 'ठाणेचा वाद मिटेल', 'पुण्याचा टाय कायम' असे बुलेटिन्स मिळायचे. या बुलेटिन्सवरून आम्ही पत्रकारमंडळी दुखणं कितपत गंभीर आहे याचा वांझोटा काथ्याकूट करीत असू. आता ते सगळं संपलंय. तात्पुरती रंगरोगण झालीये.

डाव्या आघाडीतल्या आठ पक्षांनी पंचेचाळीस जागा आपापसात वाटून घेतल्या आहेत. तीन जागा भाजपसाठी सोडण्यात आल्या आहेत. तेव्हा महाराष्ट्रातल्या एकूण अठ्ठेचाळीस लोकसभा–जागांसाठी विरोधी पक्षात संपूर्ण एकमत अन सहकार्य असल्याचं गुलाबी चित्र पवारांनी उभं केलंय. ते अर्थातच फसवं आहे.

आता मुंबईचंच उदाहरण घ्या. दक्षिणमुंबईत जनता–भाजप एकमेकांसमोर उभे ठाकलेत. जयवंतीबेन मेहता भाजपच्या तर त्यांच्याविरूद्ध जनताचे विद्यमान खासदार रतनसिंह राजदा.

दुसरीकडे, उत्तरमुंबईत जनतासाठी भाजपने आपला उमेदवार उभा केला नाही. तर त्याच्या अगदी उलट ईशान्यमुंबईत पुन्हा जनता–भाजप समोरासमोर आहेत. ह्या 'मैत्रीपूर्ण लढती' पब्लिकला कशा समजणार ?

मराठवाड्याच्या नऊ जागांसाठी डाव्या आघाडीत आपापसात तर समझोता झाला आहेच; पण डाव्या आघाडीचा अन् भाजपचाही तंटा मिटला आहे. तेव्हा मराठवाड्यात विरोधी पक्षात संपूर्ण एकजूट आहे. मग हाच एकोपा महाराष्ट्रात इतर ठिकाणी का नसावा ?

लोकसभेच्या निवडणुका आहेत हे गेल्या वर्षा–दीड वर्षापास्नं सगळ्या विरोधीपक्षांना ठाऊक होतं. समझोत्याचं गुन्हाळ जवळजवळ चौदा महिने चाललं होतं. एन. टी. रामाराव, ज्योती बसूंपासून ते थेट बहुगुणा करुणानिधी —पवारांपर्यंत प्रत्येक नेता ऐक्याची, सहकार्याची भाषा बोलत होता. तरी इथे मेलं दक्षिण मुंबईचं कोडं सुटेना.

आता यापास्नं बोध घेऊन पवार येत्या विधानसभा निवडणुकांचा गोवर्धन नीट पेलतील अशी आशा करू या. पवार, बेटर लक नेक्स्ट टाईम.

### ☐ जेठमलानींचा अगाऊपणा

निवडणुका ऐन तोंडावर आल्या असताना मुंबई भाजपमध्ये अंतर्गत कुरबुरी सुरू झाल्या आहेत. यातली इतर छोटी कारणं सोडली, तरी राम जेठमलानींनी जनतापक्षाबद्दलच्या घेतलेल्या भूमिकेचा परामर्श घेणे जरूरीचे वाटते.

गुरुवारी जेठमलानींनी जगन्नाथराव जोशींना तार पाठवून पुणे शहर लोकसभा निवडणुकीतून माघार घेण्याची विनंती केली. 'जनता पक्षाला मी दिलेल्या शब्दाचा मान

पृष्ठ ३२ वर

# लाहोर आणि यशवंतराव

**श्री. ग. मा.**

पुण्याजवळचा टाटांचा टेल्को-परिसर, नासिकजवळची मिग विमान-कारखाना-वसाहत,कोयना धरणाची परिपूर्ती, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील साखरकारखान्यांच्या संख्येतील प्रचंड वाढ, या सर्व यशवंतराव चव्हाण यांच्या कर्तृत्वाच्या जिवंत खुणा आहेत. ते जरी आता काळाच्या पडद्याआड गेले असले तरी या खुणा त्यांची आठवण कायमच ठेवणार आहेत. त्यांनी कृषी–औद्योगिक क्रांतीचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले होते. केवळ औद्योगिक नाही, केवळ कृषी नाही. टाटांना पुण्याजवळ कारखानाविस्तार करण्यास उद्युक्त करण्यात त्यांनी जसा पुढाकार घेतला, त्यासाठी टाटांना जमीन व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची तत्परता दाखवली, तसेच ऊसउत्पादकांकडेही त्यांनी लक्ष पुरवले. ग्रामीण भागात साखरकारखानदारी त्यांच्या कारकीर्दीतच फोफावली. आधी वडाचे झाड होते, त्याचा विशाल वटवृक्ष झाला. समन्वय हा त्यांच्या प्रकृतीचा, व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाला एकांगी वळण न लागू देण्याचा त्यांचा प्रयत्न होता व हा प्रयत्न बऱ्याच प्रमाणात यशस्वीही ठरला. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत ग्रामीण भागातून पुढे आलेला नवा मध्यमवर्ग हे या यशाचे गमक आहे. खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार झाला. अगदी तांत्रिक–वैद्यकीय महाविद्यालयेही ग्रामीण भागात निघाली. शेतीसंबंधित प्रक्रियाउद्योगांची वाढ झाली. दहा–वीस कोटींचा एखादा कारखाना उभा करणे तरुण, नवशिक्षित शेतकऱ्यांना सहज शक्य झाले. यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कृषी औद्योगिक क्रांतीचे हे फलित आहे. तत्पूर्वी ग्रामीण भाग हा शहरांपासून, शहरी शिक्षितांपासून फटकून लांब राहत होता. पांढरपेशा समाज व ग्रामीण समाज यात एक दरी होती. ब्राह्मण–ब्राह्मणेतरवादासारखे दरी वाढवणारे काही प्रवाहही होते. यशवंतरावांच्या समन्वयशील धोरणांमुळे ही दरी कमी झाली. वादांची धार बरीच बोथटली. शेतीविकास वेगळा, कारखानावाढ वेगळी अशा पद्धतीने खेड्यांचा व शहरांचा वेगवेगळा विकास झाला असता तर हे असे एकात्मिक विकासाचे समाजदर्शन घडले नसते. शेतीचा विकास झाला; पण हा विकास शेतीला कारखानदारीची जोड देऊन, शेतीवरील भार हलका करून, ग्रामीण भागाचेच औद्योगीकरण करून साधला गेला. असे नसते तर मुंबई-पुण्यातली झोपडपट्टी आज आहे त्यापेक्षा किती तरी अधिक पटींनी वाढलेली दिसली असती. पुण्याचे कलकत्ता-कानपूर झाले असते ! जेथे दुष्काळ आहे, एखाद–दुसराही साखरकारखान्यासारखा उद्योग नाही अशा भागातूनच शहरात अधिकांश लोक आलेले आहेत. त्यांनीच बहुतेक झोपडपट्ट्या वसवलेल्या, वाढवलेल्या आहेत. त्या कमी करण्याचा उपाय कृषी-औद्योगिक क्रांती हाच आहे. यशवंतरावांनी हे दूरदृष्टीने व अंगभूत समन्वयशीलतेने ओळखले, त्याप्रमाणे धोरणे राबवली. यामुळे आर्थिक विकास बऱ्याच समतोल प्रमाणात घडून आला व त्यांच्या राजकीय सत्तेलाही भरभक्कम आधार लाभला. शहरी व ग्रामीण नवमध्यमवर्गात त्यांचे नेतृत्व रुजले. जे नवे आहे ते स्वीकारून, जुन्याशी त्याचा बेमालूम सांधा जुळवायची एक विलक्षण हातोटी यशवंतरावांजवळ होती. म्हणून रॉयवाद आणि गांधीवाद या दोन्ही वैचारिक टोकांना ते स्पर्श करून आले असले तरी त्यांनी व्यवहार्यता, वास्तवता कधी डोळ्याआड होऊ दिली नाही. त्यांचा आदर्श पंडित जवाहरलाल नेहरू. डावीकडे वळणारा मध्यममार्ग हा त्यांचा वेग. गांधीजींप्रमाणे खेड्यांचे अवास्तव उदात्तीकरणही नाही आणि रॉय यांचे आंतरराष्ट्रीय कामगारक्रांती वगैरे हवेतले किल्लेही नाहीत. राष्ट्रीय प्रवाह त्यांनी मुख्य मानला व या प्रवाहाशी-काँग्रेसशी आपले नाते त्यांनी कधी तुटू दिले नाही. मग तो प्रसंग सत्यशोधक चळवळीपासून पूर्ववयात अलग होण्याचा असो, शेतकरी – कामगार पक्षाला रामराम ठोकायचा असो, संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे म्हणण्याचा असो, किंवा अगदी शेवटच्या कालखंडातील इंदिरा गांधीप्रणीत काँग्रेसपक्षात पुन्हा प्रवेश करण्याचा असो. त्यांनी भूमिका अचानक व अनेकदा बदलल्या; पण या बदलामागे एक सूत्र दिसते. राष्ट्रीय सत्ताप्रवाहापासून आपण अलग पडत आहोत असे

त्यांना आढळून आल्यावर त्यांनी, लोकमत किती अनुकूल-प्रतिकूल होईल याची क्षिती न बाळगता, या प्रवाहाशी पुन्हा आपले राजकारण जुळवून घेतले. वैयक्तिक मानापमान गौण मानले. सत्तेपासून वंचित राहणे त्यांच्या तब्बेतीला मानवणारे नव्हते. नेहरू होते तोवर या सत्ताप्रवाहाची वळणे-वाकणे, त्यातील भोवरे त्यांच्या ओळखीची होती. कारण या दोघांची सत्ता हाताळण्याची शैली, राजकीय ध्येयवाद, आदर्श सारखेच होते. सत्तेशिवाय दोघेही राहू शकत नव्हते; दिल्लीत नेहरू तसे मुंबईत यशवंतराव सत्तास्थानी शोभून दिसत होते. 'स्वगृही' वाटत होते. माफक ध्येयवाद होता. उदारमतवादी दृष्टिकोन होता. विचारवंतांची, कलावंतांची, साहित्यिक-रसिकांची ऊठबस होती. नेहरूंचे आणि त्यांचे गोत्र जमले होते. नेहरू गेले आणि दिल्ली यशवंतरावांना पुढे सारखी चकवतच राहिली. लालबहादुर शास्त्रींच्या काळात ते संरक्षणमंत्रीपदावरच होते, भावी पंतप्रधान म्हणून दिल्लीत या काळात त्यांच्याकडे पाहिले जात होते हे खरे; पण हा कालखंडच फार अल्प होता. किंबहुना नेहरू आणि इंदिरा गांधी या दोन मुख्य कालखंडातला हा 'मध्यतर' होता असेही म्हणता येईल. या मध्यंतरातही एक संधी दैवाने त्यांना अशी दिली होती की, जर ती यशवंतरावांनी झडप घालून हस्तगत केली असती तर पंतप्रधानपद अलगद त्यांच्याकडे चालत आले असते. ६५ चे भारत-पाक युद्ध ही ती संधी. काश्मीरवरचा पाकिस्तानी सैन्याचा दाब सैल करावयाचा असेल तर लाहोरच्या दिशेला दुसरी आघाडी उघडणे भाग आहे असा आपल्या सेनाधिकाऱ्यांचा आग्रह. हा आग्रह शेवटी मान्य झाला. लाहोरच्या दिशेने आपल्या फौजा निघाल्या. एवीतेवी फौजा निघाल्याच तर लाहोरवर पूर्ण कबजा करूनच परत या असा सल्ला देणे, संरक्षणमंत्री या नात्याने यशवंतरावांना अवघड होते का? लाहोरवर असा कबजा न मिळाल्याने ६५ चे भारत-पाक युद्ध अनिर्णितच राहिले. बांगलादेश युद्धात इंदिराजींनी असे धाडस दाखविले, डाक्का सर करून पाकिस्तानी सैन्याला शरण आणले व आपल्या विजयावर शिक्कामोर्तब करून टाकले. अशी काही घडाडी यशवंतरावांनी ६५ सालच्या युद्धात संरक्षणमंत्री म्हणून दाखवायला हवी होती. लालबहाद्दुर शास्त्रींचे मन यासाठी तयार करायला हवे होते. अखिल भारतीय नेतृत्व प्रस्थापित करण्याची त्यांना लाभलेली ही पहिली संधी होती. चीनच्या युद्धात त्यांना काहीच करण्यासारखे उरले नव्हते. ते संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीत दाखल झाले तेव्हा युद्ध संपलेले होते. मेननसाहेबांनी संरक्षणखात्याचा करून ठेवलेला राडा साफ करणे एवढेच कार्य शिल्लक होते. हे काम अर्थातच त्यांनी नंतर चोखपणे केले. कारण कुशल प्रशासक म्हणून त्यांची योग्यता मोठी होती; पण प्रशासक वेगळा आणि सेनापती वेगळा. सेनापती झेंप घेतो. प्रशासक जमीन साफसूफ करतो. बांगलादेशयुद्धात डाक्का सर करून जसे पुन्हा सोडून दिले, पाकिस्तानी सैन्याला शरण यायला लावून भारतीय सैन्य जसे परतले, तसे ६५ च्या युद्धात लाहोर शहराबाबत करायला हवे होते. सैन्याची मानसिक तयारी होती, साधनसामग्री-मनुष्यबळ कमी नव्हते; पण असे निर्णय राजकीय नेतृत्वाने घ्यायचे असतात. लालबहाद्दुर शास्त्रींकडून असा निर्णय घेतला जाणे शक्य नव्हते. ते पडले पूर्ण गांधीवादी; पण यशवंतरावांना शिवाजी-बाजीराव यांचे स्मरण व्हायला हरकत नव्हती. संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेल्यावर पंजाबकडे जाताना, वाटेत गाडी थांबवून, त्यांनी पानपतच्या रणक्षेत्राला मूक श्रद्धांजली अर्पण केली होती. तेथील धूळ मस्तकी धारण केली होती. हे सगळेच आज स्वप्नरंजन आहे; पण जर यशवंतरावांनी आपल्या अस्तित्वाची अशी काही नेत्रदीपक चुणुक दाखवून दिली असती तर पुढचा सगळा इतिहासच बदलला असता. भारताचे पंतप्रधानपद लालबहाद्दुरांनंतर यशवंतरावांकडे आपोआप चालतच आले असते. नाही तरी बांगलादेश युद्धातील निःसंदिग्ध विजय हाच निरपवाद इंदिरासत्तेचा पाया ठरला. ६५ साली अर्धेमुर्धे यश पदरात पडले, काश्मीर फक्त वाचवता आले तरी भारतात विजयानंदाची केवढी लाट तेव्हा उसळली होती! लालबहाद्दुर शास्त्रींच्या लोकप्रियतेला तेव्हा उधाण आले होते आणि संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांना, मुंबईतील शिवाजीपार्कच्या सभेत, पु. ल. देशपांडे यांच्या सारख्या मान्यवर साहित्यिकाने मानाचा जाहीर मुजरा घातला होता! बांगलादेशयुद्धातील विजयश्री हा जसा इंदिरासत्तेचा पाया ठरला तसा लाहोरवरील तिरंगा ही यशवंतरावांच्या अखिल भारतीय नेतृत्वाची आरंभ—पताका ठरू शकली असती. तशी वेळ व स्थान सगळे जुळून आलेले होते; पण असे काही इतिहास घडवणारे, इतिहासाला कलाटणी देणारे धाडस करण्याची प्रेरणा त्यांना त्या वेळी झाली नाही हे खरे; नेहरू-संस्कार प्रबळ ठरले, असेही असेल; पण ही

अंधारातली उडी त्यांनी त्या वेळी घेतली असती तर? फलटणच्या राजवाड्यातून 'महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे' अशी घोषणा करून त्यांनी अंधारातली उडी घेतलीच होती. सारा महाराष्ट्र त्यांच्यावर यामुळे खवळला. एक वादळच त्या वेळी त्यांनी अंगावर घेतले; पण ही अंधारतली उडी त्यांना प्रकाशाकडे – यशाकडे नेणारी ठरली. वादळ शमले–त्यांनी आपल्या कौशल्याने ते शमवले व मुंबईच्या मुख्यमंत्रीपदावरची मांडही अधिक पक्की केली. दिल्लीच्या विशाल सत्तापटावरहीं असेच काही तरी उलथापालथ करणारे घडायला हवे होते. कृष्णेच्या प्रवाहात ज्या नेतृत्वाने बेधडक उडी घेतली त्या नेतृत्वाला यमुनेचा डोह अनोळखी व फार धोकादायक वाटला असावा का? पुढे अशी संधी यशवंतरावांकडे चालून आलीच नाही. एक शक्यता जनतापक्षाची सत्ता कोसळत असताना निर्माण झाली होती तेवढीच – मोरारजींशी हातमिळवणी करून पुन्हा ते अत्युच्च नाही तरी उच्च सत्तास्थानी येऊ शकत होते; पण एकूण दिल्लीचे राजरस्ते त्यांना मुंबईसारखे यशदायी ठरले नाहीत खरे! इतिहासकाळापासून चालत आलेले महाराष्ट्राचे हे एक अभाग्य आहे. महादजी शिंदे असेच दिल्लीपर्यंत गेले. दिल्ली जवळजवळ त्यांच्या कबजात आली. साऱ्या उत्तरेत त्यांचा केवढा दबदबा! त्यांची गोड मिठ्ठास वाणी! दिल्लीच्या बादशाहाकडून किती सनदा त्यांनी गोळा केल्या होत्या! पण पाटीलबावा, महादजी शिंदे स्वत: काही दिल्लीपती कधी झाले नाहीत! इतिहासाची ही पुनरावृत्ती की, यशरावांचेच शब्द वापरायचे तर हा 'नियतीचा हात' की, ज्याची त्याची ही स्वभावप्रकृती? शेवटी यशवंतरावांनी जे मध्यममार्गी राजकारण केले, ज्या नव्या मध्यमवर्गाचे ते राजकारणातील प्रतीक होते, त्याच्याही काही स्वभावगत मर्यादा आहेतच. एरवी यशवंतरावांच्या ठिकाणी नंतरनंतर दिसून आलेला अतिसुरक्षिततावाद, जराही धोका न पत्करण्याची वृत्ती आली असावी कुठून? कुठूनही आलेली असो, पुढचा काळच एकदम वेगळा आला. इंदिराजींचा साहसवाद, त्यांचे राजकारणातील धक्कातंत्र यशवंतरावांच्या लोकशाही,मध्यममार्गी तब्येतीला नीटसे मानवलेच नाही. राजीव आल्यावर यशवंतरावांच्या गुणांचा देशाला पुन्हा उपयोग होऊ शकेल अशी शक्यता अनेकांना वाटत होती; पण असा सुदिन उजाडण्यापूर्वीच यशवंतरावांची प्राणज्योत मावळली. देश एका अनुभवसंपन्न नेत्याला मुकला! सध्याच्या अनिश्चित व अस्थिर कालखंडात तर त्यांचे मार्गदर्शन, त्यांचा सल्ला देशाला विशेषच उपयुक्त ठरला असता.तसा योग नव्हता. त्यांच्या स्मृतीला प्रणाम! □


**वास्प** **खोल विहिरीकरिता व कूप नलिकेकरिता**

**इजेक्टो टरबाईन व सबमर्सिबल पंप.**

**विक्रीनंतर सेवा हे वैशिष्ट्य**

❋

**वॉटर सप्लाय स्पेशालिस्टस् (प्रा.) लि.**

**१५१, थंबू स्ट्रीट,**

**मद्रास – १**

# इंदिराजींनंतरचा भारत कसा असेल ?

प्रत्येक राजकीय नेतृत्वाची स्वतःची अशी एक 'शैली' असते, 'स्वभाव' असतो, सर्वोच्च स्थानावर असलेल्या व्यक्तीचा प्रभाव तर सर्वस्पर्शी असतो, विशेषतः भारतात तो तसा होता. त्यामुळे सतत १८ वर्षे राज्य केलेल्या इंदिरा गांधींचे निधन झाल्यावर 'पुढे काय ?' हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात घर करून आहे. परराष्ट्रीय धोरणात आता काय बदल होणार ? आपण अमेरिकेकडे झुकणार का ? देशाचे ऐक्य टिकवण्यात इं. कॉं. पक्ष यशस्वी होईल का ? असे अनेक प्रश्न आपल्या भवितव्यासंबंधीचे. कारण पंतप्रधानपदाचा झालेला खांदेपालट हा पक्षातल्या पक्षात आणि घराण्यातल्या घराण्यातच झाला असला तरी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आणि राजकीय जीवनात मुरलेल्या व्यक्तीकडून राजकारणातल्या नवोदिताकडे असा झाला आहे.

मग यापुढच्या घटना कसा आकार घेतील ? बंगलोरच्या Herald Review ने रजनी कोठारी, बॅ. वि. म. तारकुंडे, अशोक मित्रा (प. बंगालचे अर्थमंत्री, कम्युनिस्टनेते), मेरी कॅरेस, स्टॅनले कोचानेक, रॉबर्ट हार्डग्रेव्ह या भारतीय व अमेरिकन राजकीय अभ्यासकांच्या मुलाखती घेऊन या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. 'माणूस'च्या वाचकांसाठी या मुलाखतींचा अनुवाद येथे देत आहोत—

## पाश्चात्य तंत्रज्ञान, अधिक उजवी धोरणे

—रजनी कोठारी

**प्रश्न :** राजीव गांधींच्या कारकीर्दीत दोन महासत्तांबाबत (अमेरिका–रशिया) च्या धोरणात काही फरक पडेल का ? विशेषतः भारत अमेरिकेकडे झुकेल असे वाटते का ?

**रजनी कोठारी :** परराष्ट्रीय धोरणात मूलभूत बदल होणार नाही. काही महिने तरी मूळ चौकट तीच राहील; परंतु राजीवचा आतापर्यंतचा एकंदर दृष्टिकोन पाहता तो व्यवस्थापकीय तंत्राने सत्ता वापरणार असे दिसते. हा व्यवस्थापकीय दृष्टिकोन (Managerial approach) त्याच्या पाश्चात्य तंत्रज्ञान आणि उद्योग यांची भारतात सरसकट आयात करण्याच्या प्रवृत्तीत दिसून येतो. अरुण सिंग व अरुण नेहरूंसारखे राजकारणाबाहेरचे सल्लागार राजीव गांधींना जवळचे वाटतात. ते पाश्चात्यांकडे झुकण्याचाच सल्ला राजीवला देणार. इंदिरा गांधींच्या कारकिर्दीतही अलीकडे त्यांचे धोरण पश्चिमेला अनुकूल असे होत होते ते राजीवच्या सल्ल्यामुळेच.

दुसऱ्या बाजूला अमेरिकेसारखी राष्ट्रे शस्त्रविक्रीसाठी भारत, चीन यांसारख्या देशांकडे डोळे लावून बसलेली आहेत. औद्योगीकरणात झालेल्या प्रचंड प्रगतीचा परिणाम शस्त्रास्त्र वाढण्यावरही होतो आणि राजीव गांधींसारख्या पाश्चात्य तंत्रज्ञानावर अवलंबून राहणाऱ्या प्रवृत्तांमुळे पाश्चात्यांच्या शस्त्रास्त्रांवरही तेवढ्याच प्रमाणात भारत अवलंबून राहणार आहे.

नेहरूंच्या काळातील जी. पार्थसारथींसारख्या व्यक्तीला आज किती प्रमाणात महत्त्व मिळेल, यावरही भारत अमेरिकेकडे झुकेल किंवा नाही हे अवलंबून आहे. दोन अरुण आणि राजीवला पार्थसारथींसारख्यांचे धोरण पटेल असे वाटत नाही.

परराष्ट्रधोरण किंवा परराष्ट्र मंत्रालय म्हणजे केवळ परराष्ट्रमंत्री असे समीकरण इंदिरा गांधी आणि पार्थसारथी यांचे होते. मंत्रालयातील अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांना आणि मुत्सद्द्यांना हे धोरण आवडत नव्हते. साहजिकच आताही 'पार्थसारथी-धोरण' संपुष्टात आणले जाईल, प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वर्चस्व परराष्ट्रधोरणातही राहील.

**प्रश्न :** शेजारी राष्ट्रांशी असलेल्या संबंधात काही गुणात्मक फरक पडेल का ? भारतातील सध्याच्या अस्थिरतेचा फायदा पाकिस्तान उठवण्याची कितपत शक्यता वाटते ?

**रजनी कोठारी :** भारताचे पाकिस्तानशी असलेले संबंध सुधारण्यापेक्षा भावी काळात बिघडण्याचीच जास्त शक्यता वाटते. राजीव गांधींची पाकिस्तानविरोधी भूमिका अनेक वेळा पुढे आली आहे आणि वर सांगितल्याप्रमाणे भारत शस्त्रास्त्रखरेदीवरील खर्चही कमी करणार नाही. पाश्चात्य शस्त्रास्त्रांची ज्या प्रमाणात भारतात आयात होईल त्या प्रमाणात दोन्ही देशांमधील दरी वाढत जाणार आहे.

या तणावात जन. झियाही भरच टाकतील असे आज तरी जाणवते नुकत्याच झालेल्या भारतभेटीच्या वेळी फाळणी न बघितलेल्या तरुण पिढीकडे पाकिस्तानचे नेतृत्व येईल आणि द्वेषभावना नष्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल असे जे झिया म्हणाले त्याला औपचारिकतेपलीकडे फारसे महत्त्व नाही. अणुबॉंब बनविण्याचा पर्याय पाकिस्तानने विचारार्थ ठेवला आहे, भारताच्या सुरक्षिततेला तो मोठाच धोका आहे आणि आण्विक शस्त्रास्त्रे जमवायला पाकिस्तानने सुरुवात केली तर त्याच भाषेत उत्तर देण्यापेक्षा राजीवकडे दुसरा पर्याय नाही. अगदी प्रत्यक्ष संघर्षाला तोंड फुटण्याचीही

शक्यता पुढील काळात नाकारता येत नाही.

इंदिरा गांधी या अलिप्त राष्ट्रांच्या नेत्या होत्या. जगात शांततेच्या विचारांचं प्रतिनिधित्व करताना साहजिकच त्यांच्यावर मोठी जबाबदारी होती व या जबाबदारीच्या जाणिवेतूनच त्यांना शेजारी राष्ट्रांबाबतचे धोरण ठरवावे लागे. 'अलिप्त गटाचा नेता' ही प्रतिमा नसल्यामुळे त्याबरोबर येणारी जबाबदारीही राजीव गांधींना सांभाळावी लागणार नाही. या सर्वच दृष्टीने भारत–पाक संबंधात तणाव राहण्याचीच शक्यता वाटते.

**प्रश्न :** राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील इंदिरा काँग्रेस पक्ष देशाला एक ठेवू शकेल का? विशेषतः हे नवं नेतृत्व पुरेसं प्रस्थापित झालेलं नसताना इंदिरा काँग्रेस पक्ष समर्थपणे देशाचा गाडा हाकू शकेल का? किमान स्वतःच्या पक्षावर पकड राजीव निर्माण करू शकेल का?

**रजनी कोठारी :** 'फोडा आणि राज्य करा' हे राज्य करण्याचे इंदिरा गांधींचे सूत्र होते. त्यामुळे राजकीय जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ऐक्यापेक्षा फूट पाडण्याकडेच त्यांची प्रवृत्ती दिसते आणि असे धोरण राबवणारी व्यक्ती अचानक गेल्यामुळे फारच अस्थिर आणि विघटित अशी राजकीय परिस्थिती आपल्यासमोर आहे. लोकांनी निवडून दिलेले सरकारही पाडायला त्या मागेपुढे पहात नसत; पण त्यांच्यामागे लोकप्रियतेचे एक जबरदस्त वलय असल्यामुळे अशा गोष्टी खपून जात असत. सरकारबद्दल कितीही तिरस्कार लोकांच्या मनात निर्माण झाला तरीही इंदिरा गांधी यांच्या करिश्म्यावर राज्य व्यवस्थित चालू शके. राजीवच्याबाबतीत तसे नाही. प्रत्येक विधान करताना, प्रत्येक निर्णय घेताना राजीवला १० वेळा विचार करावा लागेल आणि त्यामुळेच राजीवच्या कारकीर्दीत इंदिरा काँग्रेस पक्षाच्या रचनेत, कार्यपद्धतीत बदल होईल.

नवपंतप्रधानाच्या काळात नोकरशाही आणि तंत्रज्ञान यांना महत्त्व येत जाऊन सरकारमधील राजकारण्यांचा प्रभाव ओसरत जाण्याची चिन्हे दिसत आहेत. पोलीसयंत्रणा अयशस्वी ठरते असे दिसल्याबरोबर लष्कराला वारंवार बोलावणं हेच या काळात घडणार आहे आणि असं जिथे जिथे वारंवार घडतं अशा इतर विकसनशील राष्ट्रांचे काय झाले हे आपण पहातोच आहोत. प्रशासकीय आणि लष्करी हस्तक्षेपाने कोणताही प्रश्न सुटत नाही हे अनेक वेळा सिद्ध झालेले आहे. अशा प्रकारे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणारा फिलिपाइन्सचा मार्कोस अखेर हुकुमशहा बनला!

दुर्दैवाने हा धोका भारतालाही आहे. राजकीय तोडगा काढण्याची कुशलता किंवा कुवत राजीव गांधींकडे आहे असे मुळीच वाटत नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न किंवा सद्याची विघटनकारी परिस्थिती यांचे योग्य आकलन करणारी दृष्टीही राजीवजवळ नाही. जात–धर्म–प्रांत या भेदांनी जर्जर झालेल्या समाजाला ऐक्याची संजीवनी देण्याचे सामर्थ्य राजीवकडे आहे असे कोणाला वाटत असेल तर ते स्वप्नरंजनच आहे.

प्रशासनामध्ये तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढल्यामुळे राजकारण आणि प्रशासन यात फारकत पडेल, इंदिरा काँग्रेसपक्षात ध्रुवीकरणाची प्रक्रिया सुरू होईल आणि गटागटात, व्यक्तीव्यक्तीत विभागलेल्या पक्षात नवं नेतृत्व झपाट्याने प्रस्थापित होणंही अवघड ठरेल.

**प्रश्न :** इंदिरा गांधींच्या मृत्यूचे राजकीय परिणाम काय संभवतात? निरनिराळ्या राज्यांत इं. काँ. ने दंगली घडवून आणल्या असे आरोप होत आहेत. त्यामुळे आता अल्पसंख्यांकांपासून इं. काँ. दूर जाईल का?

**रजनी कोठारी :** वास्तविक इंदिरा गांधींच्याच काळात अल्पसंख्यांक या पक्षापासून दूर जायला सुरुवात झाली होती. हरिजन, भटक्या–विमुक्त जाती, मुसलमान आणि हिंदूमधील अत्युच्च वर्ग हा इंदिरा काँग्रेसचा मतदारवर्ग; पण तोही गेल्या काही निवडणुकांत इंदिरा गांधींपाठीमागे त्या प्रमाणात नव्हता. हिंदी पट्ट्यामधील त्यांचा प्रभावही कमी झाला होता. भारतातील उजवी मानली जाणारी भाजपची शक्ती यापुढील काळात काँग्रेसच्या जवळ येईल. काँग्रेसशी अनुकूलता दर्शवण्याचे रा. स्व. संघाचे धोरण वाजपेयीसारख्यांना मान्य नसले तरी भाजपसारखा पक्ष राजीव गांधींच्या काळात काँग्रेसच्या सान्निध्यात येण्याची दाट शक्यता आहे. जाहीरपणे 'उजवी' भूमिका न घेणाऱ्या छुप्या उजव्या शक्तींशी राजीव हातमिळवणी करणार.

## इंदिराजींचा वारसा सांभाळणार

**–वि. म. तारकुंडे**

**प्रश्न :** रशिया, अमेरिका या दोन महासत्तांशी असलेल्या संबंधात काही फरक पडेल का? विशेषतः भारत अमेरिकेकडे झुकण्याची शक्यता आपल्याला वाटते का?

**वि. म. तारकुंडे :** आजपर्यंतच्या परराष्ट्रधोरणात काहीही फरक पडणार नाही. रशियाशी जास्त मित्रसंबंध आणि त्यामुळे साहजिकच अमेरिकेशी दुरावलेले असे आपले परराष्ट्रधोरण आहे. राजीव गांधींनी याच धोरणाला गेल्या २ वर्षात पाठिंबा दिलेला आहे. राजीव–अरुण कंपनीला असलेल्या पाश्चात्य तंत्रज्ञानाच्या आकर्षणाचा परराष्ट्रधोरणावर परिणाम होईल असे वाटत नाही.

रशियाशी असलेले मित्रसंबंध कायम ठेवून अमेरिकेशी जवळीक साधणं भारताच्या दृष्टीने फायद्याचे आहे; पण इंदिरा गांधींनी तसे कधीच केले नव्हते व राजीवच्या बाबतीत इतक्या लवकर काही विधान करणं हे अनुचित ठरेल.

**प्रश्न :** भारताच्या शेजारी राष्ट्रांशी असलेल्या संबंधात काही गुणात्मक फरक पडेल का? देशाच्या अस्थिर राजकीय परिस्थितीचा फायदा पाकिस्तान उठवेल असे वाटते?

**वि. म. तारकुंडे :** ह्याही बाबतीत इंदिराजींचंच धोरण राजीव पुढे चालवेल. शेजारी राष्ट्रांशी असलेले संबंध दृढ करण्याबाबत इंदिरा गांधींना फारशी आस्था नव्हती. उलट प्रत्येक वेळी शेजारी राष्ट्रांच्या आक्रमणाचा बागुलबुवा उभा करून या राष्ट्रांना बदनाम करण्याचेच काम त्या करत होत्या. प्रत्येक अंतर्गत प्रश्नात त्यांना 'परकीय हात' दिसत असे. त्यामुळे भारताचे शेजाऱ्यांशी संबंध बिघडले होते.

मानवतावादाच्या दृष्टिकोनातून शेजारी राष्ट्रांशी संबंध प्रस्था-

पित करणे ही खरी गरज आहे; पण ती वृत्ती इंदिरा गांधींची नव्हती आणि राजीवचीही नाही.

**प्रश्न :** देशाला इंदिरा काँग्रेसपक्ष आता एक ठेवू शकेल का? विशेषत: इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर राजीव गांधींसारख्या अतिशय नव्या नेत्याला देशात ऐक्य प्रस्थापित करता येईल का? पक्षावर तो आपला जम बसवेल का ?

**वि. म. तारकुंडे :** इंदिराजी कायम मूल्यहीन राजकारण खेळत राहिल्या. त्यांच्या राजकीय जीवनात सत्ता हा महत्त्वाचा घटक होता. सत्ता मिळवणे, टिकवणे, अधिक केंद्रित करणे हा त्यांच्या राजकारणाचा स्थायीभावच बनून गेला होता. त्यांच्या राज्यात निरनिराळ्या पातळ्यांवर गंभीर प्रश्न त्यांच्या सत्ताकारणाने निर्माण केले होते. पंजाब, आसाम, जम्मू–काश्मिर या समस्या म्हणजे त्यांच्या राजकीय डावपेचांचीच फळे आहेत आणि या मूल्यहीन राजकारणाचा कळस गाठला जात असतानाच राजीव गांधी पक्षाचे सरचिटणीस होते! आणि गंमत म्हणजे प्रत्येक ठिकाणी फूट पाडणारा इंदिरा काँग्रेस पक्ष आज राष्ट्रीय एकात्मतेवर अधिकारवाणीने भाष्य करतो आहे !

राजकारणाचे गुन्हेगारीकरणही इंदिरा काँग्रेस पक्षात फार मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. 'गुंड–राज्य' काँग्रेसनेच या देशात अस्तित्वात आणले आणि 'एकच नेता' हे त्या पक्षाचे वैशिष्ट्य होते. इंदिरा गांधींशिवाय कोणीही नेता नाही अशी पक्षाची स्थिती होती. राजीव गांधींच्या काळात बदल झाला असेल तर तो हा की पूर्वी ज्यांना अवाक्षरही काढता येत नसे ते नेते ( राज्याचे मुख्यमंत्री ) आता पक्षातील प्रभावी शक्ती बनल्या आहेत. ही एक निरोगी प्रवृत्ती आहे. ती इंदिरा काँग्रेस पक्षात येण्याची आज शक्यता वाटते.

**प्रश्न :** इंदिरा गांधींच्या आकस्मिक मृत्यूचे राजकीय परिणाम काय संभवतात ? अल्पसंख्यांक या पक्षापासून दूर जातील असे वाटते का ? नुकत्याच घडलेल्या (दिल्ली) दंगलींमध्ये इं. काँ. चा 'हात' होता. त्यामुळे अल्पसंख्यांक त्यांच्यापासून दुरावतील ?

**वि. म. तारकुंडे :** आज काँग्रेस हा हिंदूंचा पक्ष बनलेला आहे. पंजाबच्या आंदोलनसंदर्भात विशेषत: लष्करी कारवाईनंतर शीख-समाज काँग्रेसपासून पूर्णपणे दुरावला आहे, तर जम्मू–काश्मिर-प्रकरणात मुसलमान समाजाचेही तेच झाले आहे.

मात्र भाजप, रा. स्व. संघ, काँग्रेस यांची हातमिळवणी होण्याची सुतराम शक्यता नाही.

## ढासळणारी संघटना – इं. काँ.

**–अशोक मित्रा**

**प्रश्न :** इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर राजकीय रंगमंचावर काय बदल होईल ? कमलापती त्रिपाठी यांच्यासारख्या व्यक्तींना राजीव गांधी या काळात महत्त्व देईल असे वाटते का ?

**अशोक मित्रा :** इथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, इंदिरा काँग्रेस ही संघटना असलीच तर ढासळणारी संघटना आहे. दोन-चार व्यक्तींबाबतचे धोरण बदलले म्हणून त्याचा लोकांना काहीही फायदा नाही व हा पक्षही सुसंघटित होणार नाही.

मुळात या पक्षाला कोणताही कार्यक्रम किंवा विचारसरणी नाही आणि याचा फायदा सरंजामशाही मनोवृत्तीचे लोक आणि भांडवलदार नेहमीच करून घेत आलेले आहेत. ज्या समाजात 'करिश्मा' मते मिळवून देतो त्या ठिकाणचा समाज दुर्बल असतो हे मान्य केले पाहिजे. आर्थिक, सामाजिक बदल घडविण्याची इच्छा व कुवत नसलेल्या पक्षाला उचलून फेकून देण्याइतकी जागरूकता आपल्या समाजात नाही. ज्या लोकप्रियतेच्या वलयावर इतके दिवस इं. काँ. पक्ष तरून जात होता ते आता संपले असल्यामुळे ह्या पक्षाची छकले उडायला वेळ लागणार नाही. फक्त ती निवडणुकीपूर्वी उडतात की निवडणुकीनंतर हे आता बघायचे.

**प्रश्न :** इंदिरा गांधींच्या मृत्यूचे राजकीय परिणाम काय संभवतात ? जात, धर्म, प्रांत यात विभागलेल्या समाजाला राजीवच्या नेतृत्वाखालील इं. काँ. पक्ष एकत्र ठेवू शकेल ?

**अशोक मित्रा :** इंदिरा काँग्रेस हा पक्ष स्वत:च विघटन घडवायला कारणीभूत ठरला आहे आणि या पक्षाने ऐक्याचे नारे लावावेत हे आश्चर्यकारकच आहे. या पक्षाच्या संधिसाधू राजकारणानेच आसाम–पंजाबचे प्रश्न निर्माण केले,जास्त तीव्रतेने पेटवत ठेवले.भिंद्रानवालेंचा उदय या पक्षाच्या उत्तेजनामुळेच झाले ना आहे.प्रांतीय-जातीय प्रवृत्तींना खतपाणी घालून आपले नेतृत्व भक्कम करण्याचा प्रयत्न करणं ही या पक्षनेतृत्वाची रीत होती–आहे. आसाममधील प्रांतीयवाद कोणामुळे उफाळून आला हे पाहिले तर त्यालाही हाच पक्ष जबाबदार आहे. त्रिपुरातल्या हिंसाचारी प्रवृत्तींना डोके वर काढून देण्याचे कारस्थानही याच पक्षाचे. त्रिपुरातील डाव्या आघाडीला नेस्तनाबूत करण्यासाठी १९८३ च्या विधानसभा निवडणुकीत इं. काँ. ने 'त्रिपुरा उपजाती युवा समिती' या अतिरेकी शक्तीला जवळ केले. अलीकडेच झालेल्या मिझोराममधील निवडणुकांबाबतही हेच घडले.

त्यामुळे देशाचे ऐक्य टिकवण्यासाठी इं. काँ. पक्षाची आवश्यकता नसून, इथल्या लोकांना एकत्र राहण्याची इच्छा आहे तोपर्यंत देश एक राहील.

ज्यांनी राष्ट्र घडवलं त्यांनाच आपली अंतर्गत स्वायत्तता टिकवावीशी वाटते, यात विरोधाभास नाही हे स्पष्ट आहे. म्हणूनच राजीव गांधींना देशाचे ऐक्य टिकवायचे असेल तर सत्तेचे विकेंद्रीकरण, राज्यांना स्वायत्तता हाच चांगला पर्याय आहे. केंद्र आणि प्रांत यातील सत्तासमतोलच देशातील विघटनकारी शक्तींना निष्प्रभ करू शकतो.

**प्रश्न :** देशाच्या आर्थिक धोरणात बदल होईल का ? विशेषत: खासगी क्षेत्राला ( Private Sector ) यापुढील काळात प्रोत्साहन मिळेल का ? परकीय गुंतवणूक, परकीय तंत्रज्ञानाची आयात या संदर्भात राजीव गांधींच्या काळात काय धोरण असेल ?

**अशोक मित्रा :** मगाशीच सांगितल्याप्रमाणे कुठल्याही परिवर्तनाच्या मुळाशी व्यक्ती असू शकत नाही असे माझे स्पष्ट मत आहे. आर्थिकदृष्ट्या चांगला किंवा वाईट बदल व्यक्ती घडवून आणणार नाही.

गेल्या काही वर्षात इं. काँ. पक्ष आणि सरकारने आर्थिक बाबतीत

पृष्ठ २७ वर

# कोयना धरणग्रस्तांची वाताहत

प्रा. पुरुषोत्तम शेठ

□

'कोयना जलविद्युतकेन्द्र बंद पडल्यास महाराष्ट्राचे रोजचे ५०० रु. कोटींचे औद्योगिक उत्पादन बुडते.' –माजी मु. मं. शरद पवार.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात कोयनाधरणाचे किती महत्त्वपूर्ण स्थान आहे हे वरील माजी मुख्यमंत्र्यांच्या विधानावरून आपल्या लक्षात येईल. २७५ फूट उंचीचा, जवळजवळ दोन फर्लांग लांबीचा व ७० किलो मीटर पाणी पसरलेला ५०० फूट खोलीचा शिवसागरचा डोह घेऊन उभे असलेले कोयना धरण हे महाष्ट्राचाच नव्हे तर एकूण राष्ट्राचाच मोठा खजिना आहे. या कोयनाधरणाच्या निर्मितीत ज्यांनी त्याग केला त्या धरणग्रस्तांचे प्रश्न तितकेच महत्त्वाचे आहेत. आपण कोयनाधरणाच्या निर्मितीचा इतिहास, त्याचे भूक्षेत्र, त्यावर झालेला खर्च या सर्वाची गंभीरपणे दखल घेऊन प्रश्न सोडवणुकीतील गुंतागुंत कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर ही गुंतागुंत कमी केली नाही तर उध्वस्त झालेल्या जीवनातील असंतोष उद्या 'आमचे पाणी आमची वीज' म्हणत विद्युतवाहक ताराही तोडायला कमी करणार नाही एवढा हा प्रश्न गंभीर होत चालला आहे.

१९३३ साली महाराष्ट्रात प्रसिद्ध उद्योगपती टाटांनी कोयनापरिसराची पहाणी केली व अंदाजे ३३ कोटी खर्च येईल असा आपला प्रकल्प-आराखडा तयार केला. भारत स्वतंत्र होताच या धरणाच्या खर्चाचे अंदाज ६० कोटीपर्यंत गेले. जनतेच्या रेटघामुळे धरणाच्या पायाच्या पहाणीची सुरुवात झाली आणि १९४८ साली जळकेवाडी गावाजवळ हे सर्वेक्षण झाले. शासनाने ५ कोटी रुपये सर्वेक्षणावर खर्च केले. परंतु येथे पाया मजबूत नाही असा स्थापत्यशास्त्राचा अहवाल आल्यानंतर जवळजवळ ही योजना बास्तानात बांधण्यात आली. महाराष्ट्रातील जुन्या मुंबई राज्यातील उद्योगपती अस्वस्थ झाले. स्वतंत्र भारताच्या प्रभातकाळाच्या विकासाच्या काळातच हा अडथळा निर्माण झाला. शंकरराव किर्लोस्कर, धनंजयराव गाडगीळ, कर्मवीर भाऊराव पाटील, भाऊसाहेब हिरे, आचार्य अत्रे व विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी संस्था एकत्र आल्या आणि त्यांनी ५१ साली कोयनापरिषद हेळवाक येथे घेऊन पुन्हा कोयनाधरणाची मागणी सुरू केली. त्या वेळेस कोयनाधरणाच्या परिसराचे सर्वेक्षण करण्यात आले व तीन ते चार टप्प्यांत कोयनाधरणाचे काम करण्याचे नक्की केले. तीन टक्क्यांपर्यंत १ अब्ज ७० कोटी रु. चा अंदाज करण्यात आला. केन्द्र सरकार व राज्यसरकार आणि जागतिक बँक यांच्या सहकार्याने हे काम १९५४ साली सुरू झाले. हे तीन टप्पे असे : (१) कोयना धरण (२) बोगद्याद्वारे पोफळी येथे जलविद्युतकेंद्रे चालवणे (३) अलोरा येथे आणखी चार जनित्रे चालवणे व कोयनेच्या मूळ पात्रात सोडलेल्या पाण्यावर जनित्र चालवणे आणि आता चौथ्या टप्प्यात कोयनाप्रकल्पाने पदार्पण केले आहे, हा टप्पा असा—नावज्या येथील टॉवरच्या समोरच दुसरा टॉवर बांधून पोफळीच्या पलीकडे बोगद्याने पाणी नेऊन १२५ मेगॅवॅटची वीज निर्माण करणारी सहा जनित्रे २००० सालापर्यंत चालवणे व महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्राची विजेची गरज पूर्ण करणे. आज कोयनाधरणातून जी वीज निर्माण होते ती खालीलप्रमाणे आहे.

## विद्युतनफा

पोफळी येथे आज ५६० मेगॅवॅट, अलोरे येथे ३२० मेगॅवॅट व धरणाजवळ ४० मेगॅवॅट वीज उत्पन्न होते. जवळजवळ ९२० मेगॅवॅट वीज कोयना धरणावर निर्माण होते व चौथ्या टप्प्यात ७५० मेगॅवॅट वीज निर्माण होणार आहे. या विजेच्या उत्पन्नाचा आकडा जर पाहिला तर पोफळी येथील जलविद्युतपासून महाराष्ट्र शासनाला दर २४ तासाला २० लाख नफा मिळतो. पोळकेवाडीला २४ तासाला ७ लाख रु., अलोरे येथे जवळजवळ २४ लाख रु. नफा मिळतो. सबंध वर्षात कोयनाधरणातील जलविद्युतकेन्द्रामुळे महाराष्ट्र राज्य विद्युतमहामंडळाला १८५ कोटी रु. नफा मिळतो. ३१ मार्च ७८ रोजी या धरणाच्या बांधकाम व जलविद्युतकेन्द्रावर केलेल्या खर्चातून शासन कर्जमुक्त झाले. शासनाने कर्ज सव्याज फेडले व आज प्रत्येक युनिटमागे तीन पैसे नफा केन्द्रसरकारला व पाच पैसे नफा महाराष्ट्र सरकारला मिळतो.

आणि उद्योगपती, भांडवलदार यांना रोजचे नफाउत्पन्न सरासरी ५० कोटी मिळते. हे धरण ६५ कोटी रुपयात बांधले गेले. त्याचा अब्जाचा खर्च हा जलविद्युतकेन्द्राचा आहे. यावरून लक्षात येईल की, कोयनाधरण हे महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्राला मिळालेली कामधेनू आहे. महाराष्ट्राच्या राजधानीत जो सोन्याचा धूर निघतो आहे व कोयनाजलसिंचनामुळे कोयनाकाठापासून आंध्र कर्नाटकापर्यंत जी हरितक्रांती होते आहे व ज्यामुळे कृष्णा व कोयनाकाठच्या शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आली आहे त्याची जनक व जननी कोयनेची धरती आहे.कोयना धरण पुसून काढल्यास सांगलीपासून मुंबईपर्यंत सर्व भकास होईल ! आज हे धरण मूळ आराखड्यानुरूप बांधायला गेल्यास मूळ योजनेच्या दसपट खर्च येईल.

### कोयनाधरणग्रस्तांचे प्रकार

१) हे धरण, ही समृद्धी काहींच्या त्यागावर उभी आहे याचे सर्वांना विस्मरण होते आहे. कोयनेची लेकरे बारा वाटे केवळ जगण्यासाठी पांगली हा परिसर चार पद्धतींचा आहे. कोयनानदीचे मुख्य पात्र : कोयनेच्या नावजी, इंदवली, शिंदी, सोळसी, कांदारी या उपनद्यांच्या उगमापर्यंत कोयनाधरणात साठवलेले पाणी पसरले आहे. यासाठी महाबळेश्वर, जावळी व पाटण तालुक्यातील १६० गावे उठली. या १६० गावांना उठवण्याचे कारण धरणाचे पाणी हे २१६५ फूट समुद्रसपाटीपासून उंचीवर पसरेल. २१६५ फूट समुद्रसपाटीपासूनच्या उंचीवरील सर्व गावांना हलवणे सरकारला भाग पडले. शासनाने १८९८ च्या 'लँड अॅक्विझिशन' कायद्यानुसार १९५६ सालापासून कोयना पाणलोटक्षेत्रातील गावांच्या जमिनी ताब्यात घेण्यास सुरुवात केली. १९५९ सालापर्यंत शासनाने या वस्त्या ठाणे, कुलाबा, रत्नागिरी व सांगली जिल्ह्यांत हलविल्या.

२) १९६० साली पाणी तुंबवले व या वेळेस पाणलोटक्षेत्रात न येणारी परंतु कड्यावर असलेली वाहतुकीची गैरसोय असलेल्या गावांना नोटिसा देण्यास प्रारंभ केला.

३) कोयनाधरणग्रस्तांचे तिसरे स्वरूप वेगळेच आहे. कोयनाधरणाच्या नियोजनासाठी ज्या शासकीय वसाहती झाल्या, त्या वसाहतींसाठी शासनाने पाटण तालुक्यातील गोकुळ, देशमुखवाडी ही गावे उठवली. यांना त्यांच्या घरांपासून दूर नेताना त्यांच्या वसाहतीचा शासनाने विचार केला नाही. क्रूरपणे या नागरिकांच्या जमिनी हिसकावून भूकंपपूर्व टुमदार कोयनानगरी उभी केली!

४) कोयनाधरणग्रस्तांच्या आपद्ग्रस्तांत चौथा वर्ग वेगळाच आहे. लोक आजही त्यांना धरणग्रस्त मानण्यास तयार नाहीत. कोयनाधरणाच्या पाण्यावरील जलविद्युतगृहे ही रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील पोकली व अलोरे येथे आहे. या जलविद्युतगृहांसाठी व तेथील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी शासनाने २५ गावांची जमीन घर–जमीनजुमल्यासहित हस्तगत केली. या धरणग्रस्तांचा प्रश्न केवळ पाणलोटक्षेत्रातील नसून त्याच्या सर्व आनुवंशिक शासकीय वसाहती व जलविद्युतगृहे यांच्याशीसुद्धा संबंधित आहे.

### धरणग्रस्तांची आजची स्थिती

या धरणग्रस्तांच्या सोळशी खोऱ्यापासून रत्नागिरी जिल्ह्यापर्यंत मी पायी फिरलो आणि उध्वस्त चौथरे टीनपाटाची रांगच जावी अशी घरे प्रामुख्याने आढळली. शिंदी व कांदारी खोऱ्यात घुसल्यानंतर या प्रश्नाचे गांभीर्य अधिक जाणवले. कोयनेच्या कांदारी व शिंदी या उपखोऱ्यांत १७ गावे आहेत. या गावांची जमीन पाण्याखाली गेली आहे. मोरणी, शिंदी, उचाट, म्हाळुंगे या गावी मी फिरलो. प्रथम जाणवली वाहतुकीची प्रचंड अडचण! सातारहून बामणोलीला गेल्यानंतर जर दुपारी तीनची लाँच चुकली तर दुसऱ्या दिवशी तीन वाजेपर्यंत या परिसरात जायला लाँच नाही व सकाळी ८ ला तेथून लाँच सुटली की, परत जायला साधन नाही. हा भाग सातारा जिल्ह्यापासून पूर्णतया तुटला आहे. महसुली तालुका जावळी आहे. मेढ्याच्या मुख्य ठिकाणी जाणे म्हणजे चार दिवस मोडणे होय. या लोकांनी आपली मुख्य गावे सोडली नाहीत. जे या जागा सोडून कुलाबा, ठाणे, रत्नागिरी जिल्ह्यात गेले त्यातील अनेकजण परत आले. त्यांनी जंगले तोडून पुन्हा भात–खाचरे तयार केली. परिणाम फेब्रुवारी महिन्यात पाणी उतरताच 'मपल्के' गावापर्यंत बैलगाड्या नदीच्या मुख्य प्रवाहातून चालतात कारण जंगलतोडीमुळे या उपनद्यांचा प्रवाह गाळाने भरत चालला आहे. कोयनापरिसरातील जंगल सुरक्षित न ठेवल्यास कोयनेचा मुख्य प्रवाहही गाळाने भरायला वेळ लागणार नाही व दीडशे वर्षे आयुष्य असलेले कोयनाधरण शंभर वर्षांतच निकामी होईल. १८५ कोटी रुपये वर्षाला नफा मिळवणाऱ्या शासनाने याचा विचार केला पाहिजे की, दीडशे वर्षांचे धरणाचे आयुष्य ५० वर्षांनी कमी करणे म्हणजे १८५ कोटी रुपये नफा आपल्या हातून कोयनेच्या उदरात सोडून देणं होय. या क्षेत्रात मला एक जबाबदार कार्यकर्ते भेटले. ते म्हणाले, 'प्राध्यापक मित्रा, हे धरण जेवढ्या लवकर गाळाने भरेल तितके आम्हाला हवे आहे. कुणासाठी व कशासाठी त्याग? तुमच्या घरात २४ तास वीज झळकते. येथे रॉकेलचा दिवा टिमटिमता ठेवायला रेशनिंगचे दुकानही नाही! रेशनिंगचा दुकानदार भेटला. तो म्हणाला, 'अरे, तुला लायनीत उभे राहून तरी गहू, साखर मिळेल. येथे तर, महाबळेश्वरहून रेशनिंग धान्य तापोल्याला आणायचे, तेथे बाचकी करायची, नाववाल्याच्या हातापाया पडायचे. तेथून शिंदी, कांदाटीनदीच्या काठावर आणल्यावर मजुर मिळाला तर दुकानात नाही तर जंगलात बेवारशी माल पडून. पावसाळ्यात तर तीन महिने वाहतूकच नाही. मग हा सव्यापसव्य कोण करणार ? मी रेशनिंगचे दुकान सोडून दिले. या ३२ गावांत रेशनिंगचे दुकान नाही! साखर, रवा, मैदा ही या परिसरातील लोकांना त्यागाची मिळालेली कुपथ्ये होत! शिंदी, चकदेव व पर्बत ही गावे कड्यावर आहेत. जेव्हा तेथील कार्यकर्ते म्हणाले, 'आमचा पत्रव्यवहार रत्नागिरी जिल्ह्यामार्गे होतो. आमचा मुक्काम सातारा जिल्ह्यात. पोस्ट रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात. म्हैस व्यायली तर पहाटे कडे उतरून खेडमार्गे मुंबईला चार वाजता पोराला खरवस नेऊन देतो आणि सातारामार्गे गेल्यास चार दिवस लागतात. वाहतुकीच्या अडथळ्यांच्या शर्यतीची प्रथम जाणीव झाली. या ठिकाणी कोणत्याही वैद्यकीय सुविधा नाहीत. अंबवडे व रघुवीर घाट उतरून लोकांना खेडकडे जावे लागते. मी या अवघड घाटातून खोपी-शिरगाव येथे उतरून गेलो आणि विचार करू लागलो, आजारी माणसाची पालखी

वाहून नेताना मणका अन् मणका ढिला होत असेल! कोयनेने अनेक इस्पितळांना वीज पुरवली; पण येथे साध्या दवापाण्यासाठी मृत्यूशी दोस्तानाच करावा लागतो!

चिपळूणकडे येताच विद्युतगृहाखालील गावांना भेटलो. त्यांचे म्हणणे टुमदार वसाहतीत या कर्मचाऱ्यांची मुले राहतात. आमचे घर उध्वस्त झाले. शासनाला निरुपयोगी जागेवर घरे बांधण्यास जागा मागितली तर बिनकाळजाच्या पठाणी सावकाराप्रमाणे महाराष्ट्र शासनाने उत्तर दिले, 'दर महिना २०० रुपये भुईभाडे द्यावे लागेल. झोपडपट्टीतला दादा व महाराष्ट्र शासन यात फरक काय? जागा कुणाची? आज मालक कोण झाले? या जलविद्युतगृहासाठी जागा दिलेले चिपळूण तालुक्यातील लोक निर्वासित झाले. त्यांना ना घरे, ना जागा, अरबाच्या उंटाप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांच्या घरात घुसले. विद्युतवसाहतीतील शाळांतसुद्धा यांना प्रवेश नाही व पुनर्वसाहतीसाठी जागा घेतल्यामुळे धरणाचा कायदा शासन यांना लागूच करत नाही. कोणतेही धरण बांधताना शासनाने धरणाच्या पाणलोटक्षेत्राखाली न येणाऱ्या, परंतु धरण–बांधकामाच्या कार्यालयाच्या वसाहतीसाठी ज्यांच्या जागा घेतल्या त्यांना धरणग्रस्त का मानू नये? 'कमांड इरिया' या शब्दाचा शब्दच्छल करून हजारो गोरगरिबांच्या जमिनी शासनाने हिसकावून घेतल्या व यांना ना धरणग्रस्तांचा न्याय ना दुसरा न्याय. यांच्या कबरींवरती शासकीय कार्यालयांचे टुमदार इमले, अलिशान विश्रामधामे उभी आहेत. तेथे या त्यागी जनतेपेक्षा सुरा, सुंदरी व सत्तेचे व्यभिचारी लाड करणाऱ्या लोकांचे चोचले पुरवले जात आहेत!

चिपळूणहून कुंभारलीघाटाने वर आलो आणि मला कोयना पुनर्वसन लोकांच्या तक्रार-समितीचे अध्यक्ष राजाराम शेलार भेटले. माझ्याशी बोलत असताना अक्षरशः त्यांनी आगच ओकायला सुरुवात केली. त्यांनी सांगितले, 'कुसवडे गावांतील अनेक लोक परागंदा झाले. या ठिकाणी शासनाने जंगल तोडून ३०० एकर जागा दिली; परंतु लाइट नाही, पाणी नाही. 'पुनवले टोकवले' या गावी तर मानवी आपत्तीबरोबर अस्मानी आपत्तीही आली. भूकंप होताच या गावातील विहिरी आटल्या, पाणी संपले. हे धरणग्रस्त कराडजवळ गोजेगाव येथे गेले. तेथेही शासनाने त्यांना पुन्हा नागवले. कराडविमानतळाजवळ, महाराष्ट्र राज्य विद्युतमहामंडळाने पुनर्वसित धरणग्रस्तांना तेथून हलवले. एकदा धरणामुळे, दुसऱ्यांदा भूकंपामुळे व तिसऱ्यांदा विद्युतमहामंडळामुळे. अक्षरशः आमचा संसार लमाणांचा संसार झाला आहे. महाराष्ट्र शासन आम्हांस ना जेऊ देत ना राहू देत. आमच्या अडाणीपणाचे हेच प्रायश्चित्त काय? कोणीही यावे व आमच्या पेकाटात लाथा हाणाव्यात. आम्हाला देशच नाही काय? गोकुळगावचे शेलार म्हणाले, 'माझ्या गावची ३४२ एकर जागा कोयना वसाहतीसाठी गेली; परंतु शासनाने एक एकरही जागा आम्हास दिली नाही' 'नावजा टॉवरजवळील नऊशे खातेदारांना जमिनीचा एकही तुकडा दिला गेला नाही. तेंबे, अंबेघर गावच्या लोकांना शासनाने ६० एकर फॉरेस्ट जमीन दिली; परंतु त्यांचे नावावर जमीन न झाल्यामुळे बँक त्यांना कर्ज देत नाही. शासनाने अक्षरशः कोयनाधरणग्रस्तांची परवड केली. शासनाने खातेदारांची खातेफोड न केल्याने आज हे धरणग्रस्त कायम जमिनीला वंचित राहिले. शासनाने यांना उचलून ठाणे जिल्ह्यात नेले. तेथे एका गावच्या १४ वसाहती. शिरसिगी गावी मी गेलो. अक्षरशः केमळी घरात रांगत जावे लागले. शासनाने भातखाचराला ६०० रुपये एकर भाव दिला. ५ रु. बुंध्याने झाडे घेतली. पुनवडे, टाकवले गावाची तर चार जिल्ह्यांत वसाहत केली. गोकुळ व देशमुखवाडी ही गावे तर कोयनानगरच्या शेजारी आहेत; परंतु शाळेत शिक्षकच नाहीत. शासनाकडून नागरी सुखसुविधा नाहीत.

## खातेदारांचा प्रश्न

कोयनाधरणग्रस्तांचा प्रश्न प्रामुख्याने महसुलांशी संबंधित आहे. कोयनाधरण १९६२ साली झाले. कुळकायदा ५२ च्या दरम्यान झाला. जमिनोवरील खातेदारांची खातेफोड झाली नाही. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धती होती. एकत्र कुटुंबाच्या कुटुंबप्रमुखाच्या नावावर जमीन नोंदली जात असे. भाऊ भाऊ वेगळे झाले तर पोटखातेदार ठरत. शासनाने या सामाजिक व्यवस्थेचा धरणग्रस्तांच्या शोषणासाठी उपयोग करून घेतला. धरणाखाली ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांना जमिनीस जमीन दिली नाही, उलट खातेदाराला फक्त चार एकर, दोन एकर जागा दिल्या; परंतु त्यांच्या मुलांना, नातवांना व पोटखातेदारांना अगदी दुर्योधनाच्या थाटात उत्तर दिले, 'एक इंचही जमीन तुम्हास मिळणार नाही, पोटखातेदार आम्हास मान्य नाही!' आणि यामुळे फक्त ३० टक्के धरणग्रस्तांनाच जमिनी मिळाल्या आणि बाकीचे भूमिमालक एका रात्रीत भूमिहीन झाले. त्यांच्या जमिनी कोयनेच्या उदरात गडप झाल्या व त्यांना उदरच नाही. त्यांना जगण्याचा हक्क नाही. यावर शासनाने शिक्कामोर्तब केले. जे कुलाबा–ठाणे जिल्ह्यात गेले, त्यांना तुटपुंज्या जमिनी मिळाल्या. त्या जमिनी जंगलखात्याच्या होत्या. या धरणग्रस्तांचा संघर्ष आदिवासी व जंगलअधिकाऱ्यांशी सुरू झाला. या गोरगरिबांचे सॅण्डविच कसे होते हे मंत्रालयातील प्रवंचक पहात बसले. यवत, राजानाला या ठिकाणी स्वतःसाठी जमिनी खरेदी करणाऱ्यांना या उद्ध्वस्त जीवनाचे सोयरसुतक नव्हते. मुंबईतल्या बिल्डर्सच्या हवाली कुतुबमिनार इतक्या उंचीच्या हवेल्या बांधण्यासाठी जमिनी देणाऱ्या शासनाला कोयनाधरणग्रस्तांची आठवण नव्हती व नाही. बिल्डर्ससाठी ज्यांचा गळा दाटून येतो, स्मगलर्ससाठी ज्यांना पायघड्या अंथरायची सवय झाली आहे आणि काळ्या उद्योगासाठी मलबारहिलचे राजभवन जे उघडउघड वापरतात. त्यांना या कोयनेच्या धरणग्रस्तांच्या टीचभर पोटासाठी वीतभर जमिनीचा प्रश्न सोडवता येत नाही यावर परमेश्वर तरी विश्वास ठेवील काय? गरिबी हटावचा टिळा कपाळी लावून 'उदे उदे ग गरिबी' म्हणून गोंधळ घालणाऱ्यांना या धरणग्रस्तांचा खातेफोडीचा प्रश्न सोडवण्यासाठी अंगात वारे येत नाही, याचीच खंत या गरीब धरणग्रस्तांना लागून राहिली आहे. म्हणूनच त्यांचे प्रक्षुब्ध मन 'विजेच्या तारा तोडू या' या विचाराकडे वेगाने जात आहे. विजेच्या तारांवर ज्यांची समृद्धी आणि वैभवाचे साम्राज्य अवलंबून आहे, त्यांनी आज निद्रिस्त असलेल्या परंतु हळूहळू सुप्त

होत असलेल्या धरणग्रस्तांच्या असंतोषाच्या ज्वालामुखीबाबत जागृत असणे आवश्यक आहे.

शासनाने या धरणग्रस्तांना काय दिले? तर कोठे अॅसबेस्टॉसच्या पत्र्याचे तीन खणांचे समाजमंदिर, तीन खणांची प्राथमिक शाळा व याच्या किमतीही प्रत्येकी ६५ हजार आहेत! काम इतके पक्के की, सह्याद्रीच्या जोरदार वाऱ्याने तुफानी टक्कर देताच कागदाच्या पत्त्यासारखे हवेवर भिरकले जातात. दुरुस्तीची यंत्रणा नाही. रोजगारहमीच्या नावाखाली रोलर न फिरणारा व दरवर्षी वाहून जाणारा व चार चार फूट उंचीचे गवत वाढणारा रस्ता आणि हे समोर फेकून तुमच्यासाठी खूप काही करतो आहो—याचा देखावा; परंतु गुलामाला गुलामच ठेवायचे तर चार भाकरीचे तुकडे चघळायला लावायचे हीच मनोवृत्ती यामागे आहे. असंतोषावर तात्पुरती मलमपट्टी. एका शासकीय अधिकाऱ्याने मला सांगितले की, हा प्रश्न जेव्हा पुढे येतो तेव्हा अलोरा येथून कोयनाप्रकल्पग्रस्तांसाठी एखाद्या अनुदानाचा पाच–दहा लाख रुपयांचा हप्ता येतो. त्यातून काय होणार?

## शासकीय कार्यालय

कोयनाधरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या पाटण येथील कार्यालयात मी गेलो. दहा–बारा क्लार्क गप्पा मारत होते. कामच नव्हते. कारण अनुदान नाही. कोयनाधरणग्रस्तांच्या नावाखाली सहा सहा महिने पगारी फौज बिनकामाची शासन पोसते आहे. सातारा जिल्हा परिषदेतील पुनर्वसनकार्यालयात फेरफटका मारल्यावर उत्तर हाती आले, अलोरे येथील कार्यालयाकडून अनुदान नाही. जिल्हाधिकाऱ्यांच्या बंगल्याच्या आवारात तिसरे पुनर्वसन–कार्यालय आहे. तेथे धडकलो तर प्रामाणिक उत्तर आले. ३९० जमीनधारकांना एक तुकडाही जमीन शासन देऊ शकले नाही. पोटखातेदार ही संज्ञा शासन विचारात घेत नाही. ६२ सालचा मालक हाच खरा मालक!

कोयनाधरणग्रस्त शेतकऱ्यांसाठी पंढरपूर तालुक्यात उजणी धरणाच्या लाभक्षेत्राखालील जमीन देण्याचे शासनाने ठरविले आहे. काही शेतकरी तेथे जाऊन परत आले. पावशेवाडी येथील एक शेतकरी मला भेटले. ते म्हणाले, 'शासन जमीन देते; परंतु घर नाही.' आज त्या ठिकाणी आम्ही जातो. ताडपत्र्या टाकून जमीन लावतो, पीक मिळताच परत कोयनाधरणक्षेत्रात येतो, कारण तेथे कोणतीही वसाहत शासनाने उभी केलेली नाही. सलग जमीन नाही. त्यामुळे पंढरपूरचे शेतकरी आमच्या बांधाच्या वाटा अडवितात. त्यांच्याशी आमचा संघर्ष उडतो, आम्ही त्यांना उपरे वाटतो.'

सिंदीचे रमेश मोरे म्हणाले, ठाणे जिल्ह्यात व रायगड जिल्ह्यात गेलेले आमचे लोक परत आले. शासनाने त्यांना जमिनी फॉरेस्टच्या क्षेत्रात दिल्या. वनअधिकारी व आदिवासी यांच्याशी सतत भांडणे होत व या लोकांना आजही स्थैर्य मिळालेले नाही. केवळ आमची ताकद लहान त्यामुळे आमचा आवाज शासन व समाजाने बंद केला आहे. आमचे तळतळाट तुम्हाला वैभवाच्या क्षणीही बोचत नाहीत, याचे दुःख वाटते. याच परिसरात एक इंजिनियर भेटले. ते म्हणाले, आम्ही या दोन हजार वस्तीकरिता रस्ता करतो, वाहून जातो. शासनाने एवढा खर्च करण्यापेक्षा या लोकांना सरळ सिंचनाखालची जमीन दिल्यास कोटयवधी रुपये वाचतील. शासनाने या ठिकाणी आता कोठे वीज पुरवण्याचा प्रयत्न चालविला आहे; परंतु विजेचे डिपॉझिट भरण्याइतपतही या लोकांजवळ पैसे नाहीत. त्यामुळे खांब उभे पण वीज नाही! शासनाने १९३२ सालच्या खातेदारांचा जोपर्यंत एखाद्या दगडी अंतःकरणाने विचार करण्याचे ठरविले आहे तोपर्यंत कोयनाधरणग्रस्तांची ससेहोलपट होणार!

कोयना–प्रकल्पाने वीजगृह व धरण हे शासनाच्या ताब्यात देताना शासनाने कोयनाप्रकल्पाकडे दरवर्षी १५ कोटी रुपये द्यावेत व त्यातून धरणग्रस्तांचे पुनर्वसन करावे असे ठरले. १९६२ सालापासून गेल्या २२ वर्षात ३३० कोटी रुपये (तीनशेतीस कोटी रुपये) कोयनाप्रकल्पाकडे पुनर्वसनासाठी आल्यानंतर धरग्रस्तांची तक्रार का उरावी व हे तीनशेतीस कोटी रुपये कोणत्या झारीतल्या शुक्राचार्यांच्या खिशात अडकले याचा शोध घेण्याची गरज आहे. हे तीनशेतीस कोटी रुपये जर धरणग्रस्तांपर्यंत पोहचले नसतील तर हा महाराष्ट्र शासनातला सर्वांत मोठा भ्रष्टाचार ठरेल! गोरगरिबांच्या नावावरील या निधीचे काय झाले याचा सर्व जाब विचारण्याचा जनतेला पूर्ण अधिकार आहे. कोयनाप्रकल्प व महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळातील हे देवाणघेवाणीचे व्यवहार लोकांच्या समोर आले पाहिजेत. शासनाने केवळ शाब्दिक सहानुभूती व घोषणाबाजी याच्यावर लोकांना फसविणे थांबवावे. अन्यथा धरणग्रस्त विजेचे टॉवर तोडल्याशिवाय राहणार नाहीत!

## शैक्षणिक व नोकरीविषयक सवलती

धरणग्रस्त शेतकऱ्यांना नोकऱ्यांत अग्रक्रम देण्याचे शासनाने ठरविले होते; परंतु कोयनाधरण झाले तेव्हा १९६२ साली या क्षेत्रात प्रचंड अज्ञान होते. एकही माध्यमिक शाळा नव्हती. प्राथमिक शाळा व्हॉलेंटरी होत्या, तेव्हा शैक्षणिक सवलती नाममात्र होत्या, आजही पदवीधर मतदारसंघात जावळी व पाटण तालुक्यातील धरणभागातील महसूलनिवडणूकविभागात एकही पदवीधर नाही, तेथे पदवीधर मतदानाचे केंद्रही नव्हते. १९६२ साली काय अवस्था असेल याचा अंदाज करता येईल. या धरणग्रस्तांच्या मूळ खातेदारांच्या मुलांनाच नोकरीत अग्रक्रम ही शुद्ध फसवणूक आहे. १९६२ सालच्या पोटखातेदारांच्या मुला व नातवांपर्यंत जर ही सवलत मिळाली तर थोड्याफार लोकांना फायदा मिळेल. ही सवलत आजच्या पुनर्वसाहती झालेल्या धरणग्रस्तांनाही ते कोणत्याही जिल्ह्यात असले तरी मिळाली पाहिजे. मध्यप्रदेश सरकार शेकडो खून केलेल्या डाकूंच्या मुलांना, डाकूंनी मारलेल्या लोकांच्या मुलांना सवलती देण्याचे उदार धोरण स्वीकारते तर महात्मा फुल्यांचा पुतळा विधानभवनासमोर उभा करून शेतकऱ्यांचे कैवारी म्हणविणाऱ्या सरकारला धरणग्रस्तांना शिष्यवृत्त्या व मोफत शिक्षण देण्यात व नोकऱ्यात अग्रक्रम देण्यात काय अडचण आहे? या शेतकऱ्यांनी आसूडच मारावेत अशी अपेक्षा आहे काय? या धरणग्रस्तांसाठी शासनाने एखादे आय्. टी. आय्. का काढू नये? श्रीमंतांचे चोचले पुरविण्यासाठी अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालये गाजावाजा करून काढणाऱ्या या शासनाजवळ धरणग्रस्तांसाठी नक्राश्रु का असावेत?

कोयनाधरणक्षेत्र जहागीरदारांच्या पट्ट्यात येते. तेथील एक धनगर म्हणाला, 'अहो, जहागीरदार पाठीवर मारायचा पण पोटावर मारायचा नाही, आम्हा गरिबांच्या पोटाची काळजी घ्यायचा; परंतु लाल दिव्याच्या गाडीतून येणारा हा नवा जहागीरदार आमच्या पाठीवर व पोटावरही मारतो. शासनाने प्रयत्न केले नाहीत असे नाही. सातारा जिल्हा परिषद पदरमोड करून बामणोली, गोगवे व तळदेव येथे आश्रमशाळा चालविते; परंतु यावर जे पर्यवेक्षण व्हायला पाहिजे तितके होत नाही.

## धरणग्रस्तांचे मानसशास्त्र

१९६२ सालचे पाटण तालुका पंचायत समितीचे सभापती के. व्ही. पाटील म्हणाले, 'शासकीय अधिकाऱ्यांना धरणग्रस्तांचे मानसशास्त्र समजावून घेणे गरजेचे आहे. मातृभूमीची ओढ हा शेतकऱ्याचा स्थायी स्वभाव आहे. तसेच नात्यागोत्याच्या जिव्हाळ्याच्या संबंधांना सहजासहजी शेतकरी तोडत नाही. कोयना धरणग्रस्तांचे पुनर्वसन करताना याची दखल घेतली गेली नाही. साधारणतः आपल्या भावकीच्या, गोत्राच्या नात्याजवळ राहण्याचा प्रयत्न असतो. यामुळे आपणास आढळेल की, कोयनाधरणग्रस्त वसाहती करताना आपल्या नात्याच्या माणसाबरोबर वाहवत गेले. शासनाने त्या काळात गोवारे फॉरेस्ट, कुसुवडे येथील फॉरेस्ट तोडले. एक आदर्श वसाहत करण्याचा प्रयत्न केला; परंतु धरणग्रस्तांनी प्रतिसाद दिला नाही व जेथे गेले तेथे फॉरेस्ट डिपार्टमेंटने अडथळा आणला. कोयनाधरणग्रस्त गेल्यामुळे त्यांच्या जमिनी शासनाला मिळाल्या होत्या तर परजिल्ह्यातील फॉरेस्ट जमिनी देण्यास कोणती हरकत होती? उलट शासन कठोर वागले. त्यांनी बंडिंगचा खर्चही वसूल केला. शेतकऱ्यांनी हजारो वर्षांच्या कष्टाने सजविलेल्या जमिनी नाममात्र किमतीने घेतल्या. परंतु शेतकऱ्याकडून बंडिंगची भरमसाठ किंमत घेतली. ते म्हणाले, आम्ही धरणग्रस्तांना गोव्यापासून ठाण्यापर्यंत सर्वत्र बसमधून फिरविले व जागांचा चॉइस दिला; परंतु मूळ जागेच्या प्रेमामुळे आमचा प्रयत्न अयशस्वी झाला. आमचे लोक जंगलचे भुकेले वाघ आहेत. जमिनीचा पैसा मिळताच तो खर्च झाला. भूकंपाने ते अधिक कर्जबाजारी झाले आणि खातेफोड न झाल्यामुळे बँकेत पत नाही. गवळी, धनगरसमाज मात्र हे क्षेत्र सोडून कोठेही जाण्यास तयार नाही. त्याचा परंपरागत व्यवसाय पशुपालनाचा आहे, जेथे चरीव रान असेल तेथे हा समाज राहतो. प्रचंड पाऊस, हिरवेगार जंगल यामुळे या समाजाला कोयनेचे क्षेत्रच आवडते. शासनाने जर दापचरी प्रकल्पाजवळ चरीवरान दाखविले तर कदाचित हा समाज तयार होईल. त्याचबरोबर ते म्हणाले अजूनही शासनाने एक नमुनेदार वसाहत बांधून जवळ पिण्याचे पाणी व पाण्याखालची जमीन दिल्यास हे शेतकरी जातील. सोळशी खोऱ्यातील लोक तर मुंबईजवळ ठाणे जिल्ह्यात अशी वसाहत उभारल्यास आजही जाण्यास उत्सुक आहेत'

## डोंगरी तालुकाविकास

बॅरिस्टर अंतुले मुख्यमंत्री असताना १९७७–७८ चे दरम्यान डोंगराळ भागातील आमदार एकत्र आले व त्यांनी डोंगराळ भागाच्या विकासासाठी आवाज उठविला. त्या वेळेस पुलोदचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी प्रथम डोंगरी तालुक्यांच्या विकासाचा प्रश्न विचाराधीन आहे असे सांगितले. पुढे बॅ. अंतुले यांनी घाट-रस्ते तयार करण्याचा संकल्प सोडला. बॅ. भोसले यांनी सर्वेक्षणासाठी सर्व महाराष्ट्रातील ६९ रस्ते मंजूर केले आणि आजचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी ५८ लाख रुपये मंजूर केले; परंतु रत्नागिरी जिल्ह्याकडून या घाटमार्गाचे अंदाज न आल्यामुळे या रकमा लॅप्स झाल्या. कांदारी खोऱ्यातील लोकांच्या मते केवळ शासनाने धरणग्रस्तांचा म्हणून या रस्त्यांचा विचार करू नये तर दापोली, खेड, चिपळूण हे रघुवीरघाटाने थेट सातारा-सोलापूर जिल्ह्याशी जोडले जातील. बामणोली येथे कोयनेवर पूल टाकावा लागेल. कोकण व सोलापूर जवळ येतील. कै. नाईकनिंबाळकरांनी ही योजना आखली होती. शासनाने कोयनेच्या विजेच्या प्रत्येक युनिटवर १ पैसा धरणग्रस्त आकार, आकारला तर एका वर्षात कोयनाधरणग्रस्तांच्या रस्ते व पुनर्वसनाचे प्रश्न सोडविण्यास निधी उपलब्ध होईल. ज्यांच्या जमिनी विकल्या, ज्यांच्या कारखान्यांची चाके आमच्यामुळे फिरली त्या उद्योगपतींना व सधन शेतकऱ्यांना हे ओझे वाटणार नाही.' आमच्या भागावर उभ्या राहिलेल्या हवेल्यांना एवढा त्याग माफक आहे! –एक धरणग्रस्त.

कोयनाधरण जेव्हा झाले तेव्हा धरणकायदा अस्तित्वात नव्हता. प्रत्यक्ष पाणलोटक्षेत्र किती होईल याचा अंदाज नव्हता. अशा तऱ्हेच्या कामाचा शासनाला अनुभव नव्हता हे जरी मान्य केले तरी आज २० वर्षांनंतर अनेक धरणांच्या अनुभवाने शहाणे झालेल्या शासनानं कोयनाधरणग्रस्तांच्या प्रश्नावर पुनर्विचार करणे शक्य आहे. शासनाने प्रथम तीन विशेष तहसीलदार नेमून १९६२ सालच्या खातेदारांच्या पोटफोडीची व्यवस्था केली पाहिजे. जे धरणग्रस्त अन्य जिल्ह्यात गेले त्यांच्या वसाहतींची पाहणी करून तेथे त्यांना पोटखातेदार म्हणून जमिनी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. तसेच विद्युतगृह व धरणाजवळील शासकीय कर्मचाऱ्यांच्या व कार्यालयाच्या वसाहतीखालील जमीन गेलेल्यांनाही धरणग्रस्त मानून त्यांनाही धरणकायद्याचा लाभ दिला पाहिजे.

शासनाने १९६२ साली केलेली चूक अजूनही सुधारता येऊ शकेल. केवळ डोंगरी तालुका म्हणजे घाटावरील तालुके अशी संज्ञा उपयोगी नाही. कोकणातील सह्याद्रीउतारावरील गावांचाही विचार करावा लागेल. कारण डोंगरी तालुक्यांतील रस्ते, रत्नागिरी, कुलाबा, सिंधुदुर्ग यांच्यामधील हमरस्त्यांना भिडवावयाचे आहेत. तेव्हा सबंध धरणप्रश्नाचा विचार करताना व्यापकपणे विचार केला पाहिजे. शासनाने जर या धरणग्रस्तांच्या प्रश्नाकडे उपेक्षेने पाहिले तर पोट भरण्यासाठी फक्त जंगलतोड होईल. आजही कोयनापरिसरात कोळशाचे व्यापारी शेतकऱ्यांकडून झाडे विकत घेऊन त्यांचे शोषण करतात. कोळशाचे पोते कोयनाधरणग्रस्ताकडून फक्त दोन रुपये दराने खरेदी केले जाते. कोळसा हाच त्यांच्या जीवनाचा एकमेव आधार आहे. जंगल तुटत जाईल. कोयनाधरण भरत जाईल. या ठिकाणी वनाशी संबंधित रोजगार निर्माण केला पाहिजे. अभयारण्य हाच यावरील उपाय आहे. अन्यथा नागवलेला धरणग्रस्त येत्या दहा वर्षांत हे धरण निकामी करेल चौथ्या टप्प्यापूर्वीच शासनाला 'हे फळ काय मग तपाला' हे म्हणण्याची पाळी येईल. कोयनाबांध फुटण्यापूर्वीच जागे व्हा! धरणग्रस्तांच्या प्रश्नांनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी पोळी भाजण्यापासूनही सावध रहा. कै. बाळासाहेब देसाईंच्या निधनानंतर आपला कोणी वाली नाही ही भावना बळावते आहे. धरणग्रस्तांचा आता एकाही नेत्यावर विश्वास नाही. ते स्वतःच संघटित होत आहेत. धरणाच्या भिंतीवर टकरा देत आहेत. ☐

# एस्कॉर्ट खटल्याचा निकाल : जिंकले कोण? हरले कोण?

शिरीष सहस्रबुद्धे

एकतीस ऑक्टोबर – इंदिराजींचं निधन. आठ नोव्हेंबर – एस्कॉर्ट खटल्याचा निकाल एस्कॉर्टच्या बाजूनं लागला !

काळाच्या ओघातला हा एक निव्वळ योगायोगच म्हटला पाहिजे. एरवी, जुलै–ऑगस्टमध्येच यायला हवा होता तो निकाल नोव्हेंबरमध्ये जाहीर झाला तर त्याचं दुसरं काय कारण असणार ? खटला खूपच महत्त्वाचा असल्यामुळं न्यायमूर्तींना निर्णयावर पोहोचायला वेळ लागणंही तसं स्वाभाविकच. सुदैवानं आपल्या तब्बल साडेतीनशे पानांच्या निकालपत्रात मुंबई उच्च न्यायालयाच्या दोघा न्यायाधिशांनी अतिशय स्वच्छ नि स्पष्टपणे आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. आपल्या अभिप्रायाचे परिणाम दूरवर नि खोलवर होऊ शकतात, एवढंच नव्हे तर देशातल्या आर्थिक–औद्योगिक विकासाच्या इतिहासाला त्यामुळं वेगळं वळण मिळू शकेल याची जाणीव जागी ठेवूनच न्यायमूर्तींनी आपलं निकालपत्र लिहिलं आहे याची झलक सहज जाणवते. वरवर पाहता हा खटला एस्कॉर्टस् लि. विरुद्ध रिझर्व बँक+केंद्र सरकार+एल्आयसी असा असला तरी तो दाखल करणाऱ्यांनी नेम धरला होता तो स्वराज पॉल या गाजलेल्या व्यक्तिमत्त्वावर आणि म्हणूनच निकाल ऐकल्यानंतर पहिला विचार मनात आला तो हा की, या निकालावर इंदिराजींची प्रतिक्रिया काय झाली असती ? आपल्या एकनिष्ठ चेल्याला न्यायालयानं भुईसपाट केल्याचं पाहून त्यांना काय वाटलं असतं ? न्यायव्यवस्थेची ही बंडखोरी मोडून काढण्याकरता त्यांच्या शैलीनं कोणती शक्कल त्यांनी लढवली असती ?

–पण हे सगळे प्रश्न आता गैरलागू ठरले आहेत. आता प्रश्न आहे तो एवढाच की, या निकालात खरं जिंकलं ते कोण ? हार झाली ती कुणाची ? आणि याचा शेवट कसा होऊ शकेल ? शेवटी यातनं निष्पन्न काय होईल ? मात्र या सगळ्या नाट्यमय प्रकरणाची नि त्यातल्या मुख्य पात्रांची थोडीशी ओळख त्यासाठी असायला हवी.

## काय आहे हे प्रकरण ?

एस्कॉर्टस् लिमिटेड ही कंपनी नि तिचे कार्यकारी संचालक श्री. एच. पी. नंदा ही या प्रकरणातली एक महत्त्वाची पार्टी. सध्याचे विजेते.

फाळणीनंतर भारतात आलेल्या नंदा कुटुंबानं आपला कपड्यांच्या आयातीचा धंदा बरोबर आणला, वाढवला नि हळूहळू त्याचं रूपांतर एस्कॉर्टस् उद्योगसमूहात केलं. फोर्ड, यामाहा यांसारख्या बड्या परदेशी कंपन्यांच्या सहयोगानं ट्रॅक्टर्स नि राजदूत मोटारसायकलींच्या उत्पादनात नाव कमावलं. भारतातली इंजिनियरिंग क्षेत्रातली सातव्या क्रमांकाची मोठी उद्योगसंस्था ठरली. आज त्यांच्या फरिदाबाद ( हरियाना ) इथल्या नि इतर कारखान्यांत – कचेऱ्यांत सतरा हजार कर्मचारी नि वीस हजार सेल्स–सर्व्हिस इंजिनियर्स नोकरी करतात. कंपनीच्या भागधारकांची ( शेअरहोल्डर्स ) संख्या चाळीस हजार आहे. १९८३ अखेर कंपनीची वार्षिक विक्री दोनशेऐंशी कोटी रुपये होती आणि नफा होता साडेसतरा कोटी रुपये ! एल्आयसी ऊर्फ आयुर्विमा महामंडळ हा एस्कॉर्टस्चा सगळ्यात मोठा भागधारक आणि सावकारसुद्धा. त्यांनी नेमलेले एक संचालक कंपनीच्या संचालक मंडळावर पूर्वीपासून काम करीत असत. एक वर्षभरापूर्वीपर्यंत एलआयसी नि एस्कॉर्टचे संबंध सलोख्याचेच होते. त्यात मिठाचा खडा पडला तो स्वराज पॉल यांची 'एन्ट्री' रंगमंचावर झाल्यानंतरच.

## स्वराज पॉल आणि कॅपारो

स्वराज पॉल यांची ओळख इंदिराजींचे चरित्रकार म्हणून काहीजणांना असेल; पण तसे ते लेखक वगैरे नव्हेत. हे मूळचे भारतीय गृहस्थ–पण लंडनमध्ये स्थायिक झालेले. कॅपारो उद्योगसमूह या नावानं त्यांचा व्यवसाय ओळखला जातो. तो प्रचंड आहे असं सांगणारे सांगतात. त्यातल्या डझनापेक्षा जास्त कंपन्यांनी तर भारतात शेअरखरेदीच केली आहे. त्यांचे बंधू सुरेंद्र पॉल हे कलकत्त्यात असतात. अपीजय उद्योगसमूहाचे ते अध्यक्ष नि सूत्रधार आहेत.

दोन-अडीच वर्षांपूर्वी स्वराजजींची इंदिराभक्ती दुथडी भरून वहायला लागली. दिल्लीला त्यांच्या खेपा वाढल्या आणि एक सफदरजंगरोडवरचा त्यांचा राबताही वाढला. त्याच सुमाराला, परदेशस्थ भारतीयांना भारतीय व्यवसायात गुंतवणूक करू देण्याबाबतचं भारतसरकारचं धोरण अधिक उदार झालं. पोर्टफोलिओ इन्व्हेस्टमेंट स्कीममध्ये सुधारणा झाल्या. परकीय उद्योगसमूहांना हातपाय पसरू देण्याऐवजी परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना स्वदेशात पैसा गुंतवायची संधी द्यावी हा उभयपक्षी सोयिस्कर विचार त्यामागे होता. त्यात तत्त्वतः काही गैरही नव्हतं. भारतीय उद्योगपतींनीसुद्धा त्या वेळी नव्या लवचिक धोरणाचं स्वागतच केलं अपेक्षा ही की, नव्या भांडवलासोबत नवं तंत्रज्ञानही येईल आणि देशात नवे मोठे/मध्यम उद्योग उभे राहतील. परदेशी गेलेले काही तंत्रज्ञही परत येतील आणि या सगळ्याचा फायदा देशात अगोदर अस्तित्वात आलेल्या उद्योगधंद्यांनाही मिळेल.

## शेअरखरेदीची शर्यत

पुष्कळशा सरकारी योजनांचं नि उद्दिष्टांचं जे होतं, तेच या गुंतवणूक-सवलतीचंही झालं. परदेशी जाऊन संपन्न झालेल्या भारतीयांनी तिकडच्या औद्योगिक संस्कृतीला अनुरूप असाच गुंतवणुकीचा मार्ग चोखाळला, तो म्हणजे चालत्या व्यवसायाचे शेअर्स खरेदी करण्याचा. एखाद्या कंपनीचं भागभांडवल

खरेदी करून तिच्या व्यवस्थापनावर ताबा मिळवायचा आणि बहुधा मूळ मालकाला बाहेरचा रस्ता दाखवायचा हे युरोप-अमेरिकेत खूपच सहजपणे घडतं. स्वराज पॉल यांचा उद्योगसमूह याच पद्धतीनं हात-पाय पसरून वाढलाय असं ऐकलं. निव्वळ पैसा आहे म्हणून धंदा बळकाव ही व्यावसायिक संस्कृती आपल्याकडे अजून रुजायची आहे. तिचा मोठ्या प्रमाणावर दणका बसला तो एस्कॉर्टस् नि डीसीएम् या उत्तरभारतातल्या दोन बड्या उद्योगसमूहांना

स्वराज पॉलनी सावजं तर नामी हेरली. एस्कॉर्टस्वर नंदा घराण्याची मालकी असली आणि नंदा कुटुंबातले तिघेजण संचालक मंडळात असले तरी नंदा घराण्याकडे प्रत्यक्षात फारच थोडं भागभांडवल आहे. पाच टक्केसुद्धा असेल-नसेल. तीच गोष्ट डीसीएमची. कै. लाला श्रीराम हे ज्येष्ठ उद्योगपती या समूहाचे संस्थापक. त्यांनी आणि नंतर त्यांचे चिरंजीव डॉ. भरत राम यांनी डीसीएम गटाची विलक्षण भरभराट घडवून आणली. अशा दुभत्या गायी आपल्या गोठ्यात आणून बांधाव्यात असं स्वराजना वाटलं तर नवल नाही.

घडलं ते असं की, स्वराज पॉल यांच्या कॅपारो उद्योगसमूहातल्या तेरा कंपन्यांनी एस्कॉर्ट नि डीसीएमचे शेअर्स बाजारातून खरेदी करायचा धडाका लावला. १९८३ च्या मध्याला ही खरेदी ऐन भरात होती. मागणी वधारल्यानं दोन्ही शेअर्सचे भाव भलतेच कडाडले आणि त्यामुळंच दोन्ही कंपन्यांचे संचालक सावध झाले. चौकशीअंती कॅपारो उद्योगसमूहानं ही धाऊक खरेदी चालू केल्याचं लक्षात आलं.

कंपन्यांनी काही हालचाल करीपर्यंत स्वराज पॉल यांनी एस्कॉर्टसचे नऊ लाख पंचाहत्तर हजार शेअर्स नि डीसीएमचे दहा लाख चाळीस हजार शेअर्स कनवटीला लावले होते. एस्कॉर्टस्च्या एकंदर भरणा झालेल्या भांडवलाचा ७.२९ टक्के हिस्सा कॅपारोच्या ताब्यात गेला होता. डीसीएमच्या बाबतीत हे प्रमाण अधिकच, म्हणजे १२.९५ टक्के होतं. त्यांनी हे शेअर्स थोड्याथोडक्या नव्हे तर तीस ते चाळीस हजार छोट्या-मोठ्या भागधारकांकडून खरेदी केले. त्यासाठी पंजाब नॅशनल बँक या राष्ट्रीयीकृत बँकेमार्फत अधिकृतपणे पैसा भारतात आणण्यात आला. किती? बारा कोटी चाळीस लाख रुपये! खरेदी केली ती मे. राजाराम भसीन आणि कं. नि मे. भारतभूषण आणि कं. या दिल्लीतल्या दोघा शेअरब्रोकर्सनी.

पहिल्या अंकाचा पडदा इथं पडला नि पडद्याआडच्या संघर्षाला तोंड लागलं!

## युद्ध आमचे सुरू!

एस्कॉर्टस् नि डीसीएम दोन्ही कंपन्यांनी प्रत्युत्तर दिलं ते कॅपारो उद्योगसमूहाच्या नावे शेअर्सचं हस्तांतरण (ट्रान्स्फर) करून द्यायचं नाकारून. भागधारकांनी शेअर्स विकले तरी कंपनीच्या रजिस्टरात मालक बदलल्याची नोंद होईतो व्यवहार अंमलात येत नाही. ही नोंद बदलण्याचंच या दोन कंपन्यांनी नाकारलं.

स्वराज पॉल या निर्णयाविरुद्ध कंपनी लॉ बोर्डाकडे दाद मागू शकले असते. कोर्टातही जाऊ शकले असते; पण त्यांनी यातलं काहीच केलं नाही. फक्त जाहीर केलं की भारत सरकारच्या धोरणानुसार मी पैसे गुंतवले आहेत. तेव्हा मला न्याय मिळवून द्यायची जिम्मेदारी सरकारची आहे.

विशेष असं की, सरकारी यंत्रणेची चक्रंही झपाट्यानं फिरली. रिझर्व बँकेच्या पूर्वसंमतीखेरीज स्वराजनी खरेदी केली, ही अडचण होती. एस्कॉर्टस्नं हे कारण दाखवून खरेदी नियमबाह्य ठरवली होती. मग रिझर्व बँकेनं १९ सप्टेंबर १९८३ रोजी परिपत्रक काढलं आणि खास पॉलसाहेबांसाठी त्याला रिट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्ट देऊन त्यांची शेअरखरेदी वैधतेच्या सीमारेषेवर आणली. एस्कॉर्टस् विरुद्ध कॅपारो गट+केंद्रीय सरकारी संस्था यांची खरी जुंपली ती इथे. एस्कॉर्टस्नं रिझर्व बँक आणि केंद्र सरकार या दोघांना प्रतिवादी करून मुंबई उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल केला. वस्तुतः एस्कॉर्टस्ची अधिकृत कचेरी उत्तरेत आणि केंद्र सरकारचं ठाणंही तिकडेच; पण रिझर्व बँक मुंबईत असल्याचा फायदा घेऊन मुंबई उच्च न्यायालयाकडे धाव घेण्यात आली. जाणकार सांगतात की, स्वराज पॉलची एक सफदरजंगरोडशी असलेली घनिष्ठ मैत्री लक्षात घेता आसपासच्या कुठल्याच कोर्टाचा भरंवसा नंदा यांना वाटला नाही. त्यामानानं मुंबई उच्च न्यायालयाचं नि:पक्षपातीपणाचं रेकॉर्ड खूपच चांगलं आहे!

## एल्आयसीचा प्रवेश

एस्कॉर्टस्नं अशा तऱ्हेनं कायद्याचा आसरा घेतला तेव्हा त्यावर प्रतिडाव म्हणून कुणी तरी एल्आयसीला खुणावलं. त्या खाणाखुणा मोठ्या ताकदीच्या असणार, एरवी एल्आयसीनं दातओठ खाऊन एस्कॉर्टविरुद्ध एकदम युद्ध पुकारायचं वरकरणी तरी काहीच कारण नव्हतं. एस्कॉर्टस्वर प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनं दडपणं आणून त्यांना कॅपारो गटाचे शेअर्स रजिस्टर करायला लावण्याच्या हालचाली सुरू झाल्या.

एल्आयसीची दबाव आणायची कुवत कमी करायच्या हेतूनं एस्कॉर्टनं त्यांचं काही कर्ज मुदत भरण्याआधीच परत करायचं ठरवलं. कंपनीची आर्थिक स्थिती चांगली असल्यानं हे चाललं असतं; पण एल्आयसीनं परतफेड स्वीकारायची खळखळ सुरू केली!

आणि मग एक दिवस एकदम बातमी आली की, एल्आयसीनं एस्कॉर्टस्ची खास सर्वसाधारण सभा बोलवण्याची नोटीस जारी केली आहे.

खास सभेपुढे कामकाज काय ठेवणार? तर एस्कॉर्टस्च्या संचालक मंडळापैकी नऊ अंशकालिक संचालकांना बडतर्फ करून त्यांच्या जागी एल्आयसीनं ठरवलेल्या नऊ संचालकांची नेमणूक करणं!

जुन्या संचालकांना एकाएकी काढून टाकायला काही कारण?

—असलंच तर एल्आयसी जाणे. नोटिशीत तरी कारणांचा उल्लेख नव्हता

मामला गंभीर होता, कंपनीचं संपूर्ण व्यवस्थापनच एल्आयसी हातात घ्यायला निघाली होती.

एस्कॉर्टस्नं याचा प्रतिकार दुहेरी सुरू केला. एकीकडे या खास सभेला स्थगिती मागितली. दुसरीकडे मुंबई उच्च न्यायालयातल्या मूळ खटल्यात दुरुस्ती करून प्रतिवादी म्हणून एल्आयसीचंसुद्धा नाव घालावं अशी विनंती केली. ती मान्यही झाली.

आता गंमतीचा योगायोग पहा. या खटल्याच्या निकालपत्रात न्यायमूर्तींनी मूळच्या दोघा प्रतिवादींना निर्दोष ठरवलंय आणि

मागाहून आलेल्या एल्आयसीला मात्र याद राहील इतक्या सढळ हातानं चोप दिला आहे.

निकालपत्राचा सारांश स्वतंत्रपणे चौकटीत दिलाय, तो जरूर पहावा.

एस्कॉर्टच्या नंदामंडळींनी कितीही अडथळे आणले तरी एल्आयसीनं बोलावलेली भागधारकांची खास सभा पार पडलीच. भागधारकांमध्ये एल्आयसीचं दणदणीत बहुमत आहे हे तर स्पष्टच होतं, त्यामुळं ठरावावरचं मतदान हा निव्वळ तांत्रिक उपचार होता, तो पार पडला. नऊ संचालक बदलले गेले मात्र सर्वोच्च न्यायालयाने सभा होऊ दिली तरी तिच्यातल्या कामकाजाच्या अंमलबजावणीला मात्र, मुंबई उच्च न्यायालयातल्या मूळ दाव्याचा निकाल लागेतो स्थगिती दिली. त्यामुळे आणि तेव्हापासून – म्हणजे ऑगस्ट १९८४ पासून – निर्माण झालेली कोंडी मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठानं दिलेल्या ऐतिहासिक निकालानं फुटली.

### झटपट अपील

अर्थात मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल म्हणजे काही या प्रश्नावरचा शेवटचा शब्द नव्हे. श्री. नंदा आणि इतर प्रमुख उद्योगपतींनी जी सावध प्रतिक्रिया व्यक्त केली, त्यामागेसुद्धा हीच जाणीव आहे. स्वराज पॉल यांची प्रतिक्रिया मात्र अपेक्षेप्रमाणेच तिखट आणि अद्वातद्वा आहे. 'एलआयसी आणि इतर वित्तसंस्थांचं रूपांतर न्यायालयानं असहाय प्रेक्षकात केलं आणि सामान्य भागधारकांचा बळी देऊन सध्याच्या व्यवस्थापनाला मोकळं रान दिलं आहे. भारतातल्या आर्थिक व्यवहाराचा सत्यनाश करणारा हा निकाल आहे !' अशा शब्दांत पॉलसाहेबांची निराशा व्यक्त झाली आहे. श्रीमती गांधींचं नाव या सगळ्या प्रकरणात गोवण्याबद्दलही त्यांनी संताप व्यक्त केला आहे. 'आपण जे काही केलं ते देशप्रेमापोटीच. त्यात कुणा-

## निकालपत्र काय म्हणते ?

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती के. माधव रेड्डी आणि श्री. डी. एम्. रेगे यांनी एस्कॉर्ट खटल्यात साडेतीनशे पानांचं निकालपत्र दिलं. त्यातले काही महत्त्वाचे मुद्दे असे :

१. परकीय चलननियंत्रण कायद्याचा (फेरा) खंड २९ (१) (बी) बंधनकारक आहे. त्यामुळे रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगीशिवाय अनिवासी भारतीयांना (नॉन–रेसिडेन्ट इंडियन्स) शेअर्स खरेदी करता येणार नाहीत. ही अट सैल करायचा किंवा आधी घेतलेले शेअर्स मागाहून पूर्वलक्षी (रिट्रॉस्पेक्टिव्ह) परवानगी देऊन वैध ठरवायचा अधिकार केंद्र सरकारला किंवा रिझर्व बँकेला नाही.

२. १९ सप्टेंबर ८३ रोजी रिझर्व बँकेने प्रसृत केलेले 'ते' सर्क्युलर बेकायदा आहे. (याच पूर्वलक्ष्मी सर्क्युलरनुसार स्वराज पॉलनी घेतलेले शेअर्स वैध ठरत होते.)

३. कॅपारो गटाचे शेअर्स रजिस्टर करायला एस्कॉर्टनं जो नकार दिला तो योग्य होता. कारण अवैधरीत्या खरेदी केलेले शेअर्स नोंदवून घेणं बेकायदेशीरच झालं असतं.

४. हे शेअर्स नोंदवण्याचा आदेश एस्कॉर्टस्‌ला देऊ नये, असा मनाईहुकूम केंद्र सरकार व रिझर्व बँक यांच्यावर बजावण्यात आला आहे.

५. एल्आयसी ही संस्था राज्यघटनेच्या बाराव्या कलमानुसार 'शासनात' मोडत असल्यामुळे तिला एखाद्या खाजगी भागधारकाप्रमाणे वागता येणार नाही. (अर्थात जो न्याय एल्आयसीला तोच इतरही सार्वजनिक वित्तसंस्थांना लागू होणार हे उघड आहे.)

६. खास सभेद्वारा कंपनीच्या नऊ संचालकांना काढून टाकण्याच्या ठरावाची जी नोटीस एल्आयसीने दिली, ती कंपनी कायद्याच्या खंड २८४ याच्याशी विसंगत आहे. तसेच एल्आयसी कायद्याच्या सहाव्या खंडाच्या कक्षेबाहेरची, म्हणून अवैध आहे. एल्आयसीद्वारा या कृतीच्या समर्थनासाठी कोणतीही कारणे दिली गेली नाहीत. त्यामुळे ही कृती लहरीपणाची आणि सद्हेतूला सोडून झाली. राज्यघटनेच्या चौदाव्या कलमाचा त्यामुळे भंग झाला. सदर नोटीस नैसर्गिक न्यायतत्त्वाचं उल्लंघन करते.

७. एल्आयसीने वरील नोटिशीद्वारा बोलावलेल्या खास सभेतलं कामकाज अवैध व म्हणून रद्द समजण्यात येईल. त्या सभेत काढून टाकलेल्या नऊ संचालकांनी पदत्याग करण्याची जरुरी नाही. त्यांच्या जागी एल्आयसीने नेमलेल्या नऊ संचालकांना पदांचा स्वीकार करता येणार नाही. या सभेच्या कामकाजानुसार कोणतीही कृती करू नये असा मनाईहुकूम एल्आयसीवर बजाविण्यात आला.

८. नऊ संचालकांना बडतर्फ करून त्या जागी आपल्या प्रतिनिधींची नेमणूक करण्याचा एल्आयसीचा ठराव म्हणजे कंपनीचं व्यवस्थापन ताब्यात घेण्याचाच प्रयत्न होय भागधारक म्हणून एल्आयसीला मिळालेल्या अधिकारांचा हा वापर वैध नाही. एल्आयसीची कंपनीतील गुंतवणूक धोक्यात नसतानाही असा ताबा घेण्याचा अधिकार एल्आयसी कायद्यान्वये एल्आयसीला नाही.

९. मात्र एल्आयसीच्या कृतींबद्दल केंद्रसरकार किंवा रिझर्व बँक यांना जबाबदार धरता येणार नाही.

१०. एस्कॉर्टनं मुदतपूर्व कर्जफेड करणं किंवा गोएत्झ व एस्कॉर्ट या कंपन्यांचं विलिनीकरण या प्रश्नांचा संबंध वादग्रस्त शेअर्सच्या नोंदणीशी जोडला गेला. एस्कॉर्टच्या व्यवस्थापनावर गैरमार्गानं दबाव आणण्याचाच हा प्रयत्न ठरतो.

११. दाव्याच्या खर्चापोटी वादीला प्रतिवादींकडून पंचवीस हजार रुपये मिळावेत.

निकालपत्रातल्या शेवटच्या म्हणजे खर्चासंबंधीच्या हुकुमाला स्थगिती द्यावी अशी विनंती रिझर्व बँकेच्या वकिलांनी न्यायमूर्तींना केली, तेव्हा एस्कॉर्टस्‌चे वकील श्री. एफ्. एस्. नरिमन यांनी या पंचवीस हजारावरचा आपला हक्क साभार सोडून दिला. एवढ्या मोठ्या विजयानंतर पंचवीस हजारांवर पाणी सोडणं काही अवघड वाटलं नसणार ! ◻

चा व राजकीय स्वार्थ नव्हता', असा त्यांचा दावा !

एलआयसीची अधिकृत प्रतिक्रिया अशी कुठे वाचण्यात आली नाही; पण त्यांनी ज्या चपळाईनं आणि कार्यक्षमतेनं सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केलं, त्यामुळं त्यांना हा निकाल किती चरचरून झोंबला असेल हे उघड झालं. साडेतीनशे पानांचं निकालपत्र त्यांनी दोन दिवसांत अभ्यासलं आणि अकरा नोव्हेंबरला अपील करण्यासाठी अर्ज दाखल केलासुद्धा ! सर्वोच्च न्यायालयानं तो बारा नोव्हेंबरला दाखल करून घेतला आणि एकोणीसला सुनावणी ठरवली. त्या दिवशी अपील दाखल करून घेतलं गेलं. त्याची सुनावणी आता न्या. डी. ए. देसाई आणि न्या. ए. एन. सेन यांच्या खंडपीठासमोर पाच डिसेंबरपासून सुरू होईल. 'एलआयसीला सर्वसामान्य भागधारकाप्रमाणे वागता येणार नाही' हा मुंबई उच्च न्यायालयाचा निवाडा, हा एलआयसीच्या अपिलातला मुख्य मुद्दा ठरेल असा अंदाज आहे.

## पुढे काय ?

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय यथावकाश लागेल, त्याबद्दल आताच काही भाकित करणं शक्य नाही; पण आहे या स्थितीत पुष्कळ अनिर्णित प्रश्न आहेत, त्यांच्यावर पडदा केव्हा पडेल नि कसा हा खरा उत्कंठेचा विषय आहे. यातले काही प्रश्न अल्पकालीन आहेत, तर काही बराच काळ रेंगाळणारे नि बीजं खोलवर रुजलेलं आहेत. स्वराज पॉलनी विकत घेतलेल्या शेअर्सचीच गोष्ट घ्या. त्यांचं आता काय होणार ? मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे हा खरेदीचा व्यवहार बेकायदेशीर ठरला आहे म्हणजे स्वराज पॉल त्यांचे कायदेशीर मालक होऊ शकत नाहीत. बरं, ज्यांच्याकडून हे शेअर्स विकत घेतले, त्या भागधारकांनी अगोदरच 'ट्रान्स्फर डीड 'वर सह्या करून आणि मोबदला घेऊन शेअर्सची मालकी सोडली आहे. त्यामुळे 'ना घर का ना घाट का' अशा अधांतरी अवस्थेत हे शेअर्स काही काळ लोंबकळणारसं दिसतं. या काळात त्यांच्यावरच्या डिव्हिडन्डचं काय करायचं हाही एक प्रश्नच आहे.

श्री. स्वराज पॉलच्या दृष्टीनंही पुढे काय हे एक प्रश्नचिन्हच आहे. साडेबारा कोटी रुपये विनामोबदला गुंतून पडले आहेत आणि बदल्यात भ्रष्टाचाराचे नि राजकीय भाटगिरीचे आरोप पदरी पडले आहेत त्यांनी किती हात झटकले तरी इंदिराजींची पाठराखण ते करीत असत हे डोळ्यांना दिसलेले सत्य आहे आणि इंदिराजींची सहानुभूती पॉलना असल्याखेरीज रिझर्व बँकेनं खास परिपत्रक काढलं नसतं आणि एलआयसीनं एस्कॉर्ट्स् उद्योगसमूह खालसा करण्याचा विडा उचलला नसता, हाही इशारा समझनेवालेको काफी है. आता तितकीच सहानुभूती स्वराजजींना राजीव गांधींकडून मिळेल का याबद्दल दाट शंका आहे. राजीवजींना खाजगी उद्योगक्षेत्राबद्दल थोडी अधिक सहानुभूती आहे. संसदेत या प्रश्नावरच्या चर्चेत बोलताना अनिवासी भारतीयांची भारतातल्या चालू उद्योगातली गुंतवणूक त्या उद्योगाच्या एकंदर भागभांडवलाच्या दोन टक्क्यांपेक्षा जास्त नसावी असं मत व्यक्त केलं होतं. नंतर मूळ योजनेत तशी दुरुस्तीही झाली. मात्र स्वराज पॉलनी आपली खरेदी 'सीलिंग' येण्याआधीच उरकून टाकली होती. सात ते तेरा टक्के शेअर गुंडाळून उद्योगांवर कब्जा मिळवायच्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेला श्री. राजीव गांधींकडून खतपाणी मिळायची शक्यता कमी दिसते.

## नंदा–स्वराज तडजोड

स्टॉक एक्सचेंजेसच्या वर्तुळात हलकेच बोलली जाणारी शक्यता म्हणजे नंदा आणि स्वराज पॉल यांनी आपसी समझोता केला तरच या कोंडीला तोंड फुटेल. सर्वोच्च न्यायालय मूळ निकालात आमूलाग्र बदल करील अशी शक्यता कमी दिसते. त्यामुळे खरा व्यावहारिक तोडगा कोर्टात नव्हे तर कोर्टाबाहेरच निघू शकेल, हा विचार रास्त वाटतो. स्वराजनी आपलं 'शेअरहोल्डिंग' ( भागप्रमाण ) विशिष्ट मर्यादेपर्यंत कमी करायचं आणि नंदा गटाला मान्य होतील अशा व्यक्तींकडे हे शेअर्स हस्तांतरित करायचे असं काही तरी स्वरूप या तडजोडीचं असू शकेल. 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' हा न्याय दोघांनाही कितपत पचेल यावर ते अवलंबून राहील.

## काही मूलभूत प्रश्न

एस्कॉर्ट्स् प्रकरणातनं जे महत्त्वाचे आणि टिकाऊ स्वरूपाचे चर्चाविषय उपस्थित झाले आहेत, त्यात वित्तसंस्थांच्या अधिकारसीमा आणि विशिष्ट, मर्यादित हेतूनं त्यांचा शस्त्र म्हणून होणारा वापर, त्यामुळे खाजगी व्यवसायक्षेत्राच्या स्वातंत्र्यावर पडणाऱ्या मर्यादा हे महत्त्वाचे विषय आहेत. खास व्यक्तींसाठी कायद्यात बदल करायचे आणि तेसुद्धा मागच्या तारखेपासून हा इंदिराजींच्या राजकीय शैलीतला खास शिरस्ता होता, तो औद्योगिक–आर्थिक क्षेत्रातही वापरला जाऊ शकतो हे आता दिसून आलेलं आहे. परकीय चलनातली गुंतवणूक स्वागतार्ह आहे; पण ती राजकीय पाठबळ घेऊन येणार असेल आणि इथल्या देशी उद्योगांची बसलेली घडी विस्कटून टाकणार असेल, तर त्यातून खरोखरच काही भलं साधणार आहे, याचा विचार व्हायला हवा.

नंदा आणि मंडळी हे कुणी साधुसंत नव्हेत; पण अशा तऱ्हेनं बेगुमानपणे चिरडून टाकायला ते कुणी अतिरेकी किंवा गुन्हेगारही नव्हेत. स्वतःचा स्वतंत्रपणे उभारलेला आणि भरभराटीत असलेला उद्योग, सरकारी संस्थांच्या पाठिंब्यानं कुणी पैसेवाला अनिवासी भारतीय हा हा म्हणता खिशात टाकू शकतो अशी धास्ती निर्माण होणं हे स्वतंत्र औद्योगिक विकासाला पोषक नक्कीच नाही. मिश्र अर्थव्यवस्थेद्वारा खाजगी क्षेत्राचं अस्तित्व मान्य केल्यानंतर त्यांच्या स्वातंत्र्याची आणि उद्यमशीलतेची अशी कुरतड करण्यापेक्षा सदैव तोट्यात चालणाऱ्या बहुसंख्य सार्वजनिक क्षेत्रातल्या उद्योगांच्या आरोग्याकडे सरकारनं आणि सरकारी महामंडळांनी निगुतीनं लक्ष पुरवलं तरी चालण्यासारखं आहे !

# स्कुटर-मोटरसायकलच्या युगातली नवी लाट

## होंडा, यामाहा, सुझुकी, कावासाकी, झुंडुप....पिज्यो यांचे भारतीय उद्योजकांबरोबर सहकार्यकरार

दोन चाकी वाहाने, भारतातील वाहतूक व्यवस्थेचा कणाच ! वाढती लोकसंख्या व पसरणारी शहरं यामुळं दोन चाकी वाहनांच्या मागणीत नित्य–नियमित वाढ होत आहे. आजच्या जेटयुगाने जवळ–लांबच्या कल्पना पार बदलून टाकल्या आहेत. आपण अजून दोन चाकी वाहनांच्या युगात स्थिर-स्थावर होत आहोत. शहराची दोन टोके जोडणारे १०–१५ कि. मी. अंतर आज जास्त वाटत नाही; पण तेच दोन चाकी वाहन नसेल तर ?

शहरात जर सुखाने जगायचे असेल तर एखादे दोन चाकी वाहन दारात अवश्य हवे. दर्जेदार आणि परवडणारे दोन चाकी वाहन आज किती जणांना उपलब्ध आहे ? एकतर आपल्याकडे दर्जेदार दोन चाकी वाहनं निर्माण होतात का ?

दर्जेदार वाहननिर्मिती कोठे होते, तर परदेशात ! जपान, जर्मनी, इटली, फ्रान्स व ब्रिटन ही पाच प्रगत राष्ट्रे दोन चाकी वाहन-निर्मितीत नाव कमवून आहेत. अर्थात या क्षेत्रात खरं साम्राज्य आहे जपानचंच ! जपानी उद्योगांनी दर्जा व किंमत या दोन्ही बाबतीत लोकांच्या मनात विश्वास निर्माण केला व टिकवला. प्रगत राष्ट्रांतील व्यावसायिक स्पर्धेत जर टिकायचे असेल तर चांगला दर्जा व योग्य किंमत यांचा समतोल ठेवावाच लागतो आणि भारतीय उद्योजकांनी दर्जा आणि किंमत यांच्या समतोलालाच चाट दिली. त्यामुळे परिस्थिती अशी आहे की दर्जा आणि किंमतीच्या असमतोलामुळे ग्राहक दोन चाकी वाहनं केवळ असहायतेमुळे घेतो.

मागणी आणि दर्जेदार वाहनांचा अभाव ही कोंडी फोडण्याकरता सरकारपुढे एकच मार्ग होता. तो म्हणजे परदेशी उद्योजकांबरोबर भारतीय उद्योजकांना सहकार्य करू देणे. तर असे हे पोलादी धोरण मऊ पडल्यावर परदेशात नावाजलेल्या दोन चाकी वाहन-निर्मितीउद्योगांवर भारतीय उद्योजकांच्या अक्षरशः उड्या पडल्या आणि सुमारे डझन-भर भारतीय उद्योगांनी परदेशी उद्योजकांबरोबर सहकार्य–करार केले. जपानमधील होंडा, यामाहा, सुझुकी व कावासाकी, जर्मनीतील झुंडुप, ब्रिटनची बी. एस. ए. फ्रान्सची 'पिज्यो' तर इटलीची 'व्हेस्पा' स्कुटर तयार करणारी 'पिजीओ.'

दोन चाकी वाहनांत 'मोटरसायकल' या प्रकारात 'होंडा' तर स्कुटर या प्रकारात 'पिजीओ' ह्यांचं राज्य आहे. कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात प्रथम असणाऱ्या उद्योजकांचे भारतात होणारे आगमन कितपत यशस्वी होते हे काळ ठरवलेच; परंतु लोक मात्र आशा लावून आहेत.

आपल्याकडील हवामान, रस्ते व आर्थिक स्थिती लक्षात घेता दोन चाकी वाहनांतर्गत तीन प्रकार लोकप्रिय आहेत. (१) मोपेड (२) स्कुटर (३) १०० cc ची मोटरसायकल. जास्त आकाराचे इंजिन असणाऱ्या किंवा स्पोर्टस् मोटरसायकलस् यांना जशी प्रगत राष्ट्रांत मागणी आहे तशी इथे असणार नाही. किंमत आणि इंधनबचत या दोन महत्त्वाच्या बाबींवर भारतातील दोन चाकी वाहनविक्री अवलंबून असल्याने वर उल्लेखिलेले तीन प्रकारच येथे तग धरू शकतात.

चामुंडी मोपेडस् ह्या भारतीय उद्योगांनी निर्माण केलेली 'स्पोर्टिफ' ही मोपेड सर्वांचे लक्ष वेधून आहे. प्युजो या फ्रान्सच्या उद्योगाबरोबर सहकार्याने केलेले हे उत्पादन आहे. ऑटोगियर व ८५ कि. मी. लिटर चलन ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत, तर एनफील्ड इंडिया या दुचाकी वाहन तयार करणाऱ्या भारतीय उद्योगाने जर्मनीच्या 'झुंडुप या उद्योगाबरोबर सहकार्याने 'सिल्व्हर प्लस' आणि 'एक्स्प्लोरर' ही दोन उत्पादने सुरू केली आहेत.

### अनेक 'दादा' कंपन्या उत्पादनात

वजनाला हलकी, किंमतीला कमी व पेट्रोलची बचत करणारी असा लौकिक असणाऱ्या मोपेडस्चा मेंटेनन्स ही एक समस्या आहे. त्यामुळे तिच्या लोकप्रियतेवर मर्यादा पडतात. भारतात सध्या मोपेडचे उत्पादन चांगले आहे. त्यामुळे या नवीन उत्पादनांना स्पर्धेत टिकण्यासाठी चांगली कामगिरी करावी लागेल. स्त्रियांच्यात प्रिय असलेली लूना, कमी किंमतीसाठी प्रसिद्ध असलेली हिरो मॅजेस्टिक व त्यातल्या त्यात दणकट व कमी मेंटेनन्स असलेली बजाज एम ५० या भारतील मोपेडस्च्या एकूण खपातील ९५ टक्के वाटा उचलतात. कायनेटिक इंजिनिअरिंगची लूना व स्पार्क मिळून भारतातील ४० टक्के वाटा उचलतात. ९८ हजार उत्पादन असणाऱ्या कायनेटिक इंजिनिअरिंग उद्योगाच्या बरोबरीने हीरो सायकलस प्रा. लि. यांची हीरो मॅजेस्टिक मोपेड भारतातील मोपेडस्चा ३६ टक्के वाटा उचलून आहे. साधारणतः या तीनही मोपेड लिटरमागे ५० ते ५५ कि. मी. पळतात. नवीन सहकार्यकृत उद्योगांना किंमत, पेट्रोलबचत या बाबतीत भारतीय उद्योगांनी मागे टाकणे आवश्यक आहे. तरच ते स्पर्धेत टिकतील आणि तसे झाले तर चांगल्या मोपेडचे सुख अनेकांना लाभू शकेल.

भारतात बजाज आणि स्कूटर ही नावं जशी बरोबरीने घेतली जातात, तशी परदेशात व्हेस्पा आणि स्कूटर ही नावे बरोबरीने घेतली जात. बजाज स्कूटर हे व्हेस्पा स्कूटरचंच जुनं अपत्य असल्याने व्हेस्पाचे नाव येथून फारसे पुसले गेले नाहीये. लोहिया मशीन टूल्स व आंध्र स्कूटर या दोन भारतीय उद्योजकांनी व्हेस्पाबरोबर सहकार्य करून

व्हेस्पा एक्स इ १०० व पीएल १७० या दोन उत्पादनांच्या निर्मितीला प्रारंभ केला आहे. दोन्हीही उद्योग वर्षाकाठी १ लाख स्कूटरची निर्मिती येत्या काही वर्षांत करू पहाणार आहेत. पेट्रोलबचतीच्या बाबतीत जरी चांगली असली तरी किंमतीच्या बाबतीत दोन्ही उद्योगांनी निराशा केली आहे; परंतु एक दर्जेदार वाहन त्यांनी ग्राहकाला उपलब्ध करून दिले आहे एवढीच कमाई म्हणता येईल.

भारतीय स्कूटरजगतातील राजा म्हणजे बजाज! किंमत आणि मेंटेनन्स या बाबतीत बजाजने नवीन उत्पादनांना पुढे जाऊ दिले नाही; परंतु पेट्रोलबचतीत ते गेले, बघू लोक काय निवडतात ते!

'होंडा' या नावातच जादू आहे! कायनेटिक इंजिनिअरिंग या भारतातील एका प्रथितयश उद्योगाबरोबर होंडा ही जगातील दोन चाकी वाहनातील 'सुपरस्टार' उद्योग-सहकार्य करत आहे. ८० साली स्कूटरच्या उत्पादनांना सुरुवात केलेल्या होंडाची स्कूटर आज व्हेस्पाची प्रमुख स्पर्धक आहे. भारतीय रस्त्यांवरील बजाजची मक्तेदारी होंडा संपवेल का? ते काहीही होवो, ऑटोगिअर असणाऱ्या कायनेटिक होंडा या गाडीच्या स्वागतास सगळे सज्ज आहेत!

मध्यम आकाराची दोन चाकी वाहने (स्कूटर सोडून) भारतात अपवादात्मक आढळतात. १००० cc किंवा त्याच्या आस-आसपासचा आकार असणाऱ्या इंजिनांच्या मोटरसायकल्स भारतात जवळजवळ नाहीतच. मोटरसायकलच्या जगतात होंडा, सुझुकी आणि कावासाकी ही जी 'दादा' मंडळी आहेत ती भारतात उत्पादनांना सुरुवात करत आहे.

होंडाची लोकप्रियता लक्षात घेता, हीरो-होंडा या वाहनाचे इतर दोघेमिळून प्रतिस्पर्धी आहेत. १९४७ साली इंजिन असलेली दुचाकी तयार करण्यापासून या कंपनीची प्रगती जपानमधील दोन चाकी वाहनांच्या निर्मितीत ५० टक्के वाटा उचलण्यापर्यंत झाली आहे. दरवर्षी ३१ लाख दोन चाकी वाहनांची निर्मिती करणाऱ्या या जपानी उद्योगाची वार्षिक उलाढाल ही ११ हजार कोटींच्या घरात आहे, तर अशा दोन चाकी वाहनांच्या निर्मितीत अत्युच्च टोकावर असलेल्या होंडाच्या सहकार्याने येणारी हीरो-होंडा ही गाडी सर्वांचे लक्ष वेधून आहे. प्रथम वर्षी ४०,००० वाहनांची निर्मितिक्षमता ठेवून तीन वर्षांत ही क्षमता दोन लाखांवर नेण्याचा उद्योजकांचा इरादा आहे. या दोन चाकी वाहनाचा पेट्रोलबचत हा सर्वांत मोठा 'plus point' आहे. लिटरमागे ८५ कि.मी. ही गाडी धावू शकेल, अशी खात्री उद्योजक देत आहेत.

Ind-suzuki या दोन चाकी वाहनाचे उत्पादनास प्रारंभ होऊन दोन महिने झाले. भारतात उत्पादिलेले मध्यम आकाराचे पहिले दोन चाकी वाहन हेच याचे वैशिष्ट्य. T.V.S. 50 या यशस्वी उत्पादनानंतर suzuki या जपानमधील नामवंत वाहनउद्योगाबरोबर सहकार्याने Ind-suzuki च्या उत्पादनास प्रारंभ झाला. ४० हजार, ७० हजार, १ लाख अशा टप्प्यात उत्पादन वाढवण्याचा उद्योजकांचा विचार आहे. दहा हजार रुपये किंमत असलेल्या या दोन चाकी वाहनाला मेंटेनन्स विशेष नाही. लिटरमागे ५५ कि. मी. धावू शकणारी Ind-suzuki ही एक देखणी दुचाकी आहे. 'अपेक्षेपेक्षा या दोन चाकी वाहनाला जास्त प्रतिसाद मिळाला आणि विकत घेणाऱ्यांच्या 'तक्रारी' नाहीत. या Ind suzuki च्या जमेच्या बाजू.

बजाज स्कूटरचे निर्माते मोटरसायकलच्या निर्मितीत पडताहेत ते कावासाकीच्या सहकार्याने. किंमत आणि कमी मेंटेनन्स याबद्दल बजाज प्रसिद्ध तर दणकट वाहन देण्याबाबत कावासाकी. बजाजकडे नाव भरपूर आहे, त्याचा त्यांना फायदा होईलच. तेसुद्धा तीन टप्प्यात उत्पादन वाढवणार आहेत. त्यांच्या नावाची प्रतिष्ठा टिकवतात का ते यापुढे दिसेलच.

नवीन-नवीन सहकार्य-करार होत आहेत, अजूनही होतील; पण त्यामुळे दर्जा व किंमतीचा समतोल येईल असे खात्रीने म्हणता येईल का? का आपलं ये रे माझ्या मागल्या? काय होतं ते पाहण्यास आपण सारेच उत्सुक आहोत.

—विनायक गोखले


## अब्राहम लिंकन
# फाळणी टाळणारा महापुरुष

• वि. ग. कानिटकर

भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

**राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.**

सविस्तर योजनापत्रक मागवा.

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# कादंबरीची जन्मकथा

पुण्याच्या महाराष्ट्र साहित्यपरिषदेने दिनांक १० नोव्हें. ते दिनांक २२ नोव्हें. पर्यंत 'कादंबरीची जन्मकथा' या विषयावर शारदीय व्याख्यानमाला आयोजित केली होती. व्याख्यानमालेत एकूण दहा व्याख्याने झाली.
'पडघवली'; 'ओंकार', 'महानगर', 'घर गंगेच्या काठी', 'होरपळ' व 'मंत्रावेगळा' या सहा कादंबऱ्यांवरील व्याख्यानांचे वृत्तांत मागील दोन अंकात प्रसिद्ध झाले.
या अंकात 'रघुनाथाची बखर', 'गोतावळा', 'मुंबई दिनांक' व 'इतिवृत्त' या कादंबऱ्यांविषयी.

**मंगला गोडबोले**

## व्यक्तित्वाच्या शब्दातून 'बखर'

'रघुनाथाची बखर' ही आपली कादंबरी गाजलेली नसून झोडपलेली आहे असा खुलासा करून श्री. ज. जोशी यांनी आपल्या कादंबरीची जन्मकथा सांगायला सुरुवात केली. ते या व्याख्यानमालेतलं सातवं पुष्प गुंफत होते. चरित्रात्मक कादंबरी लिहिणं एका अर्थानं सोपं असतं. कारण जीवनक्रम, त्यातले टप्पे, घटना व कथानक लेखकाला तयार मिळत असतं; पण रघुनाथ धोंडो कर्वे ही व्यक्ती एका नामवंत कुटुंबामधली व काळाच्या दृष्टीनेही जवळची असल्याने तिच्याविषयी काहीही लिहिणं आव्हानात्मक होतं, अवघड होतं. मौजेच्या एका दिवाळी अंकात शकुंतलाबाई परांजपे यांनी र. धों. कर्व्यांविषयीचा एक लेख लिहिला होता. तो वाचून जोशींचं कुतूहल जागं झालं. ही व्यक्ती एका चांगल्या कादंबरीचा विषय होऊ शकते हा साक्षात्कार झाला. तसं त्यांनी काहींना सुचवूनही पाहिलं; पण इतर कोणी त्याची दखल घेत नाही असं जाणवल्यावर ते स्वतःच रिंगणात उतरले, सुरुवातीलाच एक अडचण अशी जाणवली की, कर्वे कुटुंबातल्या अण्णा कर्वे, बाया कर्वे, पार्वतीबाई आठवले यांच्यासारख्या अनेकांची आत्मचरित्रं उपलब्ध आहेत. इतरही अनेकांनी त्यांच्याविषयी लिहिलेलं आहे.पण रघुनाथराव ही व्यक्तिरेखा कुठेच रंगवली गेलेली नाही. त्यामुळे त्यांचं इतर विषयांवरचं लेखन वाचून त्यावरून काही आडाखे बांधणे, त्यांना ओळखणाऱ्या काही माणसांशी बोलणं असाच पर्याय उरला. या सायासात असं जाणवलं की पुण्यात जन्मलेला, शिकलेला, वाढलेला हा माणूस 'पुणेरी' नाही, त्या विशिष्ट वृत्तीचा नाही. उलट मुंबईचं कॉस्मॉपॉलिटन व्यक्तिमत्त्व त्यात उतरलं आहे. स्वतःला कुरूप समजणारा, ज्ञानी, प्रज्ञावंत पण एककल्ली, विक्षिप्त, स्वतःला मूल होऊ नये अशी इच्छा करणारा, समाजाशी फटकून राहणारा, भांडखोर अशा अनेक स्वरूपांमध्ये हा माणूस सामोरा आला. त्याच्यापेक्षाही त्याच्या पत्नीची व्यक्तिरेखा रंगवणं बिकट झालं. कारण ती अधिकच अंधारात होती. तिच्या आप्तेष्टांकडून माहिती मिळवताना ती अतिशय दबलेली, खंतावलेली, समाजात एकटी पडलेली स्त्री होती हे जाणवलं. अर्थात या जोडप्याच्या क्रिया-प्रतिक्रिया त्यांच्या समकालीन समाजाच्या पार्श्वभूमीवर रंगवायच्या असल्यामुळे त्याचा अभ्यासही करावा लागला. स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्र, मराठी समाज, संस्कृती यातले काही नमुने पत्रांच्या रूपात उभारायचे ठरल्यानंतर नमूसारखं पुरोगामी व्यक्तिमत्त्व आलं. ही लिंगस्वातंत्र्याची भोक्ती दाखवलेली आहे. खुद्द 'समाजस्वास्थ्य'मध्ये 'शारदेची पत्रे' म्हणून एक पत्रोत्तरांचे सदर असे. त्यातल्या प्रश्न विचारणाऱ्या स्त्रियांसारखो धीट, पुरोगामी स्त्री गंगूच्या (म्हणजे रघुनाथाच्या कादंबरीमधल्या पत्नीच्या) व्यक्तिरेखेच्या ठळक विरोधात उभी करावी लागली. तिचे पुरोगामी विचारवंत वडील भाऊसाहेब हे त्या वेळच्या लिबरल पुढाऱ्यांचा नमुना म्हणून कादंबरीत आले. मार्क्स, फ्रॉइड, सफ्रेजेट चळवळ ह्या परदेशातल्या विचारधारा व स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, स्वराज्यसंपादन या भारतातल्या चळवळी या सर्वांचा तेव्हाच्या विचारी माणसावर प्रभाव पडत होताच. त्याचं चित्रण प्रातिनिधिक स्वरूपात करण्यास या पात्रांची मदत झाली. सशस्त्र क्रांतिकारकांपैकी एक म्हणजे माधवचं पात्र आणून हा पट बहुतांशी पूर्ण केला गेला. या सर्व सजीवांच्या पलीकडे जाऊन 'कामशास्त्र' हीही एक ठळक व्यक्तिरेखा या कादंबरीत येणार होतीच. कारण रघुनाथरावांचं संपूर्ण जीवन तिच्याभोवती घोटाळत होतं. त्या दृष्टीनं जोशींना आपल्या पारंपारिक कामशास्त्राचाही अभ्यास करावा लागला. स्त्रीसुख हे प्रजोत्पादनाकरताच घ्यायचं असतं असं ते मानत होते. ब्रह्मचर्य हे जीवन, वीर्यनाश हा मृत्यू यासारख्या कल्पना समाजात मूळ धरू बघत होत्या. अशा काळात अपत्यसंभवाच्या धोक्याशिवाय संभोग हे स्वप्न या चरित्रनायकानं पाहिलं. ते काळाच्या इतकं पुढचं होतं की, त्याचं स्वागत होणं अवघडच होतं. या अव्यापारेषु व्यापारातून त्या व्यक्तीच्या, तिच्या कुटुंबाच्या आणि मुख्यतः तिच्या कार्याच्या वाटचालीला जे काही आलं त्यावर जोशींनी लक्ष केंद्रित केलं.

यासाठी कलावंताचं स्वातंत्र्य घ्यावं लागणं अटळ होतं; पण त्यावरच टीकाकारांकडून आक्षेप घेतले गेले. नमूचा पहिला शय्याप्रसंग ज्या तऱ्हेनं रंगवला ते लोकांना आवडलं नव्हतं. रघुनाथरावांच्या काही सवयी, लकबी छंद, टेनिससारखे खेळ कादंबरीत आले नाहीत हा आक्षेप होताच; पण अधिक गंभीर आक्षेप होता तो रघुनाथरावांचं एका विधवा स्त्रीवर मन जातं या प्रसंगावर. या प्रसंगाला इतिहासाची साक्ष नाही हे जोशींनी मान्य केलं; पण संततिनियमनाचं कार्य हाती घ्यावंसं वाटण्यासाठी नायकाच्या आयुष्यात असा एखादा संघर्षाचा प्रसंग रंगवणं त्यांना जरुरीचं वाटलं. अपत्यसंभवाचा धोका टाळून त्या स्त्रीशी जवळीक साधण्याची निकड

त्यांना तीव्रपणे जाणवावी, तशी सोय उपलब्ध नसल्यानं निराशा व्हावी आणि अशी इतरांची कुचंबणा होऊ नये म्हणून त्यांनी या शास्त्राचा पुरस्कार करावा अशा विचाराने हा प्रसंग कादंबरीत आला असं त्यांनी सांगितलं. कादंबरीवर घेतलेले पुष्कळसे आक्षेप त्यांना बालिश वाटले तर काही ललितकृतीच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारे वाटले. बीज चरित्राचं असलं तरी कादंबरीची इमारत कादंबरीकार रचतो याचं भान सतत असायला हवं. आज मागे वळून बघताना या कादंबरीच्या शीर्षकात आपण फसलो असं जोशींना वाटतं. रघुनाथ या नावाचा प्रसिद्ध पेशवा असणं आणि त्याच्याशी 'बखर' जोडणं यामुळं या सामाजिक कादंबरीची निष्कारणच इतिहासाशी गल्लत केली गेली व वाचक पुरेसा आकृष्ट झाला नाही असं त्यांच्या लक्षात आलं. आपल्याकडून आपण उपलब्ध सामग्रीचा जास्तीत जास्त उपयोग करून ही व्यक्तिरेखा रंगवण्याचा प्रयत्न केला होता, एवढंच समाधान त्यांच्यापाशी आहे. प्रत्यक्ष त्या दिवशीच्या व्याख्यानात मात्र या घडपडीमागच्या गांभीर्यापेक्षा फुटकळ विनोद, काही प्रचलित वृत्ती-व्यक्तींची चेष्टा, कोपरखळ्या यांनीच जास्त वेळ व्यापल्यासारखं मला वाटलं.

## नव्या संस्कृतीचा जन्म-गोतावळा

मराठी रसिकता गेली कित्येक वर्षं डॉ. आनंद यादव यांना कथालेखक, कवी, कादंबरीकार, समीक्षक आणि ग्रामीण साहित्यचळवळीचे अध्वर्यु अशा वेगवेगळ्या रूपांमध्ये बघत आहे. 'गोतावळा' या त्यांच्या कादंबरीचा वेगळेपणा अनेकांना जाणवला आहे. याच विषयावर २० नोव्हेंबर रोजी त्यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिलं. निर्मितीच्या अंगानं विचार करता त्यांनी पहिल्यांदा कादंबऱ्यांचीच वर्गवारी केली. एका वर्गात सामाजिक कादंबऱ्यांचा समावेश केला. यात प्राप्त समाजात, वर्तमान वास्तवात सापडणारी कथाबीजं आपल्या आकलनानुसार फुलवण्याचा प्रयत्न कादंबरीकार करत असतो. यात घटनाप्रसंगांच्या उभारणीचं पूर्ण स्वातंत्र्य लेखकाला मिळतं हा लाभ होतो; पण त्याचबरोबर एक सुसंगत पट विणण्याची, निर्मितीची फार मोठी जबाबदारी त्याच्यावर पडते. म्हणून सामाजिक कादंबरी लिहिणं हे अधिक मोठं आहे व तिच्या यशापयशाचं सर्व श्रेय लेखकाचं आहे असं डॉ. यादव मानतात. दुसऱ्या गटात ते ऐतिहासिक, पौराणिक, चरित्र-आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांचा समावेश करतात. यात पात्र, प्रसंग, घटना, कथानक आयतं मिळाल्यानं लेखकाच्या प्रतिभेचा कस तिथे लागत नाही; पण आहे तोच ऐवज अधिक देखणा, जिवंत करण्याच्या प्रयत्नात त्याची कल्पकता पणाला लागते. या पार्श्वभूमीवर सामाजिक कादंबरी लिहिण्याचं आणि तीही भावस्थितिप्रधान सामाजिक कादंबरी लिहिण्याचं आव्हान आपण कसं पेललं हे त्यांनी विशद करून सांगितलं.

'गोतावळा'मध्ये प्रत्यक्ष घटना फारच कमी. कादंबरीच्या सुरुवातीस मळ्यामध्ये ट्रॅक्टर येऊ घातलेला आहे व कादंबरीच्या अखेरीस तो प्रत्यक्ष आलेला आहे एवढीच काय ती घटना. तेवीस प्रकरणं तिच्यावर लिहिणं अवघड होतं. मुळात डॉ. यादव या ग्रामीण संस्कृतीत मुरलेले. शेतीची जुनी सांस्कृतिक परंपरा नष्ट होत आहे आणि स्वातंत्र्योत्तर काळात नवी यंत्रनिष्ठ संस्कृती मळ्यावर पसरते आहे, जुन्या व्यवस्थेमधला सर्वांत दुर्बल घटक जो शेतमजूर तो या नव्या व्यवस्थेत नाहीसा होणार आहे हे त्यांनी फार जवळून पाहिलं आणि अनुभवलं होतं. १९५७-५८ च्या सुमारास लिहिलेल्या एका कवितेत व १९६६ डिसेंबरमध्ये लिहिलेल्या 'इंजन' या कथेत या कादंबरीचं बीज होतं; पण महायुद्ध रंगवायला निघावं आणि प्रतीकरूपानं दोन माणसांची मारामारी दाखवून थांबावं तसा काहीसा प्रकार ह्या कथेबाबत झाला असं डॉ. यादवांना नंतर जाणवलं. तो विषय जास्त ताकदीची, अधिक व्यापक पटाची मागणी करणारा होता म्हणून मग कादंबरीची धूसर आखणी मनामध्ये केली गेली. आठवणीतले, अनुभवातले चार-पाच मळे एकत्र येऊन 'गोतावळा'मधला मळा सजीव झाला, रामू सोनावणे हा त्याचा मालक आला, नारबाच्या व्यक्तिरेखेनं शेतमजुराचं प्रतीकरूपानं दर्शन घडवलं, बैल-रेड्याची जोडी-गाई-शेळ्या-कोंबड्या ही जनावरं आली, त्यांचे संसार आले आणि महत्त्वाचं पात्र ट्रॅक्टर हेही आलं. 'खळाळ' लिहिणाऱ्या लेखकाच्या मनात प्राणिसृष्टीविषयी अपार प्रेम, जिव्हाळा होताच. प्राणिजगताला न्याय देण्यासाठी प्रत्येक जनावराला त्याचं असं एक व्यक्तिमत्त्व दिलं गेलं. प्रत्यक्ष लिहिण्यापूर्वी प्राणिजीवनाचा अभ्यास करण्याची निकड भासली. त्यातून वेगवेगळ्या प्राण्यांचं आयुर्मान, सवयी, प्रजनन, अवयवविशेष यांचा अभ्यास झाला व नंतर प्रकरणवार आराखडे काढून पूर्ण नियोजनासह कादंबरीचं पहिलं लेखन सुरू झालं. ते पूर्ण करणं, कादंबरीची भावावस्था टिकवणं, क्षीण घटनासूत्राचा बारीकसारीक तपशिलांनी विस्तार करणं हा फारच जाचक, खरा तर निराशाजनक अनुभव होता. तोवर खात्यावर फक्त कथालेखन होतं. कादंबरी हा वाङमयप्रकारही नवखा होता आणि घेतलेला विषयही मानसिक गुंतागुंतीचा होता. या पहिल्या लेखनात जनावरं इसापनीतीतल्याप्रमाणे बोलताना दाखवलेली होती. जनावरं मुकी, ढोरगडी नारबाही स्वभावानं अबोल त्यामुळं कादंबरीचं सूत्रसंचालन करण्यासाठी तृतीयपुरुषी निवेदन या पहिल्या लेखनावृत्तीत होतं; पण झाला तो प्रकार फारसा जमला असं वाटत नव्हतं. निवेदक हा जणू काही त्या गोतावळ्याचा वकील झाला होता. त्याच्या अखंड बडबडीनं कादंबरी बोलघेवडी, रटाळ, कोरडी झाली होती. कथा हे वाद्यसंगीत मानलं तर कादंबरी हा ऑर्केस्ट्रा असतो. या कादंबरीत त्या प्राण्यांची उपकथानकं शेवटापर्यंत खेळवत ठेवणं हीही समस्या होती आणि पहिल्या लेखनात तिची उकल झाली नव्हती. म्हणजेच वाद्यमेळ जमला नव्हता. अखेरीस ही संपूर्ण पहिली आवृत्ती रद्द करून नारबाच्या निवेदनात पुनर्लेखन करण्याचं ठरलं. स्वगताचा वाङमयीन प्रयोग करून त्याच्या मनातल्या स्पष्ट-अस्पष्ट नोंदी टिपण्याचं ठरलं. दुसरं लेखन पूर्ण झाल्यावर काही जाणकार मित्रांना ते दाखवलं. कादंबरीला उत्कर्षबिंदू असा नाही, शेवट अचानक होतो, ट्रॅक्टरचं पात्र ठिगळासारखं जोडलं जातं व या नव्या यंत्रसंस्कृतीचं अर्थकारण विचारात

घेतलं जात नाही असे काही मुद्दे जाणकारांनी पुढे आणले. यापैकी अर्थकारणाचा मुद्दा या विषयाच्या कक्षेत परिपोषासाठी आवश्यक नाही असं ठरवून तो हेतुतःच मागे ठेवला गेला; पण इतर आक्षेपांचा गंभीरपणे विचार करून कादंबरीची तिसरी व अखेरची आवृत्ती लिहायला घेतली तेव्हा ती आजच्या स्वरूपात जन्माला आली. सुरुवातीला १९ प्रकरणांची योजना होती ती तेवीस झाली. जनावरांचं वृथा मानवीकरण टळलं. ट्रॅक्टर हे पात्र कादंबरीभर खेळवलं गेलं. प्रत्येक प्रकरणात छायेसारखं त्याचं अस्तित्व राहिलं. ट्रॅक्टरी संस्कृतीच्या छायेत नवी संस्कृती जशी भारली तशी रंगदली. तरीही या आवृत्तीत नारबा मळा सोडून जातो असा शेवट केला होता तो प्रूफं तपासण्याच्या अवस्थेत बदलला. नारबा कितीही अबोल, मंदबुद्धी, महत्त्वाकांक्षाशून्य असला तरी संवेदनाशील आहे. तो मळा सोडून जाऊ शकणार नाही आणि तिथे राहूही शकणार नाही अशा दोलायमान अवस्थेत त्याचा शेवट करणं अधिक सयुक्तिक वाटलं. म्हणून कादंबरीत तो शेताच्या म्हणजेच पर्यायाने निर्णयाच्या सीमेवर अडकून पडलेला दाखवला आहे. ही कादंबरी लिहिल्यापासून आजवर तशा प्रकारचं लेखन डॉ. यादव करू शकलेले नाहीत. वास्तविक त्या स्वरूपाला लोकांनी मान्यता दिली होती व लोकप्रियतेपासून साहित्यिकसन्मानापर्यंत सर्व तिनं मिळवलं होतं. तरीही त्या काव्यात्म पद्धतीनं निसर्गाला, निर्जीवाला सजीव करणं त्यानंतर पुन्हा जमलं नाही. कारण आपलं तोवर साचत आलेलं सगळं भावविश्व 'गोतावळा'मध्ये रितं झालेलं आहे असं डॉ. यादव यांना वाटतं. त्यानंतर त्यांचं वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वच बदललं. पुन्हा ठरवूनही तसं लिहिणं शक्य नव्हतं. माधव मनोहरांनी 'गोतावळा'ला 'एका युगान्ताची कहाणी' असं म्हटलेलं आहे. ती एका साहित्यिक व्यक्तिमत्त्वाच्या अंताचीही कहाणी होती असं डॉ. यादव म्हणाले.

## मुंबई दिनांक–अभावित जन्म

१९७३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'मुंबई दिनांक' या कादंबरीनं अरुण साधू हा नवाच लेखक मराठी साहित्याला बहाल केला. या लेखकावर वाचकांचं किती प्रेम आहे याची निदर्शक होती २१ नोव्हेंबरच्या त्यांच्या व्याख्यानाची गर्दी. इंग्रजी वृत्तपत्रकारितेमध्ये अपवादानं आढळणाऱ्या मराठी माणसांपैकी एक अरुण साधू 'मुंबई दिनांक'मध्ये वृत्तपत्रकारितेचं, तिच्याशी संबंधित असलेल्या राजकारण्यांचं, कामगार-चळवळीचं, सत्तास्पर्धेचं एक थरारक नाट्य वाचकांसमोर आलं. त्याची म्हणजच पर्यायानं कादंबरीची मुळं एकदम दाखवता येणार नाहीत, किंबहुना ऋषीचं कूळ आणि नदीचं मूळ याच्याप्रमाणेच कल्पनेचं मूळही शोधू नये असं साधूंना वाटतं. ते मूळचे अमरावतीचे. विज्ञानविषयाचे पदवीधर; पण वृत्तपत्रकारितेत शिरल्यानंतर त्यांना मुंबईचं जे दर्शन घडलं, त्यानं ते स्तिमित झाले. मुंबईतली गर्दी, गडबड, घड्याळाच्या तालावर चालणं, क्षणोक्षणीचा संघर्ष एकीकडे तर या सर्वांतूनही झुंजण्याची, झगडण्याची, आनंद मानन पुढे जाण्याची वृत्ती दुसरीकडे. यातून मुंबई नावाची एक organic entity तयार होते. एक स्वतंत्र रासायनिक अस्तित्व तयार होतं व मुंबईला नवखा असलेला माणूस त्यानं झपाटला जातो. मुंबईचं हे वेगळेपण, क्षुद्रपण आणि भव्यता एकाच वेळी असणं हे तोवर मराठी साहित्यात आलेलं नव्हतं. अर्थात मुंबई जितकी परकी तितकंच मराठी साहित्याचं क्षेत्रही साधूंना परकं होतं. 'माणूस' मधलं काही लेखन, हंसा वाडकरांचं आत्मचरित्र अशी थोडी मुलुखगिरी केली असली तरी कादंबरी लिहिण्याची इच्छा, प्रेरणा किंवा जाणीव नव्हती. मात्र मुंबईचं हे रसायन काही माणसांच्या स्केचेसमधून दाखवता येईल अशी अगदी ढोबळ कल्पना एकदा आली व श्री. विजय तेंडुलकरांसारख्या मातब्बर सहकाऱ्यानं ती उचलून धरली. सतत पाठपुरावा करून साधूंना त्या व्यक्तिरेखा रंगवायला तेंडुलकरांनीच भाग पाडलं. सुरुवातीच्या लेखनात ही पात्रं सुटी, स्वायत्त होती; पण लिहून झाल्यानंतर त्यांच्यात काही तरी अंतःस्थ सूत्र आहे असं जाणवू लागलं. हे सूत्र किंवा दुवा साक्षात मुंबई हाच होता. त्यामुळं वरकरणी असंबद्ध वाटणारी ही पात्रं व त्यांची स्केचेस साधूंनी पत्त्यांप्रमाणे एकापुढे एक मांडली व अभावितपणानेच ही कादंबरी जन्माला आली. आज वाचकांचा समज होतो तसा राजकारणाचा दांडगा अभ्यास वगैरे त्या वेळी केलेला नव्हता किंबहुना तोपर्यंत ते राजकीय पत्रकारितेत शिरलेलेही नव्हते; पण अशा प्रकारचा प्रत्यक्ष अनुभव किंवा राजकारणातल्या घडामोडींचा सूक्ष्म अभ्यास यापेक्षाही माणसा-माणसातल्या नातेसंबंधांची जाणीव, समजूत, आकलन याचा कादंबरीलेखनाला जास्त उपयोग झाला असेल, असं आता साधूंना वाटतं. अर्थात, आज मागं वळून बघताना, तेव्हाचं आपलं आकलन फारच प्राथमिक होतं म्हणून लेखनही समाधानकारक झालं नव्हतं, असं साधूंना वाटतं. अप्रबुद्ध माणसानं, अपुऱ्या सामग्रीनिशी, अगदी ढोबळपणे वरवरच्या स्वरूपात, उथळ संभाषणामध्ये या कादंबरीची मांडणी केलेली आहे, इतक्या प्रखर शब्दांमध्ये त्या दिवशी साधूंनी कादंबरीचा पंचनामा केला.

मराठी वाचकांना तसं वाटलेलं दिसत नाही. ही कादंबरी वाचण्याचा व तिच्यातल्या ठळक व्यक्तिरेखा सत्यामध्ये शोधण्याचा, ओळखण्याचा वाचकांनी जणू ध्यासच घेतला. यातला मुख्यमंत्री, ट्रेड युनियन लीडर, वार्ताहर हे सगळे अमुक-अमुक व्यक्तीवरून घेतले आहेत, असं जेव्हा वाचक म्हणतात तेव्हा साधूंना सांगावं लागतं, कुठलीही व्यक्तिरेखा आकाशातून उतरत नसते किंवा जमिनीतून उगवत नसते. माहितीतल्या, आठवणीतल्या, वास्तव्यातल्या अनेक व्यक्तींचे रंगतरंग सफाईने मिसळून ललितकृतीमधील एकेक व्यक्तिरेखा आकार घेते, हे सर्व साहित्याला लागू आहे. असं असताना, 'मुंबई दिनांक'मधीलसारख्या व्यक्तिरेखा लोकांना इतक्या खात्रीनं ओळखाव्याशा का वाटतात? याचं कारण इतकंच की, त्या सर्वसामान्यांपेक्षा अल्पसंख्य गटातल्या असतात. म्हणजे उदाहरणार्थ शिक्षकाच्या व्यक्तिरेखेपेक्षा

मंत्र्यांची व मंत्र्यापेक्षा मुख्यमंत्र्याची व्यक्तिरेखा जास्त 'टिपिकल' असते व सतत समाजासमोर प्रकाशझोतात असल्याने ती लोकांच्या दृढ परिचयाची असते. त्यामुळं ओळखणं सोपं जातं. वस्तुतः 'मुंबई दिनांक'-मधल्या सर्व व्यक्तिरेखा काल्पनिक आहेत. अपवाद फक्त चीफ रिपोर्टर अय्यरच्या व्यक्तिरेखेचा. ती वास्तवातून जशीच्या तशी घेतली आहे. या कादंबरीमुळं लेखकाला राजकारणी व्यक्तींकडून त्रास होईल, असं काहींना वाटत होतं. प्रत्यक्षात तसं झालेलं नाही. उलट अनेक मंत्र्यांनी, आमदारांनी, वार्ताहरांनी कादंबरीच्या पानात स्वतःला शोधण्याचा प्रयत्न केला व कळत-नकळत तशी कबुलीही दिली.

या कादंबरीच्या लोकप्रियतेचा साधू स्वतःच विचार करतात तेव्हा त्यांना वाटतं की, अगदी नवीन विश्व, नवा अनुभव, नवी भाषा, नवी लेखनपद्धती यामुळंच या कादंबरीनं वाचकांचं लक्ष वेधून घेतलं असावं. प्रसिद्ध फ्रेंच लेखक विचारवंत बाल्झॅक म्हणत असे, I am the secretary of the French Society. मी फ्रेंच समाजाचा सेक्रेटरी आहे. सेक्रेटरी जसा अलिप्तपणानं एखाद्या सभेची मिन्युट्स, वृत्तांत टिपून ठेवत असतो तसाच लेखक समाजातल्या घडामोडी नोंदून ठेवतो. 'मुंबई दिनांक' हा अशा प्रकारचा बराचसा प्राथमिक प्रयत्न होता; पण 'मुंबई' हा विषय एवढा बुलंद आहे की, त्यावर अजूनही पुष्कळ लिहिण्याजोगं शिल्लक आहे. वाढतं वय, वाढत्या जाणिवा, प्रगल्भ आकलन यामुळं पुढं-मागं आपणच या विषयाला अधिक न्याय देऊ शकू अशी शक्यता साधूंना वाटते. ही शक्यता वास्तवात यावी अशी अपेक्षा त्यांचे वाचक निश्चितच करत असतील.

## इतिवृत्त—
## नव्या निवेदनशैलीचा शोध

या व्याख्यानमालेतील अखेरचं भाषण 'इतिवृत्त' या कादंबरीबद्दल श्री. ह. मो. मराठे यांचं होतं. 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' आणि 'काळेशार पाणी' या आपल्या सुरुवातीच्या दोन कादंबऱ्यांमधून अर्धकच्चे, धगधगीत अनुभव बेबंदपणे मांडणारे मराठे 'इतिवृत्त' पर्यंत फारच 'सोफिस्टिकेटेड' झाले आहेत असं प्रास्ताविकात सांगून प्रा. स. शि. भावे यांनी मराठ्यांना डिवचण्याचा प्रयत्न केला होता, त्याची नोंद मराठ्यांनी भाषणाच्या सुरुवातीसच घेतली; पण त्याचं उत्तर दिलं नाही. त्यामुळं या आरोपाविषयीची त्यांची भूमिका समजू शकली नाही. 'इतिवृत्त'चं कथानक थोडक्यात सांगून व त्यातले काही आवश्यक ते तुकडे वाचून दाखवून त्यांनी आपल्या कादंबरीचा आशयसंकेत स्पष्ट केला. मुंबईतला एक उपसंपादक श्रीरंग नाडकर्णी, फळणिटकर या उद्योगपतीच्या मालकीच्या एका दैनिकाचा संपादक म्हणून आडगावी येतो. संपादकांचं स्वातंत्र्य, ध्येयवाद व ताकद यावर त्याचा भरवसा असतो; पण मालकांची प्रतिमा उजळणारी आंदोलनं तो जोवर करतो तोवर त्याला सर्व मदत व श्रेय दिलं जातं. मालकांना अडचणीत टाकण्याचा प्रसंग येताच त्याची उचलबांगडी होते असं ढोबळमानानं कथानक आहे. फळणिटकर हा उद्योगपती, त्याचा मुलगा, अण्णासाहेब जगदाळे हा मुख्यमंत्री, त्याचा साडू भोगले, मजूरमंत्री कदम, पुढे उपमुख्यमंत्री होणारा गजानन नाईक अशा अनेक व्यक्तिरेखा हे कथानक पुढे नेतात. राज्यकर्त्यांचे व प्रसिद्धिमाध्यमाचे हितसंबंध हा अगदी ताजा विषय आहे; पण ही कादंबरी राज्यकर्त्यांमधल्या भ्रष्टाचाराची नाही, तसंच वृत्तपत्रसृष्टीचं दर्शन घडविण्याच्या हेतूनंही लिहिलेली नाही. एका संपादकाची धडपड, ध्येयवाद, बांधिलकी आणि अखेरीस माघार याकडे लेखकाचं लक्ष आहे. या कादंबरीतील सर्व पात्रे, प्रसंग, घटना व प्रदेशही काल्पनिक असल्याचा उल्लेख प्रस्तावनेत आहे. हेतू असा की, वास्तवातल्या संदर्भाने आशयावर कुरघोडी करू नये. यासाठी सागरकिनारा असलेला, ५.६ जिल्ह्यांचा एक छोटा प्रदेश कल्पिलेला आहे. 'जनता' या मुख्य कादंबरीविषय झालेल्या दैनिकाबरोबरच छोटी वृत्तपत्रे, त्यांचे चालक-संपादक-वाचक यांचेही संदर्भ जागोजागी दिले आहेत. आजची वृत्तपत्रसृष्टी ज्या वेगवेगळ्या पातळ्यांवर चालते त्या सर्वांचं प्रतिनिधित्व त्यातून होतं. पातळी कुठलीही असली तरी आजचे बहुसंख्य संपादक वृत्तपत्राला हत्यार समजत असले तरी, हे हत्यार अखेरीस दुसऱ्याच्या मालकीचं असतं हे त्यांना विसरता येत नाही. आजचं राजकारण, अर्थकारण, सत्तास्पर्धा इतकं रौद्र स्वरूप धारण करतं की, त्यात एके काळी झगडून मिळवलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा, व्यक्तीच्या भाषण-लेखन-उच्चारस्वातंत्र्याचा संकोच होतो हा खरा अस्वस्थ करणारा विषय आहे असं मराठ्यांना वाटतं. ही अस्वस्थता 'इतिवृत्त' च्या रूपानं बाहेर पडली व कित्येक वाचकांपर्यंत पोचली.

अशा स्वरूपाची कादंबरी लिहिताना काही पूर्वतयारी आवश्यक असते. त्याबाबतीत दैनिकामध्ये काही काळ केलेल्या नोकरीचा मराठ्यांना विशेष फायदा झाला. एरवी वृत्तपत्रसृष्टीचा इतका जवळून परिचय झाला नसता व इतके बारकावेही मांडता आले नसते. वातावरणनिर्मितीच्या बाबतीत या कादंबरीत तांत्रिक दोष अजिबात आढळणार नाहीत असा मराठ्यांना विश्वास वाटतो. या कादंबरीला राज्यपातळीवरच्या एखाद्या समस्येची किंवा चळवळीची पार्श्वभूमी देण्यापेक्षा जयप्रकाशजींच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचा भव्य पट उभारणं, त्यांना अर्थपूर्ण वाटलं. कारण त्यामुळं संपादकाच्या स्वातंत्र्याचा संकोच अधिक परिणामकारक होतो, स्थानिक राजकारणापेक्षा व्यापक असं स्वरूप त्याला येतं. अशा प्रकारे कादंबरीतल्या व्यक्तिरेखा वास्तवातल्या माणसांचे चेहरे घेऊन येणार नाहीत, अशी पुष्कळ खबरदारी मराठ्यांनी घेतली तरीही यातला संपादक, मुख्यमंत्री, मजूरमंत्री म्हणजे सत्यातल्या अमुक व्यक्ती असं ठामपणे ओळखणारी वाचकमंडळी निघालीच. सोबतकारांनी तर 'सोबत' मध्ये विस्तृत परीक्षण लिहून हा 'ओळखा पाहू' छाप खेळ उघड केला. मराठ्यांना असे प्रयत्न एका अर्थानं गैरलागू वाटतात. अनेक वास्तव व्यक्तींच्या रंगछटा मिसळून ललितकृतीतल्या व्यक्तिरेखा बनत असल्याने हा खटाटोप करू नये असं ते म्हणाले.

या कादंबरीची शैली त्यांना अचानकच सापडली. आजवर बहुतेक कादंबऱ्या निवेदनात्मक शैलीत असत. मराठ्यांनीही तीच लेखनपद्धती स्वीकारली होती; पण दिवसेंदिवस टीव्ही, सिनेमा यासारख्या दृश्यमाध्य-

मांचा जनमानसावरचा पगडा वाढत आहे हे त्यांना दिसत होतं. अशा परिस्थितीत केवळ छापील शब्द किंवा त्यांचं माध्यम वापरणारे लेखक निष्प्रभ ठरण्याचा धोका आहे. तो टाळायचा असेल तर चित्रपटासारखी, एका-मागून एक दृश्यं बदलणारी, दृश्यचित्रणात्मक शैली वापरावी लागेल हे त्यांनी ओळखलं व या संपूर्ण कादंबरीत निवेदक किंवा निवेदन टाळून भराभरा बदलणाऱ्या दृश्यांची मालिका तयार केली. हा प्रयोग अपेक्षेबाहेर यशस्वी ठरला असं त्यांना वाटतं.

¤

'इतिवृत्त' नं व्याख्यानमालेची इतिश्री झाली तरी माझ्या मनात काही प्रश्न उरलेच. ते अगदी व्यक्तिगत असतील व ते कोणालाही विचारण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अधिकार मला नसेल. तरीसुद्धा त्यांची नोंद करण्याचा मोह होतो. अनेक वर्षांपूर्वी, विद्यार्थीदशेत, भाबड्या वाढाळू वयात आणि त्यानंतर थोड्या माफक जाणकारीनं अनेक लेखकांची व्याख्यानं ऐकली होती. त्यानंतर फार मोठ्या गॅपनंतर पुन्हा इतके 'मोठे' लेखक, इतक्या मोठ्या संख्येनं, सातत्यानं ऐकण्याचा प्रसंग आला. व्यासपीठही तितकंच तोलामोलाचं होतं; पण संपूर्ण व्याख्यानमाला ऐकल्यानंतरही मराठी साहित्यसृष्टीचं जे चित्र डोळ्यांसमोर आलं, ते फारसं समाधानकारक नव्हतं. व्याख्यानांमध्ये विस्कळितपणा, विषयांतरं, आत्मसंतुष्टता, वेळ मारून नेणं अशा अनेक प्रवृत्ती दिसल्या. कादंबरीची जन्मकथा हा विषय तसा ऐसपैसच. त्यामुळं याला ठाशीव चौकट मारून एम. ए. मराठीचा क्रमिक तास उभा करणं शक्य नव्हतं; (तिथेही तसा तो कित्येकदा नसतो हा भाग वेगळा.) पण सगळ्यांनी सारख्या गांभीर्यानं विषयाला न्याय दिला आहे असंही वाटलं नाही. असं ऐकलं आहे की, जगातल्या अनेक नामवंत व्याख्यानमालांमध्ये वक्त्यांपाशी त्यांच्या भाषणाचा आराखडा किंवा संक्षेप आगाऊ मागवला जातो व वक्ता कितीही मोठा असला तरी तो त्यात अपमान मानत नाही. आपल्याचकडे पूर्वतयारीचं एवढं वावडं का? व्याख्यानाचा किमान आराखडा असला की, मुद्दे राहून जात नाहीत, अवास्तव भाव खाऊन गौण मुद्द्याच जास्त वेळ घेऊन जात नाही किंवा वेळाचा अंदाज चुकल्यानं तेच ते मुद्दे पुन्हा येत नाहीत. या दहा दिवसांत असे प्रकार अनेकदा झाले.

पुढल्या मालेच्या वेळी व्याख्यानाचा वेळ, आवाका, मुद्दे व त्यांचा विस्तार याविषयी थोडा अधिक साक्षेप बाळगता येईल काय याचा संयोजकांनी विचार करावा. आणखी एक नेहमीचाच मुद्दा, आज जे लेखक चुकतमाकत पण नव्या दमानं, नव्या प्रकारे लिहू बघत आहेत, त्यांची दखल अशा व्यासपीठानं आवर्जून घ्यायला हवी. गेल्या पाच–सात वर्षांत दिवाळी अंकांमध्ये एखाद्या नवशिक्या लेखकाची चांगली कादंबरी आली असेल तर तिची व त्या लेखकाची दखल घेण्याचा प्रयत्न झाला होता का? का नेहमीप्रमाणेच जोवर लेखकापाशी खूप काही सांगण्यासारखं आहे तोवर त्याला कोणी बोलत नाही व सगळं सांगण्याची ऊर्मी ओसरली की, तो शिळ्या कढीला ऊत आणत फिरणार हेच दृश्य बघायचं? आणखी एक मुद्दा म्हणजे सगळेच चांगले लेखक हे चांगले वक्ते नसतात. तो त्यांचा दोष नाही. ती अपेक्षाही नाही; पण एखाद्या सुमार वक्त्याला तासभर बोलायला लावण्यापेक्षा प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात त्याच्या कादंबरीची जन्मकथा काढून घेणं अशक्य आहे का? कार्यक्रमाच्या स्वरूपात इतपत लवचिकता आणणं थोड्या नियोजनानं सहज शक्य आहे. व्याख्यानमालेच्या समारोपात असं सांगितलं गेलं की, सध्याच्या हॉलची जागेची टंचाई दूर करण्याचा जोरदार प्रयत्न होतोय. सर्व संबंधित लेखक, वक्ते, पदाधिकारी यांच्याबद्दल पूर्ण आदर बाळगूनही असं सुचवावंसं वाटतं की, नुसती जागा मोठी होऊन पुरणार नाही, दृष्टिकोनही थोडा व्यापक, उदार, सर्वसमावेशक असला तर त्यानं मराठी साहित्याचं भलंच होईल. ☐




## गोनीदांच्या कादंबऱ्यांचं नवं मूल्यमापन

'**का**दंबरीकार गो. नी. दांडेकर' हे प्रा. वीणा देव यांनी संपादित केलेलं' पुस्तक दखल घेण्याजोगं झालेलं आहे. प्रा. वीणा देव यांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे एकाच लेखकाच्या अनेक कलाकृतींचा विविध समीक्षकांनी एकाच ग्रंथामध्ये केलेला विचार सहसा आढळत नाही. काही मराठी साहित्यिकांना रसिकांच्या हृदयात मानाचं स्थान असतं; पण समीक्षकांनी त्यांची फारशी दखल घेतलेली नसते. दांडेकर अशांपैकी आहेत. या ग्रंथात त्यांच्या कादंबऱ्यांचं मूल्यमापन अनेक मान्यवर समीक्षकांनी नव्यानं केलेलं आहे. त्यामुळं या ग्रंथाचं महत्व निश्चितच आहे. गो. नी. दांडेकर यांच्या ठळक वाङ्मयकृतीबद्दल सर्वांगीण आणि साकल्यानं समीक्षा इथे आढळते. त्यामुळे हा एकच ग्रंथ संग्रही बाळगला तरी दांडेकरांच्या अभ्यासकाला तो फार उपयुक्त आणि पुरेसा ठरेल इतकं विविधांगी लिखाण त्यात आहे.

श्री. चंद्रकांत बांदिवडेकर, डॉ. मंचरकर श्रीमती विजया राजाध्यक्ष, स. शि. भावे, डॉ. वऱ्हाडपांडे, विद्याधर पुंडलीक, डॉ. गं. ना. जोगळकर, अरुणा ढेरे ही श्रेयनामावली वाचूनच या ग्रंथाचं वजन किती असेल त्याची पुरेपूर कल्पना यत. प्रत्यक लेखाच्या सुरुवातीला स्वतः गो. ना. दांडकरांनी त्या त्या कादंबरीची जन्मकहाणी सांगितली आहे· त्यामुळे वाचकांचं जन्मकाळचं कुतूहल तर शमलंच; पण त्याचबरोबर लेखकाची लेखनप्रक्रिया आणि लेखनपूर्व आत्मनिष्ठाही प्रत्ययाला येते.

चंद्रकांत बांदिवडेकर यांचा या ग्रंथात बराच वाटा आहे. त्यानी 'कादंबरीकार गो. नी. दांडेकर' या लेखात दांडेकरांच्या या एकाच पैलूचा सर्वंकष आणि विस्तारानं वेध घेतला आहे. दांडकरांचे लेखनगुण मान्य करूनही दांडेकरांच्या लिखाणातील भडक नाटकीपणा, त्यामुळं येणारी कृत्रिमता, त्यांचा स्थितिवादी दृष्टिकोण, जुनी परंपरा, सामाजिक जाणिवेचा अभाव, गतानुगतिक, काळाशी संधान न ठेवणारी पात्रं वगैरे अनेक उणीवांचा परामर्ष घेतलेला आहे. तरीही

दांडेकरांचा वाचकवर्ग फार मोठा आहे, याची कारणमीमांसा करताना श्री. बांदिवडेकर म्हणतात की, समृद्ध निसर्ग, मातीचा सच्चेपणा, भाषाप्रभुत्व, कारुण्याचं अप्रतिम चित्रण या गुणांमुळे वाचकांवर त्यांच्या कादंबऱ्यांची चांगलीच पकड बसते.

'शितू'च्या निमित्तानं डॉ. मंचरकर यांनी दांडेकरांची बलस्थानं नेमकी हेरलेली आहेत. ते म्हणतात की, भारतीय जीवनाची स्पंदनं पकडणं हे दांडेकरांचं एक बलस्थान आहे. परंपरेला धक्का लागेल असं ते काही लिहीत नाहीत. दुसरं असं, की दांडेकरांच्या शैलीला एक चित्रवाण आहे. अतिशय चित्रमय शैली, विलक्षण जिवंत. कारण त्यांचे त्यामागचे अनुभव जिवंत आहेत. आपल्या भ्रमणकालात त्यांनी जे अनुभवलं, ते खरोखरं लोकविलक्षण होतं. भारून टाकणारं होतं. ते अनुभवच वाचकांना खिळवून ठेवायला समर्थ आहेत. दांडेकरांच्या बोलीभाषांवरचा अधिकार आश्चर्यकारक आहे. त्यामुळे त्यांची भाषा प्रवाही बनते. संवाद अतिशय स्वाभाविक होतात. कोकणी, ठाकर, वैदर्भी, खानदेशी, यादवी, शिवकालीन किती तरी बोलीभाषा त्यांनी इतक्या सफाईनं वापरल्या आहेत की त्या वाचताना थक्क व्हावं.

श्रीमती विजया राजाध्यक्ष यांनी 'पडघवली'चं मूल्यमापन साक्षेपानं केलं आहे. या कादंबरीत जिवंत वैशिष्ट्यपूर्ण माणसांचा एक समूह आहे, प्रत्येकाला वेगळेपणा आहे. या माणसांमधून मानवी जीवनाचं चलनवलन दिसतं. असं मत व्यक्त करून श्रीमती राजाध्यक्ष यांनी त्यांच्या लेखात ग्रामीण आणि शहरी जीवनपद्धतीतल्या संघर्षाचं विश्लेषणही केलं आहे.

'कुणा एकाची भ्रमणगाथा' या कादंबरीचं विवेचक, अभ्यासपूर्ण समीक्षण स. शि. भावे यांनी केलं आहे. 'शितू' ही भावकथा पडघवली ही समाजकथा आणि 'भ्रमणगाथा' ही तत्त्वकथा असं अतिशय औचित्यपूर्ण वर्गीकरण त्यांनी केलं आहे स. शि. भावे यांच्या मते भाव आणि तत्त्व यांचा मूळाकार या कादंबरीत विकसित झाला आहे. या कादंबरीच्या निवेदकाला भावानुभव व तत्त्वानुभव एकाच वेळी येतात. ते त्याला दोन विरुद्ध दिशांनी खेचतात. या खेचण्यात तो रक्तबंबाळ होतो, फाटतो, व्याकुळ होतो. स. शि. भावे यांची मीमांसा अतिशय विद्वत्तापूर्ण आहे. मराठीत दुर्मिळ असलेली तत्त्वकथा दांडेकरांनी लिहिली हे त्यांनी आनंदानं मान्य केलं आहे.

विद्याधर पुंडलिक यांनी 'माचीवरला बुधा' या कादंबरीचं परीक्षण करताना असं विधान केलं आहे की, दांडेकरांच्या साहित्यप्रकृतीला एक मौखिक परंपरा आहे. या मौखिक परंपरेच्या प्रवाहाचे पाझर त्यांच्या लेखणी—वाणीत आहेत. जानपदगीते, लोककथा, कीर्तन, म्हणी, अभंग इत्यादी माध्यमातून ही मौखिक परंपरा त्यांच्या साहित्यात झरझरताना दिसून येते. दांडेकरांच्या एका वेगळ्या पैलूवर पुंडलिकांनी प्रकाश टाकला आहे. सृष्टीशी तदाकार होण्याची माणमाची अनिवार ओढ आणि दुसऱ्या बाजूला निर्माण होणारा माणसाचा अंगभूत एकाकीपणा असा ताण या कादंबरीत आहे. या ताणामळेच या कादंबरीला विलक्षण वजन प्राप्त झालं आहे, असं पुंडलिकांना वाटतं.

'आम्ही भगीरथाचे पुत्र' ही दांडेकरांची इतकी संपन्न कादंबरी आहे की, तिचा विचार केला नाही, तर सर्व अपूर्णच राहील. मात्र सर्व तऱ्हेचे संघर्ष या कादंबरीत परिपूर्ण रीतीने विकसित झाले आहेत असं मात्र नव्हे. याबाबतीत लिहिताना डॉ. गं. ना. जोगळेकर म्हणतात की, इंजिनियरिंग परीक्षेत सुवर्णपदक मिळवलेल्या आपल्या मलाने चांगल्या पगाराची नोकरी सोडून धरणाच्या ध्यासासाठी पायपीट करावी. हे जीवनच्या वडिलांना पटत नाही; पण ते विरोध करत नाहीत. संघर्षाच्या बऱ्याच समर्थ जागा दांडेकरांनी सोडून दिल्या आहेत असं वाटतं. निसर्ग आणि माणूस यातला संघर्ष मात्र दांडेकरांनी उत्तम रेखाटला आहे. पंजाबमधील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पार्श्वभूमी या कादंबरीला लाभली आहे.

'जैत रे जैत' ही दांडेकरांची अनेक कारणांमुळे गाजलेली कादंबरी. अरुणा ढेरे यांनी तिचं सडेतोड परीक्षण केलं आहे. निसर्गाचं आणि माणसाचं नातं एका विस्मयकारक पातळीवर पकडू पाहणारी ही कादंबरी आहे. आजच्या विज्ञानयुगात आपण वावरत असलो, तरी आधुनिक जीवनाला देखील आदिम संस्कृतीच्या वारसाचा लवचिक पदर आहे, म्हणून त्या दृष्टीनंच या कादंबरीकडे बघणं योग्य होईल, असं त्या म्हणतात. आदिम जमातीतल्या श्रद्धा, रूढी, विवाहपद्धती, धर्मभावना, लौकिकभावना, नीतिमूल्यं या सर्वांचंच ती निर्दोष चित्रण करते, असं त्यांना वाटतं.

निसर्ग हा दांडेकरांच्या सर्वच कादंबऱ्यांमधला अविभाज्य घटक आहे. याची सर्व समीक्षकांना जाण दिसते. दांडेकरांच्या साहित्यातून निसर्ग काढून टाका, काहीच उरणार नाही. इतका तो निसर्ग त्यांच्या अनुभवांशी एकरूप झालेला आहे. दांडेकरांच्या लेखनमर्यादा मान्य करूनही, त्यांनी जो काही अफाट साहित्यपसारा निर्माण केला आहे तो दाद देण्याजोगा आहे, हे निश्चित.

हे पुस्तक वाचताना असं वाटतं की, अनेकांनी मिळून दांडेकरांचं एक चित्र रंगवायला घेतलं आहे. प्रत्येकानं आपला रंग भरून ते चित्र पूर्ण केलं आहे. म्हणूनच त्यातून दांडेकरांच्या कादंबऱ्यांमधले सर्वच रंग उलगडले आहेत. हे सगळं एकाच ग्रंथात मिळतं, हे अधिक महत्त्वाचं! ¤

कादंबरीकार— गो. नी. दांडेकर
संपादक — प्रा. वीणा देव
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे : २८४, किंमत : ६५ रु.

---

## शेक्सपियरच्या एका पैलूचा शोध

शेक्सपियरबद्दल जगात इतकं लिहिलं गेलं आहे की, त्याची गणनाही करणं अशक्य आहे. तरीही त्याच्या साहित्यातलं आव्हान संपलेलं नाही आणि कधी संपणारही नाही. कारण शेक्सपियरची नाटकं—विशेषत: शोकांतिका हा अर्थ—आशयाचा महासागर आहे. आपल्या दृष्टिकोणानुसार, अभ्यास आणि आस्वादानुसार त्यातील एखादा तरी थेंब ओंजळीत पकडल्याशिवाय खऱ्या वाङ्मयप्रेमी व्यक्तीला किंवा साहित्यआस्वादकाला चैनच पडत नाही. किंबहुना शेक्सपियरवर काही लिहिणं किंवा बोलणं हा रसिकाला आपल्या सुजाण आस्वादनाचा परमोत्कर्ष वाटावा. त्यातून श्री. वि. वा. शिरवाडकरांची तर गोष्टच वेगळी आहे. शेक्सपियरच्या शोकांतिका हा त्यांच्या प्रेमाचा, आदराचा आणि अक्षय कुतूहलाचा विषय आहे असं ते म्हणतातच. त्याशिवाय या आदर—प्रेमाची खरी ओळख 'नटसम्राट' बघून प्रत्येकाला पटलेली आहेच. मराठी

रूपांतराच्या निमित्तानं शिरवाडकरांचा शेक्सपियरच्या शोकांतिकांशी जवळून परिचय घडला. त्यानिमित्त वेळोवेळी त्यांनी विवेचक लेख लिहिले. त्यांचं एकत्रीकरण म्हणजेच 'शोध शेक्सपियरचा.'

हा खरोखरच शोध आहे. 'शेक्सपीरियन ट्रॅजेडी' किंवा कॉमेडी यांची सरधोपट चर्चा न करता शिरवाडकर मॅकबेथ आणि ऑथेल्लो या त्याच्या दोन श्रेष्ठ शोकांतिकांच्या अनुषंगाने पात्रांच्या मनात शिरून त्याचा तळ धुंडाळतात. हे एक मुक्त चिंतन आहे. त्यामुळे ते फार काव्यमय उतरलं आहे. हे करत असताना शेक्सपियरच्या नाटकांचे आरंभ, मॅकबेथमधील अंधार आणि प्रकाश, तसंच शेक्सपियरची नाटकं आणि मराठी रंगभूमी यांचं मार्मिक विवेचनही शिरवाडकरांनी केलं आहे. त्यातही विशेष भर आहे तो ऑथेल्लो या नाटकावर. पुस्तकाचा निम्म्याहून अधिक भाग ऑथेल्लोला वाहिलेला आहे. त्यात ऑथेल्लोच्या शोकांताचं मूळ कारण वेगळ्या पद्धतीनं शोधण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

'ऑथेल्लोच्या शोकांताचे मूळ कारण कोणते ? अनेकांनी अनेक उत्तरे दिली आहेत. 'विवेक नसलेल्या संशयापासून दयामाया नसलेल्या दैवापर्यंत' असं सांगून शिरवाडकर म्हणतात, 'एक वेगळा अन्वयार्थ मला जाणवला. संशय नव्हे, दैव नव्हे, अमानुष क्रूरता नव्हे तर दोन असमान संस्कृतींतील विसंवाद वा विरोध हे ऑथेल्लोच्या शोकांताचे आद्य आणि मूलभूत कारण आहे असे मला वाटते.' आपलं हे वेगळं आणि स्वतंत्र मत पटवून देताना शिरवाडकरांनी असं प्रतिपादन केलं आहे की, ऑथेल्लो हा आफ्रिकेतील आदिवासी जमातींपैकी होता. तो व्हेनिसमध्ये नशीब काढण्यासाठी आलेला शिपाईगडी होता. व्हेनिसच्या नागरी संस्कृतीच्या वेलीवर उमललेलं सुंदर नाजूक फूल म्हणजे डेस्डिमोना. त्यांच्या विवाहाचा पायाच हा असा भुसभुशीत आहे. संशय ऑथेल्लोच्या स्वभावात नसला तरी संस्कृतीत होता. त्या संस्कृतीत स्त्री म्हणजे खजिना आणि नवरा म्हणजे खजिनदार हेच बाळकडू असतं. आयागोनं ऑथेल्लोचं सांस्कृतिक मर्म पुरेपूर ओळखलं आहे, म्हणूनच तो दुष्ट कारस्थानात यशस्वी होतो.

आयागो ही शेक्सपियरची एक जबरदस्त निर्मिती आहे. आयागो ही काय चीज आहे ते जाणून घेण्यातही अनेकांचे मेंदू शिणून निघाले आहेत. या आयागोचे वेगळेच पैलू शिरवाडकरांनी तासून काढले आहेत. कारण आयागो जाणल्याशिवाय नागरी ऑथेल्लोही पूर्णपणे कळत नाही. व्हेनिसच्या संस्कृतीच्या वेलीला आलेलं कडू फळ म्हणजे आयागो. ऑथेल्लो आणि डेस्डिमोनाच्या विवाहानंतर तर त्याच्या कारवायांना ऊत आला. एक तर सैन्यात ऑथेल्लो आयागोपेक्षा वरच्या अधिकारावर असल्यानं तेही त्याच्या मनात खदखदत होतंच. संवादचातुर्यानं आणि अपार स्वामिनिष्ठेच्या देखाव्यानं त्यानं ऑथेल्लोचं प्रेम संपादन केलं. 'मी आहे तसा नाही' असं विधान आयागो स्वतः-संबंधी करतो. ते अगदी खरं आहे. तो नेमका कसा आहे हे ऑथेल्लोलाही शेवटपर्यंत कळलं नाही. आयागोचं मन पुढारलेल्या, समृद्ध परंतु विषम समाजाचं एक अपत्य आहे. अशा समाजात विसंगती, विकृती आणि जे दंभ निर्माण होतात, त्यातूनच केवळ स्वहिताचा विचार करणारं भयाण तत्त्वज्ञान निर्माण होऊ शकतं.

शिरवाडकरांचा प्रेमविषय झालेलं दुसरं नाटक म्हणजे मॅकबेथ या नाटकाचा प्रारंभ त्यांना अतिशय कलात्मक आणि परिणामकारक वाटतो. या शोकांतिकेत चांगलं आणि वाईट हे द्वंद्व प्रथमपासूनच प्रभावीपणे खेळवलेलं आहे. मॅकबेथ या शोकांतिकेचा दुसरा विशेष जो शिरवाडकरांना प्रकर्षानं प्रतीत झाला तो म्हणजे अंधार-प्रकाशाचं प्रतीकसूत्र. एका प्रयोगाच्या वेळी, (मॅकबेथचं त्यांनी केलेलं मराठी रूपांतर-'राजमुकुट') केवळ अपघातानं आणि प्रकाशयोजनेतील बिघाडामुळं रंगमंचाच्या अर्ध्या भागात पूर्ण अंधार होता; पण गफलतीमुळं जे झालं तेच फार सूचक होतं आणि हाच अंधार-प्रकाश नाटकात सर्वत्र भरून राहिला आहे असं लक्षात आलं.

सुरुवातीच्या प्रवेशातल्या चेटकिणी या काळोखकन्या आहेत तर त्या वेळी तरी मॅकबेथ हा प्रकाशाचा प्रवासी आहे. किंबहुना संपूर्ण नाटकच मानवी मनावर होणाऱ्या अंधाराच्या आक्रमणाचं आणि प्रकाशाच्या प्रतिकाराचं आहे. सिंहासन मिळवण्याच्या महत्त्वाकांक्षेनं पेटलेली लेडी मॅकबेथ आणि मॅकबेथ आपल्या स्वागतात जे आवाहन करतात, ते बघण्यासारखं आहे. मॅकबेथ म्हणतो, 'नक्षत्रांनो, तुमचा प्रकाश लपवा ! माझ्या मनातील काळाकुट्ट आकांक्षा प्रकाशाला दिसता कामा नये.' लेडी मॅकबेथही अंधाराला निमंत्रण देताना म्हणते, 'ये, रात्री ये ! इतकं काळं-कभिन्न कफन पांघरून ये की राजाच्या छातीत शिरणाऱ्या कट्यारीलाही छातीतली जखम दिसायची नाही !' पण तिला शेवटी कळतं की प्रकाश कधीच मरत नाही. तो मनात असतोच खोलवर दडलेला. हा प्रकाशच अखेर तिला मरणापेक्षाही भयंकर दारुण जिणं बहाल करतो.

असा हा शिरवाडकरांनी शेक्सपियरचा वेगळ्या वाटेने घेतलेला शोध ! पण हा खरोखरच शेक्सपियरचा शोध आहे का ? त्यातून सगळा शेक्सपियर कळत नाहीच. त्याच्या अनेक पैलूंपैकी एक कोपरा फक्त कळतो शेक्सपियरची महात्मता एवढी की त्याच्या शोकांतिकांसाठी 'शेक्सपीरियन ट्रॅजेडी' हा सरधोपट शब्दसुद्धा फोल ठरावा! कारण शेक्सपियरची प्रत्येक शोकांतिका वेगळी आहे एक दुसरीसारखी नाही. एकीतून एक शेक्सपियर कळला, तर दुसरीतून वेगळाच डोकावतो. संशय, सूड, महत्त्वाकांक्षा, अपत्यांची कृतघ्नता अशांसारखे कुठेही आढळणारे ढोबळ स्वभावविशेष घेऊन शेक्सपियरने इतक्या अद्वितीय शोकांतिका कशा निर्माण केल्या ? या प्रश्नाचं उत्तर मात्र शिरवाडकर फार सुंदर रीतीनं देतात. ते म्हणतात, शेक्सपियरची अलौकिक प्रतिभा संसारात नाल्याप्रमाणे लहान वाटणाऱ्या दुःखाला समुद्राचं रूप देते. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जीवनाप्रमाणेच त्यातील समस्या रंग, गुंतागुंत यांसह ती प्रतिभा त्या दुःखांना अजरामर करून टाकते. मग ती नाटकं चौकटीतली रहात नाहीत. ती प्रत्यक्ष जीवनच बनतात.

शेक्सपियर हा साहित्यजगताचा अनभिषिक्त सम्राट आहे सर्वोच्च साहित्यिक उंचीवरचा तो एक बादशहा आहे. त्याचं राज्य जगाच्या कोणत्या भागावर नाही ? ब्रिटिश जिथं गेले नाहीत, तिथंही शेक्सपियर गेला. शिरवाडकर एक मार्मिक विधान करतात की भारतात ब्रिटिश आले नसते तर शेक्सपियरचे आगमन जरा लांबलं असतं एवढंच. कोणताही सुसंस्कृत देश शेक्सपियरला आपल्या दाराबाहेर थोपवू शकलेला नाही त्याच्या नाट्यप्रतिभेचं आवाहन इतकं अलौकिक, सार्वत्रिक आणि सार्वकालिक आहे ! त्याचं आव्हान कधी न संपणारं आहे !

—आशा कर्दळे

शोध शेक्सपियरचा
वि. वा. शिरवाडकर
सुपर्ण प्रकाशन, २६ पर्वती, पुणे-९.
पृष्ठे : ८७, किंमत : २० रु.

# मला घरातली बाई व्हायचं नाहीय्ये

प्रा. लीला पाटील, कोल्हापूर



'का तुम्ही मला असं वाढवलंत ? ' आजपर्यंत मी मुलगी आहे, पुढं मला लग्न कराचंय आणि इतर चार बायका घर चालवतात, त्याप्रमाणं केवळ घर चालवायचंय, असं मला का सांगितलं नाहीत ? आजवर शाळेत, कॉलेजात सगळी स्पर्धा मुलांशी–पुरुषांशी होती. कधी तो पहिला, कधी मी. अगदी निर्मम स्पर्धा. एकेका मार्कासाठी अटीतटीची स्पर्धा आणि आता तुम्ही मला सांगताय की, 'तुला जुळतं घ्यायलाच हवं. किती झालं तरी मुलगी आहेस तू !' कसं जमायचं मला हे ? खरंच सांगते बाबा, मला घरातली बाई व्हायचं नाहीय्ये...'

एम्. डी. करणारी नोलिमा डोळ्यात येऊ पाहणारं पाणी परतवत आपल्या वडिलांशी बोलत होती. बोलण्याच्या ओघात तिच्या वडिलांनी तिच्या चुलतबहिणीचा उल्लेख करून म्हटलं होतं, 'तुला हे नको आणि ते नको. तुझी चुलतबहीण नाही का पदवीधर ? ती कशी डहाणूसारख्या लहानशा गावात संसार करते ? ती नाही रुळली संसारात ?' नीलिमा उसळून म्हणाली, 'पण बाबा, लहानपणापासून काकू तिला सारखं सांगायची की, तुला हे आलं पाहिजे, ते आलं पाहिजे, कारण त्याशिवाय तुझा पुढं निभाव लागायचा नाही. मला अगदी स्पष्ट आठवतोय एक प्रसंग. काकूकडं आलेल्या एका बाईंना ताईनं वाकून नमस्कार केला नव्हता. तर त्या बाई गेल्यावर किती तरी वेळ काकू ताईला बोलत होती.. 'लग्नात सतराशे लोकांना सतरा वेळा वाकवाकून नमस्कार करावा लागतो. अगदी शिकलेले नवरेसुद्धा बायको म्हणून हव्या असणाऱ्या व्यक्तीचा स्वतःच्या पोटाच्या आणि अंथरुणाच्या मापातच विचार करतात. परदेशातसुद्धा अगदी आजही स्त्रीला तिची जागा दाखवून द्यायला नवरा कधी तोंडाच्या तर कधी हाताच्या पट्ट्याचा वापर करतो. पदवी मिळवलीस म्हणून शरीर नाही ना बदललं तुझं ? वाकायला शीक. स्त्रीच्या सुखाचा मूलमंत्र आहे तो...' 'बाबा, खरंच सांगते, माझं लग्न नाही झालं तरी चालेल; पण भरपूर पैसा कमावतो आहे किंवा घरदार सोन्यानं लगडलं आहे. म्हणून कोणत्या तरी बुद्दू माणसाशी लग्न करायचं नाही मला. केवळ घरातली बाई व्हायचं नाहीय्ये हो मला...'

एवढं सगळं बोलणं झाल्यावर नीलिमाचे बाबा थोडे वैतागूनच बाहेर गेले. नीलिमा गंभीर होऊन गप्प झाली. मीही खरं म्हणजे हा प्रसंग पाहून थोडी हबकूनच गेले; परंतु वातावरणातला ताण थोडा सैल करावा, म्हणून नीलिमाशी मी बोलू लागले.

'लग्नच करायचं नाही का तुला ? कसला नवरा हवाय् तुला ?'

'आत्या, खरं सांगू तुला ? तुम्ही सगळ्यांनी आजच्या तरुण मुलींची कोंडी केली आहे. परवापरवापर्यंत साऱ्यांनी माझ्या हुषारीचं कौतुक केलं. परीक्षेत जास्तीत जास्त मार्क मिळावे म्हणून ही पुस्तकं, ती पुस्तकं आणून दिली. नुसतं पुस्तकी–पांडित्य नको म्हणून पोहायला शिकव, वक्तृत्वाच्या वर्गाला धाड, असं आजवर केलं. एम्. बी. बी. एस. होईपर्यंत स्वयंपाकघरात फक्त जेवण्यासाठीच जायचं असतं, असं वाटत होतं मला आणि आता एकदम...इडली–रसम् आणि चायनीज् फ्राइड्राइसही करता आला पाहिजे, असं कसं म्हणता तुम्ही ? ज्याच्या त्याच्याकडं फार क्रिटिकली पाहते ही अत्यंत जमेची म्हणून कौतुक केली गेलेली बाब एकदमच कशी अवगुण बनली ? आमच्या आई–बाबांनी आजवर मला जागं करण्याचा आणि जागतं ठेवण्याचा प्रयत्न केला आणि आता एकदम ती सगळी जाग विसर म्हटलं. तर काय करायचं ग मी ? मला लग्न करायचं नाही, असं नाही; पण जो माझ्याकडे केवळ बाई आणि घरातली बाई म्हणून पाहील अशा माणसाशी जमायचं नाही माझं !' एखादा लाव्हारस बाहेर पडावा, तसं नीलिमा बोलत होती.

नीलिमाला थोडं शांत करावं, या भावनेनं मी म्हटलं, 'निलू, स्लीपिंग ओव्हर द प्रॉब्लेमची थेरपी का करून पाहात नाहीस तू ? परदेशी जाऊन पी. एच. डी. कर. कदाचित तिथं तुला पाहिजे तसा भारतीय पुरुष भेटेलही.'

पुनः एकदा उसळत नीलिमा म्हणाली, 'इथंही आमच्या नशिबात कोंडीच आहे. चार–पाच वर्षांपूर्वी कोणताही भारतीय डॉक्टर अमेरिकेत सहज जाऊ शकत होता, नव्हे त्या देशाला तो हवाही होता आणि आता डॉक्टरला अमेरिकेत शिरकाव करायला मुंगीएवढी फट द्यायला तयार नाहीत. अग, आमचं नशीब इतकं फुटकं की इथं चांगला जम बसवायचा, तर मुंबईत एका खोलीला लाखांनी पागडी द्यावी लागतेय. मजा म्हणजे माझ्या आईनं माझ्या लग्नासाठी चांदीच्या भांड्यांचा, मोत्यांचा व सोन्याच्या दागिन्यांचा सगळा सेट तयार ठेवलाय; पण आपली पोरगी डॉक्टर होऊन प्रॅक्टिस् करेल आणि त्यासाठी काही जागेची वगैरे पूर्वतयारी अधिक योग्य ठरेल असं स्वप्नातसुद्धा तिला वाटलं नाही. आमचे बाबासुद्धा मला पाचपाचशेच्या साड्या सहज आणतात; पण मला धंद्यात सेट्ल करून द्यायसाठी काही करावं लागेल, असं त्यांनासुद्धा कसं वाटलं नसेल ग ? खरं सांगू तुला, मला तर वाटतंय आजच्या शिकलेल्या नि बुद्धिमान मुलींचं आयुष्य पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण होईपर्यंत उंच उंच कडा सर करण्या-

सारखं असतं आणि नतर एकदम त्या मुलीच्या फक्त लग्नाच्याच विचाराला महत्त्व येतं आणि तिचा कडेलोट होतो. तुम्हा साऱ्या वडीलधाऱ्या मंडळींची आणि तुम्ही निर्माण केलेल्या या परिस्थितीची चीड, प्रचंड चीड येतेय, आम्हा तरुण मुलींना...'

आजच्या तरुण मुलींच्या प्रश्नाची एक नवी बाजूच मला विदारकतेनं समजत होती. केवढं या अवघड कोडयात टाकलंय आपण या मुलींना! जी सजगता मिळविण्यासाठी त्यांनी आजवर धडपड केली, तीच सजगता आता त्यांना डोळे मिटू देत नाही. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ झालाय का? □



शोभा भागवत

# 'आय मेसेज'

पालकशिक्षणात पालकांना नेमकं काय आणि कसं शिकवायचं याबद्दल विचार करताना, प्रत्यक्ष प्रयोग करताना अनेकदा मनात गोंधळ उडतो. मुलांना काय काय बोलू नये याची भली मोठी यादी आहे. त्यात आज्ञा करू नये, दोष देऊ नये, शिक्के मारू नयेत, धमक्या देऊ नयेत, दुर्लक्ष करू नये, विषय बदलू नये, खोटी समजूत घालू नये इ. इ. अनेक गोष्टी आहेत. हे सगळं माहीत असावं एवढ मला पटतं; पण असं असं बोलायचं नाही हे पाळायचं ठरवलं तर मग बोलायचं तरी काय असा प्रश्न पडतो. आपल्या बोलण्यातलं तिखट कमी व्हावं; पण जिवंतपणा जाऊ नये अशी काळजी घेऊन कसं बोलायचं?

आणि अमुक एक प्रकारे बोलता आलं की, प्रश्न सुटतात का? असाही मला प्रश्न पडतो. क थँयू म्हणता आलं की, माणूस कृतज्ञ बनतो का? सॉरी म्हणता आलं की, तो दुसऱ्याची पर्वा करणारा बनतो का? आपल्या आपल्या भाषांचे काही गोडवे असतात, वैशिष्टयं असतात ती शोधायची, वापरात आणायची की सोपं दिसतं तै, स्मार्ट वाटतं ते उचलत रहायचं?

पालकशिक्षणातले एक अमेरिकन तज्ज्ञ डॉ. थॉमस गॉर्डन. त्यांच्या शिक्षणपद्धतीत 'आय मेसेज' हा एक महत्त्वाचा प्रकार शिकवला जातो. त्यांचं म्हणणं असं की, मुलांना बोलताना आपण त्यांना नेहमी 'यू मेसेज' देतो, म्हणजे आपण झोपलो असताना मुलानं दंगा केला की, आपण त्याला म्हणतो, 'कळत नाही का तुला? किती आवाज करतोयस!' पण आपण त्याला कधी असं म्हणत नाही की, 'मला झोप येतेय; पण ह्या आवाजांनी सारखी झोपमोड होतेय.' मूल बाहेरून उशीरा आलं की, आपण म्हणतो, 'कुठे तडफडला होतास इतका वेळ तू? लाज नाही वाटत तुला इतका उशीर करायला?' पण आपण असं कधी म्हणत नाही की, 'मी अगदी काळजीत पडले होते. माझा जीव भांडयात पडला तुला पाहून.'

आपण नेहमी तू काय कर; तू कसा चुकलास, तू किती मूर्ख, तुला कसं कळत नाही हे बोलतो; पण त्यापायी मला काय वाटलं, मी काय विचार केला, माझं काय बिघडलं, मला किती त्रास झाला ते सांगत नाही. प्रत्येक प्रसंगी दुसऱ्याला दोष देण्यापेक्षा स्वतःला काय वाटलं ते सांगून गप्प बसणं, त्यावर त्या माणसाला विचार करू देणं आणि परिणामांचं गांभीर्य त्यानं स्वतः ओळखणं हे 'आय मेसेज'नं साध्य होतं.

अनेकदा मोठया माणसांच्या संवादातसुद्धा हे उपयोगी पडतं. उगाचच दुसऱ्याला दोष देऊन संवादाच्या वाटा बंद करण्यापेक्षा आपल्याला काय वाटलं ते सांगणं चांगलं वाटतं. म्हणजे मग भाजीत मीठ जास्त पडलं तर नवऱ्यानं 'केवढी खारट केलीयस भाजी तू! इतकं कसं जमत नाही तुला इतकी वर्षं स्वैपाक करून.' की बायको म्हणणार, 'तुमची सदाचीच तक्रार. तुम्ही करून बघा स्वैपाक म्हणजे कळेल.' ही तिच्यावर केलेल्या आरोपाची प्रतिक्रिया असते. त्याऐवजी नवऱ्यानं जर म्हटले, 'मला भाजी जरा खारट वाटतेय.' तर ती म्हणेल, 'हो का? चुकून पडलं वाटतं मीठ जास्त. तरी मला वाटतच होतं–'

पण नेमकं यातलं मर्म लक्षात आलं नाही अन् मला भाजी खारट लागतेय हेही आरडाओरडा करून नवऱ्यानं सांगितलं तर 'आय मेसेज' फुकटच जाणार. अशा वेळी जिथे निष्कारण आरडा-ओरडा आपण करतो तिथे शांतपणे बोललं की काम होतं हे शिकवलं की, घोटाळयांना सुरुवात होते.

एका बाईंनी सांगितलेला अनुभव. त्या पालकशिक्षणात हे शिकलेल्या होत्या. 'आय मेसेज' द्यायचा कायम प्रयत्न करत होत्या घरात. त्यांचा मोठा मुलगा छोटया बाळाच्या डोक्यात बॅट मारत होता. ते पाहून त्या त्याला म्हणाल्या, 'मला काही हे आवडलेलं नाही.' मुलानं त्यांच्याकडं संपूर्ण दुर्लक्ष के आणि तो बाळाला परत मारायला गेला. तेव्हा बाईंनी त्याच्या हातातली बॅट काढून घेतली. पालकशिक्षणाच्या वर्गात त्या सांगू लागल्या. 'मी अगदी आय मेसेजच दिला होता; पण उपयोग झाला नाही,' यावर चर्चा झाली.

मुलगा लहान बाळाच्या डोक्यात बॅट मारतोय म्हटल्यावर तुमच्या मनात काय येतं? भीती वाटते. बाळाचं डोकं फुटेल, रक्त येईल, ते मरेल असं मनात येतं. ह्या मनात येणाऱ्या तीव्र भावना व्यक्त करायला नकोत का तेवढ्याच तीव्रपणे? 'मला हे काही आवडलेलं नाही..' असं म्हणणं म्हणजे आपल्याला नेमकं काय वाटतं ते न सांगणं आहे. चुकीचं बोलणं आहे. त्यामुळंच त्या 'आय मेसेज' चा परिणाम शून्य झाला. आईची भीती, धसका मुलांपर्यंत पोचलाच नाही.

या प्रसंगाबद्दल विचार करताना जाणवतं की, दुसरीकडचं काही तरी उचलून आपण आपल्याकडे रुजवण्याचा अर्धवट प्रयत्न केला की, फजितीच होते. नुसतं तंत्र उचललं जातं न् आपला जिवंतपणाही जातो आणि परिणामकारकताही जाते. ह्या आईंनी पोराच्या पाठीत धपाटा घालून 'कारट्या, जीव घेशील की पोराचा' असं म्हणू नये हे मान्य; पण मग तिनी नेमकं कसं बोलावं हे तिनीच

शोधून काढायला हवं. मुलाला त्याचं गांभीर्य कळायला हवंच.

पाश्चात्य पोषाखांच्या पुस्तकातून फॅशन पहायची न् ती इथली कापडं वापरून शिवायची. म्हणजे मग ती अनेकदा फजितीच होते. इथल्या कापडांची जात लक्षात घेऊनच इथल्या फॅशन्स बेतायला हव्यात, अर्धवटपणा नाही चालत त्यात.

तसंच अनेकदा पालकशिक्षणाबद्दल मला वाटतं, आपले मुलं–पालक–संबंध, आपली भाषा, आपली मनं, आपली संस्कृती, आपला समाज यांचा पुरेसा अभ्यास न करता आपण पालकांनी असं बोलावं, असं वागावं म्हटलं तर ते या मातीत रुजणार नाही.

वरवरचे मॅनर्स आणि वरवरचं बोलणं यापलीकडे जाऊन माणसं ओळखायला मुलांनीही शिकायलाच हवं. त्यामुळंच पु. ल. देशपांड्यांचे रावसाहेब दर वाक्याला शिव्या वापरत असूनही आपल्याला जवळचे वाटतात. कायम रागानं बोलणाऱ्या शिक्षकांच्या मनातल्या प्रेमाचा शोध लागला की, ते बोलणं प्रेमळ वाटतं.

आपल्या पालकपणातलं नेमकं चांगलं काय न् वाईट काय, कशानं मुलाचं भलं होतं आणि कशानं त्याचं नुकसान होतं याबद्दल जागृत बनणं, स्वत:ला अधिक जवळून ओळखायला शिकणं आणि मूल काय आहे हे समजून घेणं यातून इथलं पालकशिक्षण फुलायला हवं. □

## इंदिराजींनंतरचा भारत कसा असेल? : पृष्ठ ६ वरून

अशी काही धोरणे आखलेली आहेत की, जी विकासालाही पूरक नाहीत व लोकहिताशीही संबंधित नाहीत. परिणामत: आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्णता आपण पूर्णपणे गमावून बसलो आहोत. आंतरराष्ट्रीय कर्जपुरवठा संस्था आणि खाजगी बँकांवर भारत जास्तीत जास्त अवलंबून राहू लागला आहे आणि या सर्व संस्थांवर अमेरिकेचे नियंत्रण आहे. खासगी क्षेत्राला अधिक स्वातंत्र्य देण्याच्या धोरणामुळे हे परावलंबित्वच वाढणार आहे.

संपूर्ण राजकीय विचारसरणीत ( Political character ) जोपर्यंत बदल घडून येत नाही तोपर्यंत मूलभूत आर्थिक परिवर्तन शक्य वाटत नाही. समाजवादी तत्त्वज्ञानाची बांधिलकी नसलेल्या व राजकारणाचा गंध नसलेल्यांचा सल्ला मानणाऱ्या राजीव गांधींच्या काळात भारत आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होणार नाही.

सुदैवाने या लोकसभा निवडणुकीत राजीव गांधी पंतप्रधान होण्याची शक्यता नाही.

□

(भारतीयांबरोबर परदेशी राजकीय अभ्यासकांचाही दृष्टिकोन समजावा यासाठी Herald Review चे वॉशिंग्टन-प्रतिनिधी श्री. दिलीप मुकर्जी यांनी तिघांच्या मुलाखती घेतल्या, त्यांचा हा अनुवाद. यापैकी स्टॅनले कोचानेक अनेक वर्षांपासून कॉंग्रेस पक्षाचा अभ्यास करीत आहेत. मेरी कॅरेस यांनी इंदिरा गांधींचे राजकीय चरित्र लिहिले आहे, तर भारतीय राजकारणावरील रॉबर्ट हार्डग्रेव्ह यांचे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.)

## तडजोडीने देशाचे प्रश्न सुटतील

**डॉ. रॉबर्ट हार्डग्रेव्ह :** वैयक्तिक सूडातून केलेली सर्वोच्च स्थानावरील व्यक्तीची हत्या ही संबंध देशाच्या दृष्टीने तितकी भयानक नसते, जितकी एका समाजाच्या प्रतिनिधीने केलेली हत्या गंभीर असते. किंबहुना लोकच अशा घटनांमागची कारणमीमांसा करत असतात आणि मग त्यातून कोणतीही एक व्यक्ती अपराधी न ठरता संबंध समाजच अपराधी ठरतो – दुरावला जातो.

भारतात घडलेली पंतप्रधानांची हत्या म्हणजे पंजाब समस्येच्या इतिहासातीलच एक घटना मानल्यास शीख अतिरेक्यांनी केलेले हे कृत्य नैराश्यातून केले आहे असे मला वाटते. अलीकडील काळात अतिरेक्यांना आपल्यातील दुफळी, त्यामुळे आलेली दुर्बलता जाणवत होती, राजकीय तोडगा निघण्याची शक्यताही वाढली होती आणि त्यामुळेच आंदोलनाचे नेतृत्व आपल्या हातून जाते की काय अशी भीती अतिरेक्यांना वाटत होती. या निराशेतूनच हे अमानुष कृत्य करायला ते प्रवृत्त झाले. तडजोड झाल्यास खलिस्तान मिळणार नाही म्हणून प्रत्येक वेळी अतिरेक्यांनी हिंसाचाराचा वापर केला, इंदिरा गांधींची हत्या हा या घटना–क्रमातील सर्वात दुर्दैवी भाग होय. 'खलिस्तानमध्येच तुम्ही सुरक्षित राहू शकाल' अशी भावना सर्व शीख समाजात निर्माण करणं हा हत्येचा उद्देश होता. भारतात शिखांना सहकार्य, सुरक्षितता, न्याय मिळाला तर या उद्दिष्टाचा पराभव होणार आहे.

**प्रश्न :** लष्करी कारवाई झाली नसती तर ही हत्या टळली असती का?

**उत्तर :** लष्करी कारवाईमुळे शीख समाज दुखावला गेला असला तरी त्याचा सूड म्हणून पंतप्रधानांचा खून करणं ही कल्पना मात्र कोणाच्याही मनात नव्हती असे माझे मत आहे. आयरिश रिपब्लिकन आर्मीला ज्याप्रमाणे समाजाचा पाठिंबा नाही, त्याचप्रमाणे शीख अतिरेक्यांनाही त्यांच्या समाजाची मान्यता नाही.

**प्रश्न :** इंदिरा गांधींनी त्यांच्या कारकीर्दीत काय मिळवलं? तुम्ही त्यांचे मूल्यमापन कसे कराल?

**उत्तर :** एक व्यक्ती म्हणून मला त्यांच्या निर्भयतेचे, धैर्याचे कौतुक वाटते. भारतातील राजकीय जीवनाला त्यांनी काहीशी स्थिरता दिली हेही मान्य करावे लागेल. त्या प्रखर राष्ट्रवादी होत्या.

परंतु राष्ट्रीय–राजकीय जीवनात पंतप्रधान या नात्याने स्वत:ची नेमकी भूमिका कोणती? याबाबत त्यांच्या डोक्यात चुकीच्या कल्पना होत्या. माझ्याशिवाय देशाचे चालूच शकणार नाही असा एक समज त्यांनी करून घेतला. 'इंदिरा इज इंडिया' यासारख्या घोषणांनी त्या सुखावत असत आणि अशी वृत्ती असल्यामुळे भारतातील सर्व राजकीय संस्था त्यांनी दुर्बल करून टाकल्या. सत्तेचे अति-

संचित ठेव योजना !

काळ चालला
पुढे, पुढे . . .

म्हणून " उद्या " चा विचार करा
अनोख्या ठेव्यात त्याचे
रूपांतर करा !

उद्याचा विचार आजच नको का करायला ?
नंतर पश्चात्ताप करून काय उपयोग ?

उद्याचे स्वप्न साकार करण्यासाठी
आमच्या संचित ठेव योजनेचा फायदा घ्या.

आज बँकेत २५,००० रुपये ठेवा
व दहा वर्षांनी त्याचे
७४,००० रुपये बँकेकडून घ्या.

अधिक माहितीसाठी
नजीकच्या शाखेला भेट द्या !

बँक ऑफ महाराष्ट्र
( भारत सरकारचा नवीन उपक्रम )
मुख्य कचेरी :
" लोकमंगल "
१५०१ शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५

रिक्त केन्द्रीकरण त्यांनी हीन सत्तालालसेतून नाही; पण देशाला आपली गरज आहे या भावनेतून केले. त्या स्वत:ला भारताच्या 'जोन ऑफ आर्क' म्हणवून घेण्यात अभिमान मानत; परंतु या सत्तेच्या अतिरिक्त केन्द्रीकरणाचा इथल्या राजकीय व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम झाला. स्वत:चा पक्षसुद्धा त्यांनी जाणूनबुजून कमकुवत ठेवला.

अधिकारशाहीने नव्हे तर तडजोडी आणि वाटाघाटी यातूनच भारताचे प्रश्न सुटतील. या देशातील प्रांत, हितसंबंधी गट या सगळ्यांना एका व्यापक राष्ट्रीय चौकटीत आणण्याची आवश्यकता आहे. राजीव गांधींना पक्षावर पकड बसवणं आणि महत्त्वाचे म्हणजे देश एक ठेवणं अवघड नाही. त्याच्याभोवती लोकप्रियतेचं वलय नसले तरी घराण्याच्या नावाचा तो उपयोग करून घेईल. सहानुभूती व स्थिरतेची गरज या दोन मुद्द्यांवर तो निवडणूक जिंकेल. निवडणुकांनंतर मात्र खऱ्या प्रश्नांना त्याला तोंड द्यावे लागेल. लोकशाहीत सत्ता तळाकडे असते हे तत्त्व जर त्याने कायम डोक्यात ठेवले तर देशाचे हित आणि राजीव गांधींची सत्ता या दोन्हीलाही बाधा येणार नाही.

## राजकीय व्यवस्था जेव्हा दुर्बल होते...

**श्री. कोचानेक :** कॉंग्रेस ( आय ) ची घडण पहाता विशेषत: श्रीमती इंदिरा गांधी ह्यात नसताना तुमच्यासमोर प्रश्नच आहे. पक्षातले मतभेद दूर करण्यासाठी सर्वसामान्य यंत्रणा काहीच नाही. कारण पक्षातली सर्व वरची उतरंड ही इंदिरा गांधींनी व्यक्तिश: नियुक्त केलेल्या माणसांची होती. त्यांची आजची स्थितीही त्यांच्या इंदिरा गांधींच्या निष्ठेशी संबंधित आहे त्याशिवाय त्यांना व्यक्तिगत सामर्थ्य नाही.

एकदा अशी व्यवस्था निर्माण झाली की सत्ता ही तळातून निर्माण न होता वरच्या स्थानातून निर्माण होते, तेव्हा इंदिरा गांधींच्या अचानक जाण्यामुळे जो धोका निर्माण होतो त्यातून त्या व्यवस्थेचं पोषण होऊ शकत नाही, व्यवस्था जिवंत राहू शकत नाही. राजीव सत्तास्थानी बळकटपणे उभा राहू शकेल ही शक्यता निश्चितच आहे. तरीही त्याच्याबद्दल शंका निर्माण करू शकतील अशा अनेक गोष्टी आहेत. एक म्हणजे त्यांचे सर्व सल्लागार हे भारताच्या सत्यपरिस्थितीशी ओळख नसलेले आहेत. येत्या निवडणुकीत जर तो बहुमत मिळवू शकला नाही किंवा विजय मिळवल्यानंतर जर तो पक्ष एकत्र ठेवू शकला नाही तर पक्षांची अनेक दुर्बल एकीकरणे होतील आणि थोड्या काळापुरतं त्यांचं आयुष्य टिकेल. भारताला आवश्यक असलेली स्थिरता प्राप्त करण्यासाठी एकतर राजकीय व्यवस्थेची वेळीच पुनर्रचना होईल किंवा लष्कर आत घुसेल.

लष्करी सत्ता आल्यास पुन्हा केंद्रीकरण होईल आणि प्रादेशिक आणि सांस्कृतिक वैविध्याशी ती सूर जुळवू शकणार नाही. नागरी सरकारच्या हातातच लवकरात लवकर सत्ता सुपूर्द करावी लागेल आणि या राजसत्ता नसण्याच्या मधल्या काळात लष्कराकडे सूत्र देणं हाच त्यातल्या त्यात चांगला मार्ग आहे.

श्रीमती गांधींच्या अचानक जाण्यामुळे राजकीय व्यवस्थेच्या कामकाजाची निखळलेली चक्रं पुन्हा जागेवर येण्यासाठी भारताला एक ते तीन वर्षांचा कालावधी लागेल असं मला वाटतं. चाळीस वर्षांनंतर भारतात स्थिर राजकीय व्यवस्थेनं बऱ्याच अंशी कायदेशीरता मिळवली आहे. त्यामुळे राजीवच सुरवातीच्या काळात टिकून रहाण्याची शक्यता आहे.

सर्व सत्ताकेंद्रं स्वतःच्या हातात ठेवल्यामुळं इंदिरा गांधींच्या नेतृत्वाने भारतीय व्यवस्थेत संस्थांचे दुर्बलीकरण झाले. पक्षाच्या पातळीवर त्यांच्या कामाची पद्धत अशी होती की, पक्षाध्यक्षांच्या नियुक्तीचे नियमन करणे आणि त्या मार्गाने पक्षाच्या अधिकाऱ्यांची निवड करणे, यामुळे संपूर्ण राज्याचं आणि स्थानिक राजकारणाच्या व्यवस्थेचं नियमन करणं त्यांना शक्य झालं. प्रादेशिक कांग्रेससमित्या त्यांनी त्यांच्या इच्छेनं विलीन केल्या आणि स्वतःच्या निवडीच्या माणसांच्या सत्तेखाली विशिष्ट उद्देशाकरता नेमलेल्या नव्या समित्या स्थापन केल्या.

त्यांच्या काळात मुख्यमंत्र्याची निवड होत नसे, व्यक्तिशः नियुक्ती होत असे. एकदा अशी नियुक्ती झाल्यामुळे स्वतंत्र सत्तास्थान ते मुख्यमंत्री निर्माण करू शकत नव्हते. जर त्यांनी तसा प्रयत्न केला तर त्यांना तेथून हुसकावून लावलं जात होतं. विरोधी पक्षांची सरकारं उलथवून टाकण्याचे प्रयत्न करून त्या विरोधी पक्षांचेही खच्चीकरण करत होत्या. आंध्रमधील एन. टी. आर. सरकारला हुसकून लावण्यात आलेलं अपयश सोडता बहुतेक ठिकाणी त्यांना त्यात यशच मिळालं.

सरकारी पातळीवर आपल्या पसंतीच्या लोकांची नियुक्ती करून त्यांनी पक्षाध्यक्षांना दुय्यम महत्त्व दिलं. मंत्रिमंडळातील व्यक्तींना अनिश्चित ठेवून स्वतःवर अवलंबून रहाणारं मंत्रिमंडळ त्यांनी तयार केलं. सत्तेचा स्वतंत्र पाया नसलेल्या ह्या व्यक्तींना त्यांनी प्राधान्य दिलं. त्यामुळं त्यांचं स्थान पूर्णपणे इंदिराजींच्या लहरीवर, खुशीवर अवलंबून राहिलं.

याचा परिणाम म्हणजे अतिशय केंद्रित आणि व्यक्तिप्राधान्यवादी राजकीय व्यवस्था निर्माण झाली. राजकीय हालचालींना विशिष्ट दिशा राहिली नाही. प्रथम या हालचाली या राजकीय असुरक्षिततेतून निर्माण झाल्या आणि नंतर सत्ता कायम ठेवण्यासाठी झाल्या. याचा परिणाम म्हणजे संपूर्ण राजकीय व्यवस्था दुर्बल झाली. त्यांच्या सत्तेला किंवा त्यांच्या कुटुंबाला धक्का देऊ शकतील म्हणून कोणतेही नेतृत्व त्यांनी वाढू दिले नाही. याचा परिणाम म्हणजे यापूर्वीच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली विशेषतः नेहरू असताना ज्याप्रमाणे कांग्रेसपक्ष राज्यपातळीवर मध्यस्थी करू शकत होता, लोकांचं मन वळवू शकत होता तसे कांग्रेसपक्ष इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली करू शकला नाही.

## नकारात्मक दृष्टिकोन आहे तोवर....

**मेरी कॅरेस** : जगात इतर कोणत्याही देशात नसेल इतके विभाजन भारतात आहे. समस्या अनेक आहेत; पण तरीही इंदिरा गांधींनी देश एक ठेवला, अधिक समर्थ बनवला. अंतर्गत विघटनवादी शक्ती व परकीय शत्रू या दोघांनाही डोके वर काढू दिले नाही. त्यांचे धोरण आणि कार्यक्रम पाहून त्यांचे मूल्यमापन करण्यापेक्षा ज्या समस्या त्यांच्यासमोर होत्या त्यावरून हे मूल्यमापन केले गेले पाहिजे. अर्थात त्यांच्या प्रत्येक कृतीचे समर्थन मी करणार नाही. स्पष्ट असे वैचारिक व ध्येयवादी नेतृत्व त्यांनी कधीच दिले नाही. देशातील कोणतीही राजकीय, आर्थिक, सामाजिक समस्या मुळातून सोडविण्याची इंदिरा गांधींची वृत्ती नव्हती.

'समन्वय' हे त्यांच्या कारकीर्दीचे वैशिष्ट्य मानावे लागेल. एकाच वेळी भांडवलदार व समाजवादी या दोघांनाही त्या आपल्या हितकर्त्या वाटत असत. उजवे व डावे या दोघांनाही सामावून घेण्याची किमया त्यांना साधली होती. निरनिराळे हितसंबंध, मागण्या यांचा असा समन्वय साधल्यामुळे त्यांना देश एक ठेवता आला असे मला वाटते; पण देश एक ठेवतानाच सामाजिक, आर्थिक परिवर्तन त्या घडवून आणू शकल्या नाहीत.

धोरणनिश्चिती व सरकारची कार्यपद्धती या दोन्ही पातळ्यांवर इंदिरा गांधींना अपयश आलं. किंबहुना ते यश त्यांना मिळवायचंच नव्हतं. भारतात अलीकडे वाढलेल्या हिंसाचाराला जागतिक परिस्थितीबरोबरच त्यांच्या कार्यशैलीलाही जबाबदार धरावे लागेल. निधार्मिक धोरणापासून त्या बाजूला गेल्या होत्या. मुस्लिमांवर गेल्या काही वर्षात अन्याय होऊ लागला होता. १९६९ ते १९७५ हा त्यांच्या राजकीय-प्रशासकीय कर्तृत्वाचा काळ होता; परंतु १९८० नंतर, विशेषतः संजयच्या मृत्यूनंतर आव्हाने स्वीकारण्याची उमेद, धडाडीने निर्णय घेण्याची शैली आणि वेळेचे अचूक भान ही त्यांची पूर्वीची वैशिष्ट्ये राहिली नव्हती.

इंदिरा गांधी प्रत्येक निर्णय स्वतः घेत असत व स्वतः घेतलेल्या निर्णयामध्येही राजकीय, आर्थिक, सामाजिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न नसे. दीर्घकालीन परिस्थिती डोळ्यांसमोर ठेवून निर्णय घेणं त्यांच्या प्रकृतीतच नव्हते.

पंजाबच्याच प्रश्नाचा विचार करायचा झाला तर निरनिराळे लोकसमूह आणि निरनिराळ्या मागण्या यात फरक केला पाहिजे. अनेक शीख भारताशी आणि देशातील सरकारशी एकनिष्ठ होते-आहेत. त्यामुळे अतिरेक्यांच्या कारवायांचा विचार करताना मूठभर शीख लोकांचाच आणि त्याना चिथावणी देणाऱ्या कॅनडा, ब्रिटनमधील काही तथाकथित शीख नेत्यांचा विचार करावा लागतो. याउलट पंजाबप्रश्नाचा विचार करताना संपूर्ण शीख समाजाचा विचार करावा लागतो. हा फरक लक्षात घेतला गेला नाही—मुद्दाम त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलं.

शीख समाज हा एक उद्योगप्रवण आणि समर्थ असा समाज आहे. लष्करातील त्यांचे प्रमाण मोठे आहे, सरकारमध्ये त्यांचा सहभाग मोठा आहे, असे असूनही शिखांनी आपल्याला विशेष वागणूक मिळावी अशी जी मागणी केली त्याचा परिणाम इतर फुटीर गटही पुढे येण्यात होत होता. अशा वेळी हे आंदोलन अत्यंत कुशलतेने हाताळण्याची जरुरी होती; पण इंदिरा गांधींनी या प्रश्नाबाबतीत दूरदृष्टी ठेवली नाही. अकाली नेत्यांना खच्ची करण्यासाठी त्यांनी भिंद्रनवाल्यांच्या अतिरेकी हालचालींना अप्रत्यक्षरीत्या वावच दिला. त्यामुळे राजकीय पातळीवर वाटाघाटी करण्याची शक्ती अकालींजवळ उरली नाही. म्हणूनच लष्करी कारवाई झाली त्यापेक्षा किती तरी आधीच ती करण्याची आवश्यकता होती, असे मला वाटते!

ज्याप्रमाणे इंदिरा गांधींनी मतांचा, निवडणुकीचा विचार करून अतिरेक्यांना अप्रत्यक्ष प्रोत्साहन दिले तीच चूक अकाल्यांनीही केली. आंदोलन अतिरेक्यांच्या हातात चाललेले असताना कोणतीही निःसंदिग्ध राष्ट्रीय भूमिका न घेता अकाली गप्प राहिले. पंजाबप्रश्न सोडविण्यात कोणाला अपयश आले ह्याचा हा ढोबळमानाने विचार केला असला तरीही या सर्व प्रकरणाला कोणकोण जबाबदार आहे हे निश्चित सांगता येत नाही.

भारतीयांबद्दल एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवते, ती ही की, आपल्याला आलेले अपयश, आपली अधोगती यांचे खापर परकीयांच्यावर फोडून भारतीय लोक मोकळे होतात. हा negativism जोपर्यंत लोकांमध्ये आहे तोपर्यंत भारताची प्रगती होणार नाही ! ☐

**श्रीग्रामायन**

**बलसागर**

या पूर्वीच्या दोन पुस्तकांप्रमाणेच

**निर्माणपर्व**

या प्रस्तुत पुस्तकाचा विषय आहे विकसनशील, स्वावलंबी भारत.
एका खळबळजनक कालखंडातील हे चिंतन. चळवळीतील प्रत्यक्ष सहभागाची पार्श्वभूमी लाभलेले – शहादे चळवळ, जेपींचे बिहार आंदोलन, आणीबाणी, जनता पक्षप्रयोग, ग्राहकचळवळ, म्हैसाळप्रयोग . . .

★

श्रीग्रामायन या पुस्तकाबद्दल एका तरुण वाचकाने लिहिले होते – ' ग्रामीण भारताच्या वाटांचा शोध घेणाऱ्या कोणाही कार्यकर्त्याला ' श्रीग्रामायन ' मध्ये रेखाटलेली या ग्रामजीवनाची चित्रं आजच्या काळात आणि संदर्भात तितकीच ताजी वाटावीत, अशी आहेत. कदाचित त्यांना वाट पुसतच एखादा पुढली चित्रं चितारू शकेल. '

याच वाचकाने ' बलसागर ' बद्दल लिहिले होते – ' विविध विचारधारांना खुल्या मनाने लेखक येथे सामोरा जात आहे. त्यांचे सुस्पष्ट व तर्कसंगत विश्लेषण येथे आहे। आणि आजच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादाची नवी मांडणी करण्याचा प्रयत्नही आहे. '

या पुस्तकात, या ' निर्माणपर्वा ' तही हा प्रयत्न आहे.

एक नवी मांडणी आहे. समन्वयाचे पूर्वसूत्र आणखी पुढे नेले आहे . . .

★

**हा समन्वय कोणत्या शक्तींचा ? कोणते प्रवाह एकत्र यायला हवेत ?**

# ॥ निर्माणपर्व ॥

हे पुस्तक याचा शोध घेणारे आहे.

**लेखक : श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन**

मूल्य चाळीस रुपये

पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

# तपोवन : असे व्हायला नको होते

महाराष्ट्रातील दैनिक पत्रांतून तपोवन येथील उध्वस्त झालेल्या भावविश्वाची व्यथा-कथा कळली. आपल्या घशात तपोवनाला घेण्याबाबतची शासनाची आसुरी वाटचाल आरंभ झालेली पाहून आम्ही कुष्ठकार्यकर्ते क्षणभर स्तब्धच झालो. मध्यप्रदेशातील छत्तीसगढसारख्या कुष्ठप्रकोपित आणि मागासलेल्या क्षेत्रात आरंभ झालेल्या ह्या संस्थेच्या आरंभापासून पूजनीय दाजीसाहेब पटवर्धनांनी व जागरूक महाराष्ट्र वासियांनी कृपा–उत्साहातून आपली उदात्त हृद्य संस्था कार्यास जोडलेली असल्यामुळे या ऋणातून किंचितमात्र का होईना उतराई व्हावे या सद्भावनेने सर्व कार्यकर्ते व महाराष्ट्रवासीय सुशिक्षित कुष्ठमुक्त मंडळी विदर्भातील शासकीय केंद्रावर पोहोचली. तिथे तपोवन येथील कुष्ठरोग्यांची व्यवस्था शासनाने केली होती. याच प्रवासात मी तपोवन येथे पोहोचलो. दिवाळीसारखे सणासुदीचे दिवस असल्यामुळे सर्व देश दिवाळीचा आनंद लुटत होता व शासनव्यवस्थेचा धिक्कार करीत कुष्ठपीडित तपोवन येथे परत येत होते. श्री. दाजीसाहेबांची पण भेट झाली. शासनाला संस्था सोपविण्याच्या आपल्या संकल्पाबाबत ते भीष्मपितामहांसारखे दृढ संकल्पित दिसले. संस्था शासनाला सोपविणे योग्य नाही हे सर्वांच्या अंतःकरणाला वाटत असूनही श्री. दाजीसाहेबांच्या संकल्पाला शब्दानेही मोडता घालण्यास कुणीही धजावत नव्हता.

४० वर्षांपासून आपल्या तपोसाधनेने शूचिर्भूत केलेल्या तपोभूमीतून शतायुशाकडे जबर आत्मविश्वासाने मार्गक्रमण करीत असलेल्या या तपस्व्याला हुसकून लावण्याचा व सत्यनिष्ठेच्या संस्कारातून पवित्र केलेल्या सेवामंदिरात शासकीय कुष्ठसैनिक घुसविण्याचा शासनाचा घृणित मनसुबा सफल होणार ही दुःखचिन्हे दिसू लागली.

श्री. दाजीसाहेब शासनाजवळ मागत तरी काय आहेत? प्रत्येक कुष्ठरोग्यासाठी होणाऱ्या मासिक रु. २४० ह्या खर्चासाठी शासन रु. १९२/– म्हणजे ८० प्रतिशत देऊ इच्छित होते. श्री. दाजीसाहेबांची सत्प्रवृत्त मागणी अशी होती की शासनाने सरसकट रु. १७५/– प्रतिमाह प्रतिरोगी द्यावे. त्यांच्या मागणीसाठी तर्क असा होता की संपूर्ण रु. १९२/– पदरी पाडून घेण्याच्या मोहातून संस्थाचालक खर्चाचे खोटे हिशोब दाखवून लफंगेगिरी करतील व कुष्ठसेवेला तो काळिमा ठरेल असे कुष्ठसेवेतील या राजहंसाला वाटत होते.

श्री. दाजीसाहेब कुष्ठबांधवांचे जीवन सुधारण्यासाठी राष्ट्रशासनाजवळ हट्ट धरतात–राष्ट्रसमाजाला सहयोग देण्यास आवाहन करतात व कुष्ठबांधवांना सतत कर्मप्रवृत्त राहण्याचे संस्कार देतात. त्यांनी विदेशी धन कधी अपेक्षिले नाही अथवा प्रार्थिले नाही. संस्थाआरंभाच्या कालांत कुणा विदेशी संस्थेने अथवा नागरिकाने कुष्ठसेवेप्रत त्यांची निष्ठा पाहून सहयोग स्वीकारण्याची प्रार्थना केली असेल तर माहीत नाही. श्री. दाजीसाहेबांच्या बोलण्यातून विदेशी मदतीबाबत एकच विचार दिसत असे की लाचारीचे प्रदर्शन केल्याशिवाय व आपला राष्ट्रसमाज कृतप्राय झाल्याची पावती दिल्याशिवाय विदेशी मदत कुणालाही असंभवत असते.

राजकुलात जन्मलेल्या या नरसिंहाची व शासनाची झुंज ही आजकालची नाही. ही झुंज गेल्या ४० वर्षांपासून चालू आहे. शासनाशी प्राणपणाने दिलेल्या या झुंजीतून त्यांनी भारतातील लक्षावधी कुष्ठरोग्यांना अलभ्य सोयीसवलती मिळवून दिल्या. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक कुष्ठसेवकांना दान–अनुदानाने समृद्ध केले व पद्मश्रीसारख्या उपाधीने उजळविले. सिंह झुंजतो व दोन्ही डगरीवर हात मारणारे कोल्हे–कुत्रे शिकारीत वाटेकरी बनतात तसेच इथेही झाले. श्री. दाजीसाहेब सतत झुंजले. त्यांच्याबरोबर इतरांनापण त्यातून लाभ झाला; परंतु झुंजीत त्यांना कुणी सहयोग दिला नाही. ही कावेबाज मंडळी ह्या झुंजीला दुरूनच साक्षी म्हणून राहिली; परंतु थकलेल्या व वयोवृद्ध झालेल्या ह्या नरपुरुषाने असल्या बाबींचा हिशोबही ठेवला नाही.

जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या मस्तवाल व खुनशी कुष्ठपीडित कैद्याबरोबर दोन हात करून त्याला जेरबंद करणारे श्री. दाजीसाहेब इतके हळवे आणि भावुक की कुणी त्यांच्या निवासस्थानासमोर अन्यायाविरूद्ध सत्याग्रह म्हणून उपोषणाला बसला तर दाजीसाहेब त्याच्यासमोर हात जोडून उपोषणापासून दूर होण्याची प्रार्थना करीत.

जर शासनाचा घृणित मनसुबा सफल झाला तर दाजीसाहेब जातील तरी कुठे? हा प्रश्न सर्वांनाच असेल कारण ह्या ४० वर्षात आपली सर्व ३० लाख रुपयांची मालमत्ता त्यांनी संस्थेला समर्पित केली इतकेच नव्हे अगदी परवापरवा त्यांच्या पत्नी स्व. आईसाहेबांच्या निधनानंतर विमाकंपनीकडून मिळालेले रु. ८० हजार त्यांनी बालसंगोपनकार्यप्रीत्यर्थ संस्थेला समर्पित केले. खरोखरच तसे म्हणाल तर श्री. दाजीसाहेब आज निष्कांचन आहेत. हेही तितकेच खरे की देशांतील लाखो मानवहृदयी त्यांना देवासारखा सन्मान आहे. हाच समाज त्यांचा सांभाळ पण करील. श्री. दाजीसाहेबांची तीव्र इच्छा आहे की, या मातृप्रधान राष्ट्रात कुष्ठपीडित महिलांच्या सेवेसाठी स्वतंत्र संस्था हवी. आम्हालापण त्यांनी तशी सूचना केली होती; परंतु आजवर तरी ते आम्हाला शक्य झालेले नाही. त्या इच्छेनुरूप श्री. दाजीसाहेब महिलाकुष्ठसेवेकडे वळतीलही.

तपोवनचा ताबा घ्यावा म्हणून केलेली प्रार्थना ३० ऑक्टोबरला मंत्रालयात पोहोचली व तिथे आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या. ३१ ऑक्टोबरला राष्ट्राच्या पंतप्रधानांची क्रूर हत्या झाली. संपूर्ण राष्ट्र शोकसागरात बुडाले होते. येत्या २० वर्षांत कुष्ठरोगाचा निःपात करण्याच्या संकल्पाने आत्मविश्वासपूर्वक पावले उचलणारे पंतप्रधान व गोरगरिबांचे व कुष्ठपीडितांचे मातृवैभव काळाने क्रूरपणे हिरावून नेले होते. परंतु इशारा म्हणून लागलेल्या ह्या ठेचीकडे, लक्ष न देता शासनाची पाउले तपोवनाचा ताबा घेण्यास तपोवनाकडे वळतीलच. सध्या तपोवनसारख्या पवित्र सेवामंदिराचा ताबा शासकीय कुष्ठसैनिक घेत असून शनिवार दिनांक १० नोव्हेंबरच्या दिवशी श्री. दाजीसाहेबांनी सर्वांचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन तपोवन सोडले. राजकारणाची बांधिलकी समाजकारणाशी की सत्ताकारणाशी हेच कळेनासे झाले आहे!

—दा. ग. बापट
सचिव
भारतीय कुष्ठनिवारक संघ
चापा, जिल्हा बिलासपूर

## मुंबापुरी

मुखपृष्ठ २ वरून

राखण्यासाठी आपण निवडणुकीतून निवृत्त व्हावे अन्यथा मी पब्लिकली प्रोटेस्ट करेन' अशी उघड उघड धमकी देणारी ही तार आहे. राम जेठमलानी खुद्द मुंबई पश्चिम लोकसभा मतदारसंघातनं निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे त्यांच्या या तारेने मुंबई भाजपनेते अवाक् झाले असले तर नवल नाही.

तारेची प्रत आम्हाला गुरुवारी दुपारी चार वाजता मिळाली. त्यानंतर जवळजवळ तीन–चार तास आम्ही मुंबई भाजपच्या वडाळा आणि दादर कार्यालयात चौकशी करत होतो. मुंबईचा एकही भाजप-नेता प्रतिक्रिया द्यायला कबूल नव्हता. एरवी, जरा कुठे खुट्ट झालं की प्रेस रिलीज काढणारे भाजप-नेते जेठमलानींच्या तारेविषयी एक अवाक्षरही काढत नव्हते. एकट्या जेठमलानींनी सगळ्या मुंबईशाखेची पंचाईत करून टाकली.

याहीपूर्वी जेठमलानींनी दोन–तीनदा पक्षाला गोत्यात आणलं होतं. लोंगोवाल-प्रकरणी पक्षाने भूमिका स्पष्ट न केल्याच्या निषेधार्थ त्यांनी दिलेला व नंतर परत मागे घेतलेला राजीनामा, सोलापूरच्या भाजपच्या अधिवेशनात चरणसिंगांवर व्यक्तिगत पातळीवर आगपाखड करून त्यांनी वाजपेयींची पंचाईत करून टाकली होती.

जेठमलानी आगाऊ तर आहेतच; पण पक्षानेही त्यांना डोक्यावर चढवून ठेवलं आहे. त्यांचा डॅश, चार्म अन त्यांचा तो गुलछब्बूपणा कदाचित कडक शिस्तीच्या ओबडधोबड संघीयांना भावला असेल; पण हा गुलजारपणा इंग्रजी गुळगुळीत मासिकातून वाचायला बरा वाटतो अन पक्षनेतृत्व हे गुळगुळीत मासिकातून तयार होत नसतं.

रत्नागिरी, पुणे व दक्षिण मुंबई या तीन जागांसाठी जेठमलानींनी चंद्रशेखर, बापू काळदाते यांची भेट घेऊन एक लेखी फॉर्म्युला तयार केला. यानुसार जगन्नाथराव जोशींनी पुणे सीट सोडायची वगैरे.

आता प्रश्न असा आहे की, अशा प्रकारचा फॉर्म्युला तयार करण्याचा अधिकार जेठमलानींना दिला कोणी? भाजपच्या संसदीय मंडळाने जे उमेदवार नक्की केले त्यांना जेठमलानी तार पाठवून माघार घेण्याविषयी कसे काय सांगू शकतात? राज्यनेत्यांनी जेठमलानींचा हा तोडगा अर्थातच धुडकावून लावला. इतकं असता, जेठमलानी पुन्हा तार कशी काय पाठवतात?

राजकारणात बिनबुडाची माणसे सध्या गदारोळ घालताहेत. याला 'चारित्र्य की राजनीती' करणारा भारतीय जनता पक्षही अपवाद नाही हे नक्की झालं. आता समंधाला बाटलीत पुन्हा कसं बंद करायचं हा प्रश्न आहे. आपकी क्या राय है, अटलजी?

### ☐ केवढा भेदक प्रश्न!

भले शाब्बास, तेंडुलकर. बहोत खूब! आपली आणि संजय सयानींची 'इव्हिनिंग न्यूज' मधली बातचीत वाचून आमचा तुमच्याविषयीचा आदर दुणावला आहे.

तसा आम्हाला तुमच्याविषयी पहिल्यापास्नंच आदर आहे; पण आम्हाला तसं सांगणं जमत नव्हतं. आता आमचे थोर पत्रकारमित्र संजय सयानींनीच आपली मुलाखत घेतली आहे तेव्हा आता सांगायला हरकत नाही. आपलं कौतुक करण्याची पेडर-रोडवर अहमहमिका लागते. तेव्हा आमचेही कौतुकाचे हे चार शब्द गोड मानून घ्या!

तुळशी–वृंदावनात अडकून पडलेल्या मराठी रसिकाला आपण वयात आणलंत, 'गिधाडे' वरून जेव्हा गदारोळ झाला तेव्हा साडीवरचा निळा डाग हा रक्ताचा लाल धब्बा आहे हे आम्ही मान्य केलं ते आपल्याच आदरापोटी! आता ही संजय सयानी प्रणीत मुलाखतही किती क्रांतिकारी वाटते.

संजयने तुम्हाला तुमचं वय विचारलं. तुम्ही वय सांगितलंत. काय ते नीट आठवत नाही. कारण संजयचा पुढचा प्रश्न केवढा भेदक अन पारदर्शी होता. 'आर यू पासिंग थ्रू अ फेज ऑफ मेल मेनोपॉझ?' काय प्रश्न आहे! अन आपलं उत्तर काय? काही नाही. आपण नुस्तं हसलात. वा: वा! तेंडुलकर! काय तो प्रश्न, काय तुमचं हसू!

पूर्वी 'क्वेस्ट', 'सेमिनार', 'संडे ऑब्झर्वर' वगैरेमध्ये तुमचे उल्लेख असत. पण ही सगळी उच्चभ्रू, बूर्झ्वा संस्कृतीची मासिकं आहेत. आपण तर मूवमेंटमध्ये आहात. आपल्याला आवाँ गार्द असून उपयोगी नाही. आपण तळागाळापर्यंत पोचलं पाहिजे. आपलं कौतुक प्रोलिटेरियाटने केलं पाहिजे. त्यासाठी संजय सयानी बरा.

संजय सयानीने याअगोदर हाजी मस्तान, अमिताभ बच्चन, युसुफ पटेल वगैरेंना इंटरव्यू केलंय. ही सगळी थेट मास मूवमेंटची माणसं आहेत. तेंडुलकर, यू आर इन अँन ऑगस्ट कंपनी. पूर्वी आपण शंभू-तृप्ती मित्राच्या सहवासात असायचे. आता आपण राजकपूरच्या सान्निध्यात असता.

आस्ते आस्ते पब्लिकपर्यंत पोचायचं असेल तर संजय सयानीसारख्या मूवमेंटमधल्या पत्रकाराला मुलाखती दिल्या पाहिजेत. इंग्रजी मासिकातून आपल्याविषयी खूप खूप लेख लिहून यायला पाहिजेत. मग आपोआप पब्लिकला आपलं हसू, आपली दाढी या सगळ्यातलं गूढ कळेल. मूवमेंटची पाळंमुळं घट्ट होतील.

छाया दातार वगैरेंनीही कुठे कुठे मुलाखती दिलेल्या आम्ही वाचल्या. दातारबाईंनी आपल्या मिस्टरांच्या मल्टीनॅशनल कंपनीतल्या नोकरीविषयी सांगितलंय. ते आम्हाला आवडलं. तुमच्यासारख्यांविषयी जितकं पब्लिकला कळेल तितका पब्लिकचा तुम्हा लोकांविषयीचा आदर दुणावेल. आमचा आदर तोपर्यंत आणखी दहापट वाढेल. तेव्हा कीप इट अप, तेंडुलकर!

—विष्णू जयदेव


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# नाट्यपंढरी



### ☐ शकून–अपशकून

नाटक–सिनेमात मुहूर्त, शकून–अपशकून या गोष्टींना खूपच महत्त्व दिले जाते. नट-श्रेष्ठ केशवराव दाते हे असल्या गोष्टींना फारसे महत्त्व देणारे नव्हते. तरीही त्यांनी आपल्या निरीक्षणाने एका मोठ्या अपयशाची नोंद केलेली आहे.

**कर्ण :**

कुमारीमाता किंवा कर्णाच्या जीवनावरची सगळी नाटके अयशस्वी झाली आहेत. शिवराम महादेव परांजपे यांचे 'पहिला पांडव' महाराष्ट्र नाटक मंडळीने सुरेख बसविले होते; पण नाही चालले. प्रबोधनकार ठाकरे यांचे 'टाकलेले पोर' पडले. कविवर्य शिरवाडकरांचे 'कौन्तेय' दुर्गाबाई खोटे नि मा. दत्ताराम यांसारखे मोहरे इरे घालूनही उभे राहू शकले नाही. प्रेक्षकांची नाडी अचूक ओळखण्यात हातखंडा समजले जाणारे वि. ह. औंधकर ('बेबंदशाही' कर्ते) यांचे 'महारथी कर्ण' सुद्धा टिकले नाही!

**राम :**

असेच रामावरचे एकही नाटक यशस्वी झाले नाही. अण्णासाहेब किर्लोस्करांचे 'रामराज्यवियोग' अर्धवटच राहिले. काकासाहेब खाडिलकरांचे 'सवतीमत्सर' प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही पडले. बामणगावकरांचे 'धनुर्भंग' चालले नाही. या मर्यादा पुरुषोत्तमावरच्या नाटकांना अशा मर्यादा का पडाव्या?

**राणी लक्ष्मी :**

तेच झाशीच्या राणीच्या जीवनावरच्या नाटकांचेही झाले. एक गुजराथी नाटक कंपनी मोठ्या थाटामाटात झाशीची राणी नाटक करीत असे. ते नाटक तर चालले नाहीच; पण ती कंपनीच रसातळाला गेली! शां. गो. गुप्ते यांचे 'रणरागिणी' गाजले नाही. इतकेच काय सोहराब मोदींनी काढलेला राणीच्या जीवनावरचा भव्य चित्रपट कोसळला! शांतारामबापूंसारख्या सिद्धहस्त दिग्दर्शकाची 'इथे मराठीचिये नगरी' उभी राहू शकली नाही.

यात कुसुमाग्रजांच्या 'वीज म्हणाली धरतीला' याही नाटकाचा समावेश व्हायला हरकत नाही. या सर्व नाटकांना एकमात्र अपवाद म्हणजे ग. कृ. बोडस यांच्या सुंदर संगीत मंडळीच्या 'झाशीची राणी' या नाटकाचा नि त्यांच्या गुणी पत्नी सरस्वतीबाई बोडस यांच्या राणीलक्ष्मी या भूमिकेचा. (अगदी अलीकडे 'गारंबीचा बापू', 'पुत्रकामेष्टी' या नाटकांतून त्या काम करीत होत्या).

का कर्ण, राम, राणी लक्ष्मी हे सारेच एक प्रकारे शापित विषय समजायचे?


### ☐ धुंडिराज पावला

मी जयवंत दळवीचे 'पुरुष' नाटक पाहून थिएटरबाहेर पडत होतो, तोच माझ्या शेजारून चालणाऱ्या एका तरुण जोडप्यातला पुरुष आपल्या पत्नीला म्हणाला, 'हा चंद्रकांत गोखले, नाटकातही चांगले काम करतो नाही?' मला आश्चर्य वाटले; पण त्यात त्या तरुणाचा काय दोष? ते चंद्रकांतांना सतत पहात आले ते मराठी चित्रपटातूनच! पण चंद्रकांतांचा जन्मच मुळी नाटककंपनीत झाला.

चंद्रकांत हे नाट्यकला – कुलोत्पन्नच. त्यांचे वडील रघुनाथराव गोखले, जुन्या काळचे उत्तम स्त्रीपार्टी. चुलते रामभाऊ हे श्रेष्ठ गद्यनट. आई (कमलाबाई कामत) उत्कृष्ट अभिनेत्री. त्या स्त्री–पुरुष भूमिका सहजतेने करीत. बंधू लालजी नि छोटू हे प्रसिद्ध तबलापटू. चंद्रकांतांचे चिरंजीव विक्रम गोखले हे आजचे आघाडीचे नाट्य–चित्र कलावंत!

चंद्रकांत लहानपणापासून रंगभूमीवर वावरले. मा. दीनानाथ मंगेशकरांपासून गंगाधरपंत लोंढ्यांबरोबर स्टेजवर असलेले कलावंत. त्यांनी अनेक भूमिका गाजविल्या. अलीकडे त्यांनी 'नटसम्राट' उभा केला होता. आजही 'पुरुष', 'बॅरिस्टर' त्यांच्या नावावर जमा आहेत. नव्या नाटकातून येतच आहेत; पण एक जमाना असा होता की, चंद्रकांत गोखले म्हणजे 'धुंडिराज!' आज त्यांनी एक नामवंत चरित्रअभिनेता म्हणून जे अपूर्व यश संपादले आहे, त्या चित्रसृष्टीत या त्यांच्या भाववंधनमधल्या 'धुंडिराज'नेच त्यांना हात धरून आणले आहे.

एक दिवस राजाभाऊ परांजपे राजाराम संगीत मंडळीचे 'भाववंधन' पहायला आले होते. चंद्रकांतांचा गोष्टीवेल्हाळ, साधाभोळा धुंडिराज पाहून ते अगदी भारावून गेले. दुसऱ्याच दिवशी 'नवयुग' च्या पुंडलीक या चित्रपटासाठी घेऊन गेले. चाळीस रुपये पगार ठरला. चंद्रकांतांच्या आयुष्यातला हा पहिला एवढा मोठा पगार! 'पुंडलीक' मधली त्यांची भूमिका सुरेख झाली. मग चित्रपटातल्या भूमिका एकामागून एक दाराशी चालून येऊ लागल्या. धुंडिराज पावला! पुंडलीक प्रसन्न झाला!



MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28



"राष्ट्राच्या सेवेत मला मरण जरी पत्करावे लागले तरी मला त्याचा अभिमानच वाटेल. माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब या राष्ट्राच्या भरभराटीसाठी आणि या राष्ट्राला बलवान आणि गतिशील बनविण्यासाठी उपयुक्तच ठरेल, अशी मला खात्री आहे."

३० ऑक्टोबर १९८४ — श्रीमती इंदिरा गांधी

वि 84/173